
ाहिक
ाणूस
२६ मार्च/८३ दोन रुपये



# मराठवाडा

# 'हमारी मांग ब्रॉड गेज'

'द डेक विथ हॉकी' -(

साप्ताहिक

# माणूस

वर्ष : बाविसावे

अंक : एकेचाळीसावा ९३

२६ मार्च १९८३

किंमत : दोन रुपये

संपादक

श्री. ग. माजगावकर

सहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

। पत्ता ।

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ

सुभाष अवचट

# इथून–तिथून

## संशोधनाचे व्यसन

नेपोलिअन सेंट हेलेना बेटावर ५ मे १८२१ रोजी मरण पावला तरी अजून त्याच्या मृत्यूचे रहस्य उलगडण्यासाठी संशोधन होत आहे.

फ्रेंच डॉक्टरांनी केलेल्या शवविच्छेदनात पोटाचा कॅन्सर हे मृत्यूचे कारण दाखविले गेले; परंतु १९६० साली संशोधकांनी त्याच्या केसाचे रासायनिक पृथक्करण केले. निष्कर्ष मात्र धक्कादायक होता. शरीरात नैसर्गिक सोमल (आर्सेनिक) जेवढे असते त्याच्या १३ पट ह्याच्या केसांत सापडले.

इंग्लंडमधील न्यूकॅसल युनिव्हर्सिटीतल्या रसायनतज्ज्ञ डेविड जोन्सच्या मते, नेपोलियनच्या घरात जे वॉलपेपर्स होते त्यात आर्सेनिक होते. (कीटकांना मारण्यासाठी किंवा दूर ठेवण्यासाठी वॉलपेपरच्या रंगात आर्सेनिक घातले जाते. त्याच्या वाफा रोज नेपोलियनच्या श्वासातून फुफ्फुसात जात होत्या आणि अशा रीतीने त्याच्या शरीरात ते प्रमाणाबाहेर झाले तेव्हा नेपोलियन मरण पावला. त्याच्या खोलीतील वॉलपेपर्स अद्यापही जतन करून ठेवले आहेत.

गट्टामते अ. भा. अण्णा द्मुकला हिंदू मतांपेक्षा जास्त मोलाची आणि महत्त्वाची होती. याचा फायदा घेऊन त्या भागात असलेल्या सक्रिय ख्रिश्चन नेत्यांनी आणि मिशनऱ्यांनी तामिळनाडूचे मुख्यमंत्री रामचंद्रन यांच्यावर दबाव आणून १३ फेब्रुवारीची हिंदू मुन्नानीची परिषद उधळून लावली तर लावली, शिवाय हिंदूंवर अनन्वित अत्याचारही केले.

तुघलक पत्र पुढेही असे म्हणते– ख्रिश्चन किंवा अन्य धर्मीयांचे अगदी बारिकसेसुद्धा नुकसान झालेले नाही. मग त्यांच्या धार्मिक स्थळांना धक्का लागणे तर दूरच आणि गंमत म्हणजे या दंगलीत जी दुकाने जाळली गेली ती हिंदूंचीच, जे जखमी झाले ते हिंदूच आणि शरमेची गोष्ट म्हणजे हे पूर्वनियोजित होते आणि त्यात पोलिसांनी घरात घुसून हिंदू स्त्रियांवर अत्याचार केले.

## 'तुघलक'ची चौकशी

तामिळनाडूच्या नागरकोईल या गावी १३ फेब्रुवारीला हिंदू मुन्नानी या हिंदू एकतावादी संघटनेने हिंदू परिषद घेतली. या परिषदेच्या निमित्ताने मिरवणूक काढली जाणार होती. त्याला सरकारची लेखी परवानगी मिळाली होती.

पण कुठून कोण जाणे कळ फिरली. रातोरात परवानगी नाकारली गेली व नागरकोईलमध्ये १४४ कलम जारी झाले. या परिषदेसाठी संपूर्ण तामीळनाडूतून आणि नागरकोईल आसमंतातील ग्रामीण भागातून आलेल्या जनतेला या बंदीहुकुमाची कल्पना नव्हती. सारी जनता पोलिसांची दडपशाही आणि त्यांचे अत्याचार यांचे लक्ष्य आणि भक्ष्य ठरली इतकेच नव्हे तर सुप्रसिद्ध नागराजमंदिरात पोलिस घुसून, त्यांनी पुजारी व दर्शनार्थी यांच्यावरही अत्याचार केले.

हे एकदम असे कसे घडले ? तामिळनाडूतल्या विख्यात पाक्षिक 'तुघलक'ने याची चौकशी केली तर...

या कारस्थानामागे तेथील ख्रिश्चन मंडळींचा हात असल्याचे त्यांना आढळून आले.

## खुनी स्त्रियांची पाहणी

उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश आणि बिहार तुरुंगात खुनाच्या आरोपाखाली असणाऱ्या १५० स्त्रियांच्या मुलाखती घेण्यात आल्या तेव्हा, अविवाहित स्त्रियांपेक्षा विवाहित स्त्रियांमध्ये खून करण्याची प्रवृत्ती जास्त प्रमाणात आढळली. या १५० स्त्रियांमध्ये फक्त १च अविवाहित आहे.

बनारस विद्यापीठातील प्राध्यापिकेने 'भारतीय स्त्रियांची गुन्हेगारी' या विषयावर संशोधन करताना हा निष्कर्ष काढला.

घरगुती भांडणे, एकत्र कुटुंबपद्धतीतील शिक्षणाचा अभाव, जीवनाविषयी वैफल्य इ. कारणे त्यांना अभ्यासात आढळली असून या स्त्रिया २०–३० या वयोगटातील आहेत. यातील ९२% स्त्रिया खुनाच्या गंभीर आरोपाखाली तुरुंगात आहेत. बिहारमध्ये हे प्रमाण सर्वाधिक असून ते जगातल्या स्त्री-गुन्हेगारांच्या तुलनेत सर्वात जास्त आहे. बिहारमधल्या ४०% गुन्हेगार स्त्रिया विधवा

आहेत. आणि त्यातील बरेचसे खून नातेवाईक नवरा अथवा मुले यांचेच झाले आहेत.

## कांजरा जमात

कांजरा ही राजस्थान राज्यात सवाई माधोपूर, धोलपूर, भरतपूर इत्यादी १६ जिल्ह्यांत जवळजवळ ४ लाखांच्या घरात असलेली जमात केवळ वेश्याव्यवसाय करूनच जगते. या जमातीच्या स्त्रिया वेश्याव्यवसाय करतात तर पुरुषमंडळी व्यसनात आयुष्य घालवितात.

कांजरा जमातीत मुलींची फार काळजी घेतली जाते. या मुलीच धंदा करून कुटुंब पोसत असल्याने, त्यांना जिवाचा दिवा करून वाढविले जाते. ज्याला जास्त मुली तो सर्वाधिक श्रीमंत समजला जातो.

कांजरा मुलगी वयात आल्यावर तिचे सर्वप्रथम जमातीतील तरुणाशीच लग्न होते. लग्नात सर्व जमातीला दारू-मटणाची मेजवानी दिली जाते. लग्न झाल्यानंतर नवपरिणित जोडप्याला विशिष्ट वनस्पतींचा रस प्यावयास देतात. तो रस अंगात भिनताच तमाम वऱ्हाडमंडळीसमोर त्यांचा शृंगार सुरू होतो.

लाखो रुपयांच्या नोटा दिल्या तरी कांजरा जमातीतील अविवाहित मुलगी दुसऱ्याशी समागम करण्यास तयार होत नाही. आपल्या पतीला देहाचा पहिला नजराणा अर्पण केल्यावर नववधू धंदा करण्यास मोकळी होते.

कांजरा पुरुष व्यसनी असला तरी परस्त्रीगमन अथवा आपल्या जमातीच्या महिलेशी समागम करणार नाही. तो आपल्या बायकोशी एकनिष्ठ असतो. त्याच्या बायकांना कुणापासूनही मूल झाले तरी त्याचे जनकत्व त्यांचे ऐदी नवरे पत्करतात...

राजस्थानात कांजरा जमातीबरोबर नूट नावाची आणखी एक जमात आहे. तीसुद्धा देहविक्री करून उपजीविका करते. नूट जमातीतील मुलींची लग्नेच होऊ शकत नाहीत.

केन्द्र सरकारने ह्या जमातीने हा परंपरागत व्यवसाय सोडून नागरी जीवन जगावे यासाठी पन्नास कुटुंबे एकत्र जमवून एक वसाहत तयार केली. घरे, पाणी, वीज, शाळा, उद्योगधंदे ह्याची सर्व सोय उपलब्ध करून दिल्यावरसुद्धा या सुसंस्कृत प्रयोगशाळेत एकही कुटुंब. दोन वर्षेही टिकले नाही. □

# मुंबापुरी....

मुंबापुरीच्या महापौरपदाची माळ कोणाच्या गळ्यात पडेल याकडे सगळ्यांचे डोळे लागले आहेत. वसंतदादांनी आल्या आल्या मुंबई महानगरपालिकेची मुदत एका वर्षाने वाढवून दिल्याने नगरसेवकांना एकदम हायसं वाटलं आहे. आता सगळा वेळ महापौर-निवडणुकीचं राजकारण करण्यात जातोय. दुसरी कामं तरी काय आहेत नगरपित्यांना?

पालिकेत पुरोगामी लोकशाही आघाडीचं शासन आहे. यात जनता, भाजप, समाजवादी काँग्रेस, महाराष्ट्र मुस्लिम लीग वगैरे आहेत. गुजरातमध्ये सगळ्या भाज्यांचा मिळून उंधियूं नावाचा एक खमंग प्रकार करतात.' पुलोद आघाडी ही अशीच आहे.

या आघाडीत कोणी काहीही बोलायचं, परस्पर विरोधी भूमिका घ्यायच्या आणि वाटावाट सुरू झाली की, सोयिस्करपणे आपलाही वाडगा पुढे करायचा असा एकूण सगळ्याच पक्षांचा खाक्या आहे. त्यामुळे पुलोद आघाडीची लक्तरं अनेकदा पुलोदवाल्यांनीच वेशीवर टांगली आहेत.

आता हेच पहा ना. या वर्षी महापौरपद जनतापक्षाला मिळणार असं जवळजवळ नक्की झालंय आणि जनतापक्षातच आतल्याआत दगेधोपे सुरू झाले आहेत.

महापौरपदासाठी जनतापक्षाचे बुजुर्ग नगरसेवक मनमोहनसिंग बेदी यांचं नाव निश्चित झाल्यासारखं आहे. अर्थात् बेदींना विरोध आहेच. खुद्द जनता पक्षाच्या मुंबई शाखेचे अध्यक्ष डॉ. शांती पटेल बेदींच्या विरोधात उभे ठाकले आहेत.

डॉ. शांती पटेलांनी गेल्या काही वर्षांत आपली गुजराथी लॉबी मजबूत केली आहे. मदतीला रमेश संघवी, भगरती श्रॉफ, जयंती पारेख प्रभृती आहेतच. या लॉबीचा बेदींना विरोध आहे.

बेदींची बाजू घेणारे नगरसेवक म्हणतात, अल्पसंख्यांक जमातीतला माणूस मेयर झाला तर पक्षाची इभ्रत वाढेल. काहींचा असाही दाट विश्वास आहे की, मनमोहनसिंग बेदी महापौर झाले तर त्यामुळे अकालींचे प्रश्न सुटण्यास मदत होईल. ( यावरून आठवलं. अरब-इस्रायल युद्धावर तीन-तीन तास नगरसेवक मंडळी कंठशोष करतात ते काही उगीच नव्हे. त्यांचा असा विश्वास आहे की, त्यांच्या स्थगत-प्रस्तावामुळे इस्रायलचे बेगिन वठणीवर येतील ).

जनतापक्षाकडे महापौरपद गेलं तर स्थायी समिती किंवा बेस्ट समितीचं अध्यक्षपद भाजपकडे येईल. अर्थात, भाजपला दोन्ही समित्या हव्या आहेत.

स्थायी समितीचं अध्यक्षपद भाजपच्या डॉ. सौरभ मुझुमदारांकडे जाईल तर बेस्ट समिती जनताकडे जाईल असं बोललं जातं.

शिवसेनेने काँग्रेस ( आय ) शी काडीमोड घेतला असून पुलोदशी मैत्री सुरू केली आहे. या मैत्रीच्या जोरावर सेना स्थायी समिती खिशात टाकायला बघणार; पण जनता-भाजपमधले शुक्राचार्य हे होऊ देणार नाहीत. फार तर शिवसेनेला शिक्षण किंवा सुधार समिती मिळेल !

एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात नवा महापौर येईल. नव्या महापौराची गावभर द्वाही फिरेल. हार-तुरे, भाषणं, जेवणं होतील. नवी आश्वासनं मिळतील आणि पद सांभाळण्याच्या जेमतेम पंधरवड्यातच नवे मेयर कोस्टारिका, होनोलुलु किंवा रिओ-द-जानेरिओला दोन्ही शहरातले शहरांचे संबंध जोपासायला जातील. आपण आपली नुस्ती त्यांची वाट पाहायची, टुकटुक टुकटुक !
□

## निर्विकार बेगम

जे. जे. हॉस्पिटल. डॉ. गिलडांच्या खोलीवर नर्स बेगमला घेऊन आली. खोलीत दोन डॉक्टर्स, एक सोशल वर्कर आणि चार वार्ताहर.

बेगम इकबाल शेख वय वर्षे नऊ. चार चार दिवसांपूर्वीच तिला जे. जे. ला दाखल केले होते. सिफिलस, शांकराइड आणि गनोरिया ह्या तीनही रोगांची बाधा चेहऱ्यावर बुजरेपणा नाही. हिंदी स्वच्छ आणि कोठल्याही प्रश्नाला ती अडखळत नाही. सगळ्या प्रसंगांचे तपशीलवार वर्णन करून सांगणार. बोलण्यात कोणाबद्दल राग नाही वा द्वेष नाही. आपण काही भयंकर प्रसंगातून गेलो ह्याची जाण नाही; पण

आपला फोटो काढणार ह्याचाच विलक्षण आनंद !

बेगम राहणारी शिवाजीनगरची. कांचन-घाट–झोपडपट्टीतील. घरी आई, वडील, एक भाऊ आणि बहीण. वडील हलवाई. जवळच राहणाऱ्या सखी नावाच्या एका मुलीबरोबर औषधासाठी बेगम सरकारी दवाखान्यात गेली. येताना सखीने तिला सिनेमाला न्यायचे कबूल केले. शिवाजीनगरस्टेशनला आणली आणि तेथून थेट व्ही. टी. ला. विदाउट टिकेट.

व्ही. टी. ला रखीने बेगमला आठ ते दहा दिवस ठेवले. दहा दिवसांनी तिला पिला हाऊस भागात नेले. आणि वयाच्या नवव्या वर्षीच बेगमचे नवे आयुष्य सुरू झाले.

'कुछ तकलीफ नही हुई ?'

'नही. रखीने मॅन्ड्रेक्स दिया।'

बेगमला हा शब्द ठाऊक आहे.

'मँड्रेक्स क्या रहेता है ?'

'गोली !'

'कैसा गोली ?'

'उससे गुंगी आता है। नींद आता है।'

'तुमको नाम कौन बताया ?'

'रखी. रखी धंदा करती है।'

बेगमचे सारेच बोलणे निर्विकार–अगदी सगळे अत्याचार ती सविस्तर सांगेल, चेहऱ्यावर कोणताच भाव न दाखविता.

गेल्या काही दिवसांपूर्वी असि. पोलीस-कमिशनर त्यागींनी पोलिसांच्या मदतीने ह्या भागावर रात्री बारानंतर धाड घातली होती.

'कुछ दिन पहले बहुतसे पुलिस आके गये ?'

'हाँ कुछ लडकी लोगोंको पकडा।'

'तुमको नहीं पकडा ?'

'नहीं। हमारे उधर पुलीस रोज आता था। पुलिसवाला कभी पैसा नहीं दिया।'

'तुम कैसे पहचानती हो पुलीसको ?'

'बिल्लासे–वर्दीसे।'

'वर्दी क्या है ?'

'उसका कपडा रहता है ना खाकी उसको वर्दी बोलते हैं।'

दोन महिन्यांच्या आतच बेगमला रोग जडले. पोटातून कळा यायला लागल्या. रुकमाना नावाच्या एका मुलीने तिला जे. जे. ला दाखल केली.

गेल्या दोन महिन्यांच्या अवधीत जे. जे. मध्ये दाखल झालेली बेगम ही चवथी केस. अल्पवयीन मुलीची.

मुंबादेवीचे एक वैशिष्टच आहे. येथे येणारा प्रत्येक जण बनतो स्थितप्रज्ञ. संध्याकाळी व्ही. टी. ला वा चर्चगेटला ट्रेनमध्ये जागा मिळाली की आपण राग लोभ विसरतो. सुखदुःखांच्याही पलीकडे पोहोचतो. निर्विकार बनतो. बेगम सारखे.

### तो 'ग्रुप' वेगळा !

कार्ल मार्क्सविषयीचा एक मजेदार किस्सा आहे. मार्क्सच्या आठवणी संग्रहित करण्याच्या उद्देशाने काही जण ब्रिटिश म्युझियममध्ये गेले. तिथल्या जुन्यात जुन्या कर्मचाऱ्याला त्यांनी मार्क्सविषयी विचारलं. तर तो डोळे किलकिले करून महत्प्रयासाने काहीसं आठवल्यासारखं करून म्हणाला– 'ओहो तुम्ही मिस्टर मार्क्सबद्दल बोलताय ? ते तिथे त्या कोपऱ्यात तासन्तास काही तरी वाचत खरडत रहायचे. तेच ना ? अहो त्याचं कायेय की, काही वर्षांपूर्वी ते असेच कुठे तरी निघून गेले. तेव्हापास्नं त्यांच्याबद्दल कोणालाच काही ठाऊक नाहीये.'

हा किस्सा सांगायचं कारण म्हणजे गेल्या आठवड्यात मुंबईत कार्ल मार्क्स मृत्यु-शताब्दीनिमित्त झालेले कार्यक्रम आणि लोकांचा कोमट उत्साह. परिसंवाद भाषणांचं एक सोडा. मार्क्सिझमवरच्या विद्वज्जड परिसंवादांना लोकांना पकडून आणणं तसं कठिणच आहे.

परंतु कार्ल मार्क्स सेंटेनरी कमिटीतर्फे ताराबाई हॉलमध्ये नुकत्याच पार पडलेल्या चित्रपटमहोत्सवालाही गर्दी यथातथाच होती.

'दो बिघा जमीन' 'बायसिकल थीफ' 'अल्बर्ट पिंटो...' 'भवनी भवाई' 'दे कॉल मी चमार' आणि 'टाइम टू राइज' सारखे दर्जेदार कलात्मक चित्रपट असूनही लोक येतील तर शप्पत. संयोजकमंडळी हॉलच्या बाहेर. आशाळभूतपणे वाट पाहात बसायची त्यात विशेष म्हणजे, हा फिल्म फेस्टिवल खास निमंत्रितांसाठीच होता. म्हणजे निमंत्रणं फक्त मार्क्सप्रेमी मंडळींनाच गेली होती तरी हा रिस्पॉन्स !

लंडन पिल्सनरचा फेसाळता पेला आणि मसाल्याचे काजू चघळत डायलेक्टिकल मटिरियलिझमवर टाइम पास करणारे पैशाला पायलीभर आहेत. त्यांचं सोडा त्यांच्या लेखी अनेक चलती नाण्यांपैकी एक नाणं म्हंजे कम्युनिझम. सवाल आहे तो तत्त्वनिष्ठ मार्क्सप्रेमींचा. पण त्यांची अजून आपापसातली भांडणंच संपत नाहीयेत. मला फेस्टिवलचं आग्रहाचं आमंत्रण पुन्हा देणारा माझा मार्क्सिस्ट पत्रकारमित्र स्वतः मात्र ताराबाई हॉलकडे फिरकलाच नाही. नंतर भेट झाली तेव्हा म्हणाला की तिथं येण्यात काही अर्थ नाहीये. तो ग्रुप सगळा वेगळा आहे. आमचा ग्रुप वेगळा आहे.

जातिव्यवस्था कशी चिवट रोगासारखी तग धरून आहे.

–विष्णू जयदेव

---

# सणकीत

अलीकडेच बघितलेल्या बहुचर्चित नाटकांत एक संवाद आहे.

...त्याचं काय असतं बाई प्रत्येक माणसात जसा देव असतो ना तसाच दानवही असतो आणि त्या दोघांचं द्वंद्व असतं, त्यात कधी देव वर तर कधी दानव...

आता देव, दानव हे फारच दूर, कालबाह्य अथवा अवैज्ञानिक ठरतील; पण त्यांची जागा निश्चितपणे दुसऱ्या आदर्शांनी घेतलीय.

## नऊवारी म्यॅट्रिक

हल्ली प्रत्येक माणसात एखादा अमिताभ असतो, धर्मेंद्र असतो, गावसकर असतो किंवा आणखी कोणी... त्याही पुढे काही मर्यादित क्षेत्रापुरतं मी असं म्हणेन की प्रत्येक माणसात एक खांडेकर असतो, एक माडगूळकर असतो आणि अगदी नामदेव ढसाळ किंवा भाऊ पाध्येही असतो... फक्त तो लिहीत नाही. त्याला नुसतं भावतं आणि हे भावणं जो लिहितो तो पुढे खांडेकर, माडगूळकर अथवा भाऊ पाध्ये होतो...

तर परवा असंच माझ्यातलं एक व्यक्तिमत्त्व जागं झालं, त्याचं माझ्या व्यक्तिमत्त्वाशी द्वंद्व झालं आणि त्यात माझा पराभव झाला. कारण दुसरं व्यक्तिमत्त्व काही साधंसुधं व्यक्तिमत्त्व नव्हतं तर ते अवघ्या महाराष्ट्राचं लाडकं व्यक्तिमत्त्व होतं ! होय, परवा ' पुल 'च आले माझ्या अंगात. अंगात येण्याच्या आपल्या परंपरेच्या भव्य इतिहासात ही आणखी एक भर ! अर्थात पुल अंगात यायला कारणही तसंच होतं. नुकतीच सुरू झालेली दहावीची परीक्षा. अहो, दहावीची परीक्षा हे आत्ताचं नवं ब्रॅन्ड नेम. पण पूर्वीची ती ' मॅट्रिक 'च ! आता ' म्यॅट्रिक, ' पोस्ट, झेड. पी. तील शिक्षिका किंवा हापिसातल्या कारकुनावर ' पुलं ' शिवाय कोण बोलणार. तर या १०+२+३ असल्या बेरजेच्या शिक्षणापूर्वी जी काही ११ वी नामक ' म्यॅट्रिक ' होती तिचा मी पाईक असल्याने या नव्या आकृतिबंधाच्या चाचण्या, घटक चाचण्या असल्या ब्लड टेस्ट, युरिन-टेस्ट-स्टूल-टेस्ट अशा डॉक्टराकडे कराव्या लागणाऱ्या लांबलचक प्रवासासारख्या अभ्यासक्रमाकडे पाहून मला माझी ' म्यॅट्रिक ' आठवली आणि मला गहिवरून आलं, तेव्हाच मला जाणवलं माझ्यात ' पुलं ' आलेत.

मला माझी ' म्यॅट्रिक ' आठवायला लागली. ते वातावरण, ते विषय, ती धाकधुक सारं काही तसंच्या तसं आठवायला लागलं. आज मागे वळून बघताना त्या दिवसांवर, परिस्थितीवर माझ्यातले ' पुल ' कॉमेंट करत होते... एक वेगळंच द्वंद्व.

मला आठवली माझ्या पुस्तकातली सीता, यास्मीन, राम, अहमद. सीता यास्मीनकडे जाते, यास्मीन सीताकडे जाते. राम-अहमद जोडीने येतात–जातात, खेळतात...

...अशा प्रकारे आमच्या पुस्तकात तरी निदान सर्वधर्मसमभाव सहजपणे उतरला होता. इतका की अहमद रामाबरोबर बसून ' संध्या ' म्हणेल असं वाटावं–पुल

गणित विषय तसा मला कटकटीचा. त्यातल्या आकृत्या तेवढ्या सुंदर काढीत असे मी. पण काळ काम वेगाचं गणित मात्र आजच्या काळातही मला येणार नाही. शिवाय ते हौद वगैरे प्रकरण...

...या हौदाच्या फुटक्या गणिताच्या पुस्तकाचा कर्ता पूर्वी मुन्सिपाल्टीत बांधकामखात्यात ज्येष्ठ लिपिक वगैरे असावा...

भूगोलाच्या पुस्तकातल्या आल्प्स पर्वताच्या रांगा आठवू लागल्या... दक्षिण भारतातले ' गरम मसाले ' नाकात भरू लागले.

...पुढे आयुष्यात कारकुनी करताना फायलींच्या रांगाच काय त्या असतात... आणि उच्च कोटीतले मसाले हे बेडेकर किंवा कुबलच बनवितात हीच आमची मध्यमवर्गीय भौगोलिक वास्तवता असते.

इतिहासाच्या पुस्तकात भारतात सोन्याचा धूर निघत असे... सोन्याचा नाही पण मर्ढेकरांच्या गणपत वाण्याच्या विडीचा धूर मात्र घशात जाऊन अडकला आणि इतिहासातल्या ' सोन्याच्या धुराची ' काडी नुस्तीच चावत बसलो.

अशा प्रकारे माझ्यातले ' पुल ' तिरकस शेरे मारत होते स्वतःच जगलेल्या आयुष्यावर... पुढे तर पुलंना आणखीनच गहिवरून आलं. ...ती शाळा दिसू लागली... तेव्हाचे दिवस... मृगनक्षत्राचा पाऊस पडावा आणि पेरणीला सुरुवात व्हावी तसं त्या वेळी जूनची सात तारीख, चौदा तारीख उजाडली की शाळांची फाटकं आपोआपच उघडत. पहिल्या पावसाच्या शिडकाव्याने मातीला गंध यावा तसा नव्या कपड्याचा (पाटलोण) पुस्तकं, वह्यांचा वास इतकंच नव्हे पण त्या जुन्या बाकांनासुद्धा नवा वास असे... आता सारंच बदललंय. पाऊसही लहरी झालाय. त्याच्याप्रमाणेच शिक्षणही. अचानक कधी तरी पाऊस पडावा सप्टेंबरात, तशी ऑगस्ट-सप्टेंबरात शाळा-कॉलेजं उघडतात... अवर्षणग्रस्त भागांसारखा काही विषयांच्या पुस्तकांचा ठणठणाट असतो आणि रोजगार हमीच्या कामासारखं वह्यांचं वाटप. पुस्तकांचं काम सरकारनेच घेतलं असल्याने पुस्तकांवर देखील PWD/GR/1034–1–1–80 वगैरे यायला लागलंय. या नव्या पिढीच्या नशीबानं त्यांना सरकारी खाकी कागद मिळाला नाही. एकूण ही पिढी सुखीच. दर आठवड्या-पंधरवड्याला परीक्षा. त्यातले गुण शेवटी मिळवणार. शिवाय ठराविकच पोर्शन... नुस्तं ऐकलं तरी जीव गलबलून येतो... नाही तर आमच्या वेळी परीक्षा या विधानसभेच्या अधिवेशनासारख्या पावसाळी-हिवाळी-उन्हाळी अशा असत, उन्हाळी म्हणजे वार्षिक परीक्षेत मास्तर कुठलाही बारीक प्रश्न, विरोधी पक्षाच्या आमदारानं नव्या मंत्र्याला कैचीत पकडावा तसा मोठा करून मांडत आणि मग आम्ही तो तितक्याच लीलया गुंडाळत असू... सध्या आमचीच ' म्यॅट्रिक ' मंडळी विधानसभेत असल्यानेच ते अधिवेशनच छान गुंडाळू शकतात. त्याचं मूळ तिथे आहे... पण सध्याचे अगदी नवे मंत्री हे या नव्या अभ्यासक्रमातले असावेत. त्यांना प्रत्येक प्रकरणाचा स्वतंत्र अभ्यास करावा लागतो... नंतर मला परीक्षेची–

म्यॅट्रिक परीक्षेची वेळ आठवली

परीक्षागृहाबाहेर थांबलेले ते पालक...

त्यांनी आणलेले डबे...ती प्रश्नोत्तरं... लगेच पुल....


सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही.

–डॉ. य. दि. फडके

# महाडचा मुक्तिसंग्राम

लेखक : प्रा. म. रा. बिवलकर
प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

त्या वेळी आपलं पोरगं हे दक्षिण–दिग्विजयासच निघालेलं आहे अशा उत्साहानं सारा पालकवर्ग तिथे जमलेला असे. गोष्टीतल्या तहानभुकेच्या लाडवाप्रमाणेच विषयानुरूप ' पदार्थ ' डब्यात असे. थर्मासातला चहा म्हणजे या सान्यावरची कोटी असे. त्या चहाला वेगळीच प्रतिष्ठा ! तो चहा घेतला की पोरगं ६० टक्क्यांवर जाणारच हा आत्मविश्वास ! त्या बास्केटा–आता त्याही गेल्या–शबनम आल्या...पूर्वी आपल्याकडे ' मुलतान ' जाऊन ' मडम ' आली होती. आता ' बास्केट ' जाऊन ' शबनम ' आली...आता आयाबाया ' बिझी ' असतात. त्या सकाळी ९–५ ची विरार फास्ट पकडता पकडता पोराला ' बेस्ट लक ' करतात. मधल्या वेळातली खिचडी, शिरा गेलं. तिथं उडप्याचा डोसा, इराण्याचा ब्रेड–बटर आला !...

मला आठवलं जूनचा पहिला आठवडा निकालाचा. लोकसभेचे निकाल लागावेत तसं वातावरण असायचं. ' म्यॅट्रिक ' म्हणजे फारच असायचं...पुन्हा पुल...

...त्या वेळी ६०% मार्कसुद्धा डोक्यावरून पाणी ! सी. डी. देशमुख वगैरे ९०% पुढचे लोक देवच वाटायचे.. हल्ली पोरं ८०% च्या खाली मार्कच घेत नाहीत. हल्ली मास्तरपण बेभान होऊन मार्क वाटत असावेत !

इतक्या उदार अंतःकरणाचे मास्तर आमच्या वेळी नव्हते. पोरांना मार्क जास्त दिले तर जणू काही आपल्या पेन्शनीत काही शिल्लक राहणार नाही अशीच भीती त्यांना वाटत असावी...त्या वेळी हातचा एक असं म्हणून खरोखरी एक बोट राखून बेरीज करीत ती एक वेळ बोट कमी–जास्त होईल; पण बेरीज चुकणार नाही इतकी बरोबर असे ! हल्ली या गणकयंत्रात शेकड्यांनी गोंधळ ! बहुधा त्याला हातचा एक धरायला अडचण होत असावी...त्या वेळी नापास म्हणजे नापास. हल्ली ए. टी. के. टी. काय, ग्रेस मार्क काय...आम्हाला ग्रेस मिळाला तो फक्त पुढे मराठी कवितेतच ! आता परीक्षांच्या निकालांना ग्रामपंचायतीच्या निकालांचं स्वरूप आलंय !

...अशा रीतीने माझ्यातले पुल ' ग्रेसवर ' चढायला लागले... मला जुनं ते सोनं वगैरे वाटायला लागलं...

या सगळ्या नव्या आकृतिबंधात, सेमिस्टर पद्धतीत माझी जुनी ' म्यॅट्रिक ' गोऱ्या स्कर्टवाल्या मडमात एखादी ' नऊवारी ' घट्ट पदरात अंग चोरून उभी रहावी तशी भासायला लागली. .. त्याच वेळी माझ्या गुडघ्यात एक कळ आली आणि मी मटकन खालीच बसलो !

—संजय पवार

---

ह्या ना त्या निमित्ताने....

# ' टा....टा.... ' म्हणू नयेसे वाटणारे टाटा

फिरोझ रानडे

एखाद्या अतिशय छान कार्यक्रमाला जावे आणि अतिशय उदास होऊन परत यावे असे कधीकधी होते, नाही ? श्यामचे त्या दिवशी तसेच झाले.

श्री. जे. आर. डी. टाटांच्या मुंबई महापालिकेतर्फे योजलेला सत्काराचा तो कार्यक्रम होता. मुंबईतल्या अलिशान अशा मलबारहिल भागातले अलिशान कमला नेहरू पार्क त्या दिवशी विशेष सजवले गेले होते. तो परिसर आधीच रम्य, त्यातून मुंबईत कधी नव्हतची थोडीशी थंडी, त्यामुळे ती संध्याकाळ जास्तच रम्य वाटत होती. पायतळाशी मुंबापुरीचे वैभव पसरले होते. बाजूच्या आकाशाला भिडणाऱ्या समुद्रात जास्त संपत्ती आहे की, काठावर उभ्या असलेल्या मुंबापुरीत जास्त संपत्ती आहे असा कोणालाही प्रश्न पडावा.

काव्य वगैरे काही श्यामचा प्रांत नाही; पण त्या दिवशीच्या त्या संध्याकाळने श्यामचे मन हुरहुरवले होते.

कमला नेहरू उद्यानाची मोठ्या नाजूकपणे सजवणूक केली होती. सत्काराबरोबर चहापानाचा पण कार्यक्रम होता. हिरव्यागार गवताच्या गालिच्यावर छोटी–छोटी मेजे, पांढरेशुभ्र टेबलक्लॉथ टाकून मांडली होती. प्रत्येक मेजाच्या बाजूला चार खुर्च्या अशी व्यवस्था होती.

मुख्य पाहुण्यांकरता व खास पाहुण्यांकरता एक पांढरेशुभ्र टेबलक्लॉथ घातलेले मेज होते. ते मेज झेंडूच्या फुलांच्या माळांनी सजवले होते. मेयरसाहेब, त्यांच्या पत्नी व श्री. टाटांकरता खास आसने होती. मेयरसाहेबांची खुर्ची त्यांच्या पदाप्रमाणेच भव्य होती.

मुंबई शहर ! जगात काही नऊ आश्चर्ये आहेत त्यात मुंबई शहर हे दहावे म्हणून टाकायला हरकत नाही.

काही तरी ४५०–५०० वर्षांपूर्वी पोर्तुगीजांनी हे ' शहर ' मुसलमानांकडून जिंकून घेतले व तेथे आपले ठाण मांडले व त्याला म्हणू लागले बोंबेहिया–ह्याचा अर्थ चांगले बंदर व हेच नाव पुढे Bombay म्हणून मान्यता पावले, असे म्हणतात.

पोर्तुगीजांनी मुंबई घेतली त्या वेळी हा भाग मोठा रानवट व ओसाड होता. जेमतेम चारशे झोपडीवजा घरे व पाच हजार वस्ती ! ती मुख्यत्वेकरून कोळी, भंडारी व पाचकळशी लोकांची आणि सरकारी जमीनमहसूल किती असावा ? फेन्ट येऊ देऊ नका; फक्त साडेतीनशे रुपये !

इंग्रज त्या वेळी सुरतेला होते; पण त्या लुच्च्या लोकांचा डोळा ह्या ' चांगल्या बंदरा 'वर होता. ते मिळवण्याकरता ते खूप खटपटी–लटपटी करत होते. पोर्तुगीजांशी युद्ध करून मुंबई जिंकणे त्यांना शक्यच नव्हते. काय करून मुंबई मिळेल ? हा प्रश्न त्यांना सतावीत होता.

इंग्रजांच्या सुदैवाने तशी संधी घरबसल्या चालून आली. इंग्लंडच्या राजाचे–दुसऱ्या चार्लसचे–लग्न पोर्तुगालच्या राजकन्येबरोबर झाले व सासरेबुवांनी मुंबई–बेट जावयाला आंदण म्हणून देऊन टाकले ! हे सगळे झाले

सतराव्या शतकाच्या शेवटी–शेवटी !

इंग्लंडच्या राजाने ते 'आंदण' ईस्ट इंडिया कंपनीला भाड्याने वापरायला दिले. परत फेन्ट येण्याचा संभव आहे. भाडे–करार कंपनीने राजाला दरवर्षी शंभर सोन्याचे रुपये द्यावे असा होता !

आणि तेव्हापासून मुंबईची भरभराट सुरू झाली; पण जवळजवळ शंभर वर्षे ही भरभराट मुख्यत्वे व्यापार–उदीमाकरता होती. मोठाली कोठारे–मोठाल्या गोद्या वगैरे ह्या काळात बांधल्या गेल्या.

त्या वेळी राजकीय महत्त्व पुण्याला होते. अगदी पेशवाई बुडेपर्यंत इंग्रजांची रेसिडेन्सी मालवण–रत्नागिरी येथे होती. शनिवारवाड्यावर आपला चटेरी–पटेरी झेंडा लावून एल्फिस्टन मुंबईला गव्हर्नर म्हणून आला व आपल्या परळच्या राजप्रासादात–आताच्या हाफकिन-इन्स्टिटयूटमध्ये-रहावयास लागला.

त्यानंतरच्या शंभर वर्षांत मुंबईत काय काय झाले हे बघितले की माणूस थक्क होऊन जातो !

खरे म्हणजे एल्फिन्स्टनसाहेब मुंबईला येण्याआधीच म्हणजे एकोणिसावे शतक सुरू झाल्यालगोलग मुंबईचे सांस्कृतिक उत्थान सुरू झाले होते. इंग्रजांनी हिंदी सांस्कृतिक जीवनात फार मोठ्या प्रमाणात भाग घ्यायला सुरुवात केली होती.

कॅप्टन मोल्सवर्थसाहेबाने पहिला मराठी इंग्रजी–मराठी शब्दकोश प्रसिद्ध केला. तो येथल्या जीवनाशी इतका समरस झाला होता की, त्याला लोक मोलेश–शास्त्री वा मोरेश्वर–शास्त्री म्हणू लागले !

ह्याच काळात 'दिग्दर्शन' नावाचे पहिले मराठी मासिक राघोबा जर्नादनांनी काढले. पहिला सरकारी दवाखाना ह्याच वेळी निघाला व त्याचेच पुढे ग्रँट मेडिकल कॉलेज झाले. मुलींची पहिली शाळा निघाली. बॉम्बे लिटररी सोसायटी, की जी पुढे रॉयल एशियाटिक सोसायटी म्हणून मान्यता पावली, ती स्थापन झाली. 'वाहवा, वाहवा, चेंडू हा' हे प्रसिद्ध बाळगीत लिहिणारी मेरी कार्पेन्टर नुसती कवयित्री नव्हती. तिने मुलींकरता व 'निकृष्ट' वर्गाकरता शाळा काढल्या त्या ह्याच काळात !

ह्याच काळात चित्रशाळा छापखाना सुरू झाला. १८५७ मध्ये झालेल्या बंडाइतकीच महत्त्वाची घटना म्हणजे मुंबई, मद्रास व कलकत्ता येथे विश्वविद्यालयांची स्थापना मुंबई विश्वविद्यालयातून पास होणाऱ्या पहिल्या तुकडीत होती, महादेव गोविंद रानडे, रा. गो. भांडारकर, वामन आबाजी मोडक व बाळ मंगेश वागळे ही मंडळी !

हे नवीन पदवीधर व जगन्नाथ शंकरशेठ, कावसजी जहांगीर, दादाभाई नौरोजी वगैरे मंडळी नवीन सामाजिक व राजकीय विचार मांडू लागली. इंडियन नॅशनल कांग्रेस स्थापन झाली ती ह्याच काळात व ह्याच मुंबईत !

हे सगळे होत असताना मुंबईचा व्यापार-उदीम वाढत होता. कापडाच्या गिरण्या उभारल्या जात होत्या. दळणावळणकरता रेल्वेलाइन्स टाकल्या जात होत्या. मुंबईचे भव्य व्हिक्टोरिया–टर्मिनस स्टेशन १८८७ मध्ये बांधले गेले.

व्यापार–उद्योग वाढत गेला तशी मुंबईची संपत्ती, लोकसंख्या वाढत गेली. १८६२ मधले मुंबईचे वर्णन वाचले तर ते आत्ताचेच वर्णन आहे असे वाटते. मुंबईचे लोक मोठे धनिक आहेत व छान–छोकीला चटावले आहेत अशा तऱ्हेचे मुंबईकरांचे वर्णन होते,

१८६३ साली वर्णन केलेले मुंबईकर जसे आतासुद्धा फारसे बदललेले नाहीत तसेच त्या वेळचे प्रश्न व उत्तरे ह्यात आजसुद्धा फार फरक पडला नाही. त्या वेळच्या लेखकानेसुद्धा मुंबईची गर्दी वाढते आहे, ताबडतोब जर काही केले नाही तर पुढे फार बाका प्रसंग येणार आहे म्हणून धोक्याचा कंदील दाखवला होता ! दर वर्षी शेकडो लोकांची होणारी आवक जर ताबडतोब थांबली गेली नाही तर...

ती त्या वेळीही थांबवली गेली नाही. तेव्हा मुंबईची लोकसंख्या जेमतेम एक लाखाच्या घरात होती ! आता ती जवळजवळ अेक कोटीच्या घरात जाऊ पहात आहे. जेमतेम ३५० रुपये महसूल भरणाऱ्या मुंबईच्या आजच्या महापालिकेचे अंदाजपत्रक ५४० कोटींचे आहे ! हिंदुस्थानातल्या किती तरी राज्यसरकारांच्या अंदाजपत्रकांपेक्षा मोठे ! ¤

बरोबर सहाच्या ठोक्याला महापौर डॉ. पै व श्री. टाटा आले. टाटा आता जवळजवळ ऐंशी वर्षांचे आहेत. उंच, सडसडीत व गोरा रंग, वर अतिशय भारी पण टापटिपीचा इंग्रजी पोषाख, त्यामुळे ते आहेत त्यापेक्षा चांगलेच तरुण वाटतात !

कार्यक्रमाला सुरुवात होण्याआधी सगळे उठून उभे राहिले. राष्ट्रगीत वंदे मातरम् वाजवले गेले. त्या सगळ्या विलायती भपकाऱ्यांतले 'वंदे-मातरम्' ऐकून श्यामला बरे वाटले.

महापौरांनी प्रथम मराठीतून व नंतर इंग्रजीतून आपले भाषण केले. श्री. टाटा हे पहिले भारतीय विमान-चालक म्हणजे हवाई वाहतुकीचे पिता आहेत, वगैरे सर्वांस माहीत असलेली माहिती परत एकदा सांगितली व टाटांना एक चांदीची विमानाची प्रतिकृती भेट म्हणून दिली. देताना हे विमान तुम्हाला येथून घरी जायला उपयोगी पडेल असा जुजबी विनोदही केला श्रीमती टाटांकरता चांगली भारीपैकी शाल दिली. त्या आजारी असल्यामुळे येऊ शकल्या नव्हत्या.

सत्काराचे उत्तर देण्याकरता टाटा उभे राहिले. पहिली पाच–सहा मिनिटे त्यांच्या पुढ्यात छायाचित्रकारांचा असा गराडा होता की, त्यांना पहाणेच अशक्य झाले.

टाटांचे असंख्य कारखाने आहेत. उद्योगधंदे आहेत. त्यांच्या कारखान्यातून निर्माण होणाऱ्या हमाम या साबूशिवाय व टाटा शांपूशिवाय श्यामचा टाटा निर्मितीशी काही विशेष संबंध आला नव्हता. आता त्यांनी निर्मिलेल्या रेल-रुळावरून त्याने भारत भर प्रवास केला होता हा आणखी एक संबंधाचा धागा.

असे त्याचे धागे कित्येक कारखानदारांबरोबर होते; पण का कोणास ठाऊक, लाखो हिंदी लोकांप्रमाणे श्यामला फक्त ह्याच कारखानदाराबद्दल अेक आदर होता. आत्मीयता होती. कम्युनिस्ट भांडवलदारांचे, कारखानदारांचे चित्र कितीही भडक रंगात रंगवोत त्या रंगात टाटा श्यामलाच नव्हे, भारतीय जनतेला कधी दिसले नाहीत. आता हे स्पष्टच आहे की, टाटा भांडवलदार आहेत. अगदी पक्के भांडवलदार आहेत; पण हा माणूस पिळवणूक वगैरे करत असेल असे वाटत नाही.

श्यामवर टाटांच्या बॉबे-हाउस ह्या कचेरीत जाण्याचा प्रसंग आला होता. त्यांच्या एक-दोघा डायरेक्टर्सशी काही सामाजिक कामानिमित्त सबंध आला होता. त्यांच्या कचेरीत मोठे आनंदी व मोकळे वातावरण असावयाचे. अर्थात तेथेही शिस्त होती. कामे वेळच्या वेळी होत होतीच; पण तेथे कोणाचा कोणाला काच असेल असे वाटत नव्हते. टाटांच्या कचेरीत काम करणे हे अभिमानास्पद आहे असे सगळ्या कामगारांना वाटत होते.

टाटांनी मुंबईकरता काय केले नाही ? शंभर वर्षांपूर्वी शहराला वीज पुरवली, इस्पितळे काढली, नाटचगृहे काढली, समाजसेवाशिक्षणाच्या संस्था काढल्या. केवढी मोठी यादी होईल ह्या सगळचांची !

असे हे अठ्ठयाहत्तर वर्षांचे यश सत्काराचे उत्तर देत होते. अर्थात हे फक्त सत्काराचे उत्तर नव्हते; त्यात त्यांचे मुंबईच्या प्रश्नाबाबत विचार होते, शहराबद्दल वाटणारी आस्था होती; भवितव्याबाबत वाटणारी काळजी होती.

' मुंबईतली वस्ती वाढते आहे. यंत्रणेवर ताण पडतो आहे. ती कधीही कोलमडून पडेल ! घाण, दुर्गंधी वाढते आहे. हजारो लोक जनावरांपेक्षा वाईट स्थितीत रहात आहेत.

राज्यकर्त्यांच्या मनात असले तर सारे काही करता येईल. दिल्लीकडे पहा काही महिन्यांपूर्वी तेथेही झोपडपट्टचा होत्या; पण आता एकही झोपडी नाही ! कराचीकडे पहा. तेथेही हजारो निराश्रित आले होते; पण त्यांची योग्य व्यवस्था लावली गेली. आता ते शहर सुंदर व स्वच्छ झाले आहे.

ह्या शहराकरता महापालिकेने काही करायला पाहिजे आहे राज्य-सरकारने करायला पाहिजे आहे, प्रत्येकाने करायला पाहिजे आहे. माझ्यातर्फे होईल ते मी करतो आहेच.'

हे मात्र खरे होते. ह्या वयात टाटा गेट वे ऑफ इंडियापासून टाकण्यात येणाऱ्या एका भव्य पुलाच्या समितीचे अध्यक्ष आहेत. हा पूल झाला तर मुंबईची गर्दी अंशतः तरी कमी होणार आहे.

टाटा बोलत होते; पण त्यात नवीन असे काही नव्हते. वेगळे होते ती त्यांची तळमळ. ज्या शहरात आपण लहानाचे मोठे झालो व ज्याच्या विकासाकरता आपल्या कुटुंबाने व आपण हातभार लावला त्या शहराचे होणारे हाल त्यांना पहावत नव्हते. पुढे होणाऱ्या हालांच्या कल्पनेनेसुद्धा ते अस्वस्थ झाले होते.

' मी १९५० सालापासून राज्यकर्त्यांच्या मागे लागलो आहे की, मुंबईत येणाऱ्या लोकांचा लोंढा थांबवा, येथले उद्योगधंदे बाहेर न्या, आता गिरण्या बंद पडल्या आहेत. त्यातल्या काही परत सुरू करणे अशक्य आहे. महाराष्ट्रातच पण त्या मुंबईबाहेर न्या, म्हटले ' तर ' एकही गिरणी बाहेर जाणार नाही ' हे उत्तर !'

' येथल्या सरकारी कचेऱ्या बाहेर न्या – मंत्रालय व सचिवालय बाहेर न्या, त्याने गर्दी कमी होईल. नवी मुंबई झपाटचाने वाढवा !

' मुंबईतल्या इमारती मोडकळीला येत आहेत. त्यांची दुरुस्ती होत नाही. चाळीस वर्षांपूर्वी जे भाडे होते त्यात वाढ करू दिली जात नाही. त्यामुळे साधी स्वच्छता ठेवणे घरमालकांना अशक्य होते आहे. झोपडपट्टीचे लोक सर्व सेवांचा वापर करतात; पण काही सारा देत नाहीत. '

' भाडेकरू तेव्हढा गरीब आणि झोपडपट्टीवाला दरिद्री असे समीकरण बरोबर नाही. भाडे वाढवून द्यायला परवानगी द्या म्हणून विनवले तर एका मुख्यमंत्र्याने स्पष्टच सांगितले, ' टाटासाहेब घरमालकांपेक्षा भाडेकरू जास्त आहेत. ' त्या मुख्यमंत्र्यांचा इषारा अर्थातच निवडणुकीतल्या मतांकडे होता !'

टाटा बोलत होते, अगदी तळमळीने बोलत होते; पण असे वाटत होते की, त्यांना माहीत आहे की, आपले कोणी ऐकणार नाही आहे. अप्रिय पण अंतिम फायद्याचे असे धोरण वा कार्यक्रम मतावर येणारे कोणते लोकशाही सरकार हाती घेईल ? लोकशाहीचा हा दोष म्हणावा का ? श्यामच्या मनात विचार आला.

एखाद्या वाया गेलेल्या मुलाचे वडील ज्या विपण्णतेने मुलगा सुधारावा म्हणून बोलतात, मुलगा आता काही सुधारणार नाही हे त्यांना माहीत असते तरी बोलत रहातात, तसेच टाटांचे बोलणे वाटत होते.

अशा थोरा–मोठचाच्या सत्कार-समारंभाला उशीर नको म्हणून श्याम थोडासा लवकरच गेला होता. हळूहळू लोक येऊ लागले. लोक कसले ? रमेश मंत्र्यांनी म्हटल्याप्रमाणे ते 'समाजाचे लोणीच' होते म्हणजे Cream of the Society !

महाराष्ट्राचे मंत्री, उच्च-न्यायालयाचे न्यायाधीश, आजी आणि माजी शेरीफ, उच्च सरकारी व महापालिकेचे अधिकारी, परराष्ट्र वकिलातीतले अधिकारी, वकील, डॉक्टर्स, उद्योगपती ह्यांनी सगळे उद्यान भरून गेले. ललना म्हणता येतील अशा ह्या लोकांच्या बायका पण बरोबर होत्या हे वेगळे सांगणे नकोच ! त्यांचे कपडे–अत्तराचा वा विलायती सेंटचा सुवास, काही विचारू नये असा होता !

त्यातल्या फक्त नानी पालखीवाल्यांना श्यामने ओळखले. म्हणजे त्याची व पालखीवाल्यांची काही ओळख होती असे नाही. त्यांचे अंदाजपत्रकावरचे एक भाषण त्याने ऐकले होते एवढेच. बहुतेक मंडळी नानी पालखीवाल्यांच्या तोडीची होती म्हटले म्हणजे त्या समाज–लोण्याची कल्पना यावी.

□

मुंबई वार्ता

# पालखीवालांचे भाषण

'मुंबई वार्ता' सदरामध्ये एकाच विषयावर दुसऱ्यांदा लिहिण्याची ही पहिलीच वेळ !

गेल्वेअर्थसंकल्प जाहीर झाला. त्यातल्या जबरदस्त करवाढींनी सगळीकडेच खळबळ माजली. विशेषतः मासिक तिकिटाच्या अवाढव्य दरवाढीमुळे तर मुंबईकर चांगलेच हबकून गेले. त्याच्या निषेधासाठी राजकीय पक्षांनी सुरू केलेलं आणि जनतेनं चांगला भरघोस प्रतिसाद दिलेलं ' रेल रोको 'चं यशस्वी आंदोलन, सर्वसाधारण अर्थसंकल्पात झालेल्या दरवाढीच्या निषेधात निघालेले मोर्चे आणि त्यानं दुमदुमलेलं वातावरण.

५ मार्च मुंबईचं हे चित्र होतं. अर्थसंकल्पावरचं हे बोलकं भाष्य होतं.

त्याच दिवशी, दर वर्षीप्रमाणे, ' फोरम ऑफ फ्री इन्टरप्राईज ' तर्फे होणारं नानी पालखीवालाचं अर्थसंकल्पावरचं भाषण झालं.

' मागच्या वर्षीच्या आणि या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये काहीच फरक नाही. तीच वैशिष्टचहीनता, क्षुल्लकपणा आणि चतुरपणे केलेली फसवणूक, अगदी थेट मागच्या वर्षी होती तशीच.

उदाहरणार्थ अर्थसंकल्पामधली तूट १९०० कोटी रुपयांची दाखवण्यात आली आहे, पण यामध्ये राज्यसरकारांनी घेतलेल्या १७०० कोटी रुपयांच्या ओवरड्राफ्टचा समावेश नाही. तो आकडा लक्षात घेतला म्हणजे ही तूट २६०० कोटींची होते आणि एवढी मोठी तूट असण्याचा हा उच्चांक आहे.

ही तूट सरळ का मांडली गेली नाही ? उघड आहे. जनता घाबरू नये म्हणून.

करआकारणीचंही तसंच. ७१६ कोटींचे कर दाखवले गेले आहेत. पण रेल्वेअर्थसंकल्प आणि बाकीच्या वाढींमधून याअगोदरच लादले गेलेले १९०० कोटींचे कर लक्षात घेतले, तर ही करवाढ २६०० कोटींच्या वर जाते.

किमती तर वाढतच आहेत. सरकारी निवेदनांना न जुमानता त्या चढताहेत. होलसेल प्राइज बारा टक्क्यांनी वाढली आहे. कन्झ्युमर प्राइज आठ टक्क्यांनी वाढली आहे गेल्या वर्षभरात अन्नधान्य आणि भाजीपाल्याच्या किमतीत पंचवीस टक्क्यांनी वाढ झाली आहे. तेलाच्या किमती अख्ख्या जगात कुठेही वाढत नाहीत, इथे मात्र त्या फवाऱ्यासारख्या वर उसळत आहेत. इथे सरकारचीच मोनॉपली आहे आणि सरकारला प्रश्न विचारणारं कोणीही नाही.

आपल्या अर्थक्षेत्राची स्थिती फार चांगली किंवा फार वाईट कधीच नव्हती. पण आता मात्र सरकारनं 'गेटवेल शुभेच्छा कार्ड' दिलं आहे आणि अर्थातच या कार्डाची किंमतही आपल्यावरच्या करांतून वसूल होणार हे उघडच आहे !

तुमचे सगळे प्रश्न आणि आजार हे केवळ मानसिक आहेत, त्यामध्ये काही खरं नाही, असा सरकारचा दावा दिसतो. नाही म्हणायला प्रेशर कुकरच्या किमती दिलासा देणाऱ्या आहेत. पण अर्थसंकल्पानं पुरतं शिजवलेल्या माणसाला आता कुकरची आवश्यकताच नाही ! आयकरावरची सूट आहे. पण या सगळ्यांचा मिळून नेट परिणाम म्हणाल तर तो शून्य आहे. कुठलेही महत्त्वाचे बदल घडवून आणील असं काहीही कलम या अर्थसंकल्पात नाही.

भारताच्या अर्थजीवनाला ग्रासून टाकणाऱ्या अशा काही गोष्टी आहेत, आणि त्यांच्या कचाटयातून सोडवेल अशी काहीच आशादायक परिस्थिती दिसत नाही. एक तर कुठेही न नेता जागच्या जागी खिळवून ठेवील अशी हैड्रॉ-हेडेड नोकरशाही भारतात आहे. जगातली सर्वांत प्रबळ नोकरशाही आपल्याकडे असली पाहिजे. या हैड्रॉ-हेडेड नोकरशाही व्यतिरिक्त भारतीय अर्थव्यवस्थेचे चार आधारस्तंभ आहेत. एक अस्थिरता दोन गुंतागुंत आणि गोंधळ. तीन अन्याय घटनेची उपेक्षा आणि घटनात्मक अनैतिकता आणि चार क्षुल्लक, किरकोळ गोष्टींवर खर्च केलेली शक्ती, आणि त्यांना दिलेलं महत्त्व.

गुंतागुंतीची आणि सामान्य माणसाला यत्किंचित न समजणारी भाषा. अशा भाषेत केलेल्या कायद्यांच्या दुरुस्त्या. त्याचा अर्थ कोणाला कळू नये अशी घेतलेली दक्षता आणि त्यांची अनावश्यकता, त्यामागे असणारा योजनेचा अभाव. गेल्या दहा वर्षांत असे बावीस बदल झाले. त्रेपन्न हजार सरकारी नोटिफिकेशन्स काढली गेली की, ज्यातल्या प्रत्येकाला कायद्याचं वजन होतं. या बदलांची, त्यामध्ये केलेल्या वेळ आणि विचाराच्या उधळपट्टीची, धोरणांमध्ये सतत परिवर्तनं करण्याची काही आवश्यकता होतीच का ?

या देशात पाच हजार जकात...चेकनाकी आहेत. त्या ठिकाणी होणाऱ्या ढिलाई आणि दिरंगाईचा परिणाम ऐका. या सर्व ठिकाणी जकात भरण्यासाठी वाहनांना किती थांबावं लागतं आणि त्यातून किती इंधन वाया जातं माहीत आहे ? एकूण इंधनाच्या पंधरा टक्के. एक ट्रक सरासरीनं बारा माणसांना काम मिळवून देतो आणि असे अठरा हजार ट्रक्स फुकट जातात. म्हणजे यामधून केवढे मॅन–अवर्स फुकट जातात याची कल्पना करा आणि शिवाय हे सर्व बेकारीच्या पार्श्वभूमीवर !

आणि हे वाया जाणं कशासाठी ? सरकारी तिजोरीत जकात जमा व्हावी म्हणून ? मुळीच नाही. हे सर्व भत्ते–हप्ते मिळवण्यासाठी ! अगदी खालच्या कारकून–शिपायापासून ते थेट वरच्या अधिकारी–मंत्र्यांपर्यंत सर्वांचे हात ओले व्हावेत आणि खिसे भरावेत म्हणून ! हे सर्व उत्पादकतावर्षाच्या पार्श्वभूमीवर पहा, म्हणजे कळेल परिस्थिती किती भयाण आहे ते.'

गच्च भरलेली सभा एकदम स्तब्ध झाली. पालखीवालांचा आरोपच तसा दणदणीत होता. तोही रोख–ठोक, खुल्लम खुल्ला ! जर–तर नाही, लपवा–छपवी नाही की, सांसदीय चतुराई नाही. भ्रष्टाचाराचा उघड आरोप त्यात होता.

'कायद्यातल्या बदलाबदलीचा मुद्दा घ्या. इकडे इंग्लंडसारख्या देशात कायदा सोपा, आटोपशीर होत चालला आहे. आपल्याकडे मात्र तो अधिक जटिल, किचकट होतो आहे. या अर्थसंकल्पात संबंधित कायद्यामध्ये इतक्या दुरुस्त्या सुचवलेल्या आहेत की, त्याला 'फायनान्स बिल' ऐवजी सरळ 'टॅक्स अमेन्डमेन्ट बिल' म्हणायला हवं. गुंतागुंतीच्या कायद्यांनी वर्षानुवर्षं अधिकाधिक खटले न्यायालयात खितपत पडताहेत. आज प्रविष्ट केलेलं प्रकरण बहुधा पुढच्या शतकातच निकालात निघेल, अशी परिस्थिती आहे; पण इलाज नाही. अर्थसंकल्प म्हणजे सरकार प्रतिष्ठेचा प्रश्न करून ठेवतं. या सगळ्या निरर्थक प्रकारात वेळेचा, वैचारिक शक्तीचा अपव्यय होतो आहे. विधायक कामं करायला अधिकाऱ्यांना वेळ कुठून उरणार ?

जनावरांची पैदास, मश्रूम्स वाढवणं इत्यादींच्या उत्पन्नाबाबत, करसुटीचं जे विवेचन केलं आहे ते बघा. क्षुल्लक आणि अनावश्यक तपशिलांनी बुजबुजलेलं आहे ते पहा. १९ एप्रिल १७४७ मध्ये असा एक हास्यास्पद, क्षुल्लक गोष्टींना महत्त्व देण्याचा प्रकार झाला होता. इंग्लंडमध्ये एका माणसाचं डोकं उडवायचं होतं. त्यानं चष्मा मागून घेतला. तो तयार करून शक्य तितक्या लवकर त्याला आणून देण्यात आला. कशासाठी ? तर आपल्या शवपेटीवरचं नाव बरोबर आहे की नाही हे त्याला वाचता यावं म्हणून ! अर्थसंकल्पामधल्या दुरुस्त्या इतक्या किरकोळ आणि हास्यास्पद आहेत !

या बदलांनी कसा गोंधळ माजवला आहे त्याचं हे उदाहरण पहा. मागच्या अर्थसंकल्पानं भांडवल–गुंतवणूक रोख्यांची योजना जाहीर केली. प्रत्यक्ष विक्री सुरू व्हायला ऑगस्ट उजाडला ! त्या वेळच्या योजनेप्रमाणे भागीदारी व्यवसायांनाही हे रोखे घेण्याची परवानगी होती. फेरबदलाप्रमाणे फक्त व्यक्ती आणि संयुक्त हिंदू कुटुंबं ते घेऊ शकतात. म्हणजे बाकीच्या रोखे खरेदी करणारांना सरकारनं चक्क फशी पाडलं. आयुर्विमा पॉलिसी घेतल्याबद्दल करातून मिळणाऱ्या सुटीबद्दलही असेच तापदायक

पृष्ठ २७ वर

सातवी अलिप्त राष्ट्र परिषद

# शिखर गाठण्यासाठी बराच चढ चढायचा आहे !

वा. दा. रानडे

दिल्लीतील अलिप्त राष्ट्रांच्या सातव्या शिखरपरिषदेने काय साधले? अलिप्त राष्ट्रांचे चळवळीस त्यामुळे खरोखर बळकटी आली का ? चळवळीचे पाऊल पुढे पडले का ? जागतिक राजकारणावर परिणामकारक ठसा उमटविण्याइतके या चळवळीचे सामर्थ्य वाढले आहे का ? की अलिप्तांच्या सामर्थ्य-प्रदर्शनाचा तो केवळ एक मोठा देखावा होता ? अलिप्त परिषदेसंबंधी देशात व परदेशात ज्या अनुकूल-प्रतिकूल प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आल्या त्यात अलिप्तपणे व्यक्त केलेल्या प्रतिक्रिया फार थोड्या होत्या. बेलग्रेड ते दिल्लीपर्यंत गेल्या बावीस वर्षांत अलिप्त चळवळीची जी वाटचाल झाली तिचा जास्तीत जास्त वस्तुनिष्ठ म्हणजेच अलिप्त दृष्टिकोनातून आढावा घेण्याचा हा प्रयत्न आहे.

येथे प्रथमच एक मूलभूत प्रश्न उपस्थित होतो. देश आणि माणसे खरोखर कितपत अलिप्त असतात ? ती अलिप्त राहू शकतात का ? आणि ती अलिप्त राहू शकली तरी अलिप्तता हे सर्वच परिस्थितीत स्वीकारार्ह असे मूल्य मानता येईल का ? अलिप्त चळवळीची बैठक समजून घेण्यासाठी या प्रश्नांचा विचार पुन: एकदा नव्याने आणि नव्या संदर्भात करायला हवा. त्यासाठी अलिप्त चळवळीच्या उगमाकडे गेले पाहिजे.

अलिप्त राष्ट्रांची पहिली परिषद बेलग्रेड येथे १९६१ मध्ये झाली. त्या वेळी अमेरिका आणि रशिया या दोन बड्या राष्ट्रांमध्ये थंड्या लढाईचा तणाव आणि अण्वस्त्रांची स्पर्धा इतकी वाढली होती की, त्यातून अण्वस्त्रयुद्धाचा भडका उडून संबंध जगाचाच संहार होण्याची भीती वाटत होती. अमेरिका आणि रशिया या दोन राष्ट्रांनी जगाची दोन गटात विभागणी केली होती. आपापले गट लष्करीदृष्ट्या बळकट करायचे, तेथे लष्करी तळांचे जाळे उभारावयाचे अशा योजना त्यांनी आखल्या होत्या. त्यातून उद्‌भवणारे जागतिक अण्वस्त्रयुद्ध टाळणे हा शांतताप्रेमी देशांपुढील पहिल्या क्रमांकाचा प्रश्न होता. बेलग्रेड परिषदेत पंडित नेहरूंनी त्याला प्राधान्य दिले. परिषदेसाठी नेहरू दिल्लीहून विमानाने निघाले त्याच दिवशी नव्या अण्वस्त्र-चाचण्या सुरू करण्याचा निर्णय रशियाने जाहीर केला होता. नेहरूंनी बेलग्रेडला पोचल्यावर टिटो, नासर, सोकार्नो व इतर नेत्यांची भेट घेऊन परिषदेत जागतिक शांततेच्या प्रश्नाला प्राधान्य देण्यावर भर दिला. परिषदेने त्यानुसार बड्या राष्ट्रांना अण्वस्त्र-चाचण्या थांबवून शस्त्रकपात करण्याचे आवाहन केले. पंडित नेहरू तेवढ्यावरच थांबले नाहीत. मास्को व वॉशिंग्टनला भेट देऊन त्यांनी याबाबत क्रुशोव्ह आणि केनेडी यांच्याशीही बोलणी केली.

## नाही तर शाब्दिक बुडबुडाच !

आज पुन्हा तशीच परिस्थिती निर्माण झालेली आहे. दोन्ही बड्या राष्ट्रांत पुन: तणाव वाढत आहेत. त्यांची शस्त्रस्पर्धा तसेच आपापले प्रभावक्षेत्र वाढविण्याची स्पर्धा चालूच आहे. जिनिव्हा येथील शस्त्रकपात वाटाघाटीत काहीही प्रगति झालेली नाही. दिल्लीच्या अलिप्त राष्ट्रपरिषदेने दोन्ही बड्या राष्ट्रांना अण्वस्त्रांचे उत्पादन व चाचण्या थांबविण्याचे आणि शस्त्रकपातीचा करार करण्याचे आवाहन केले आहे.

पण या आवाहनास या बड्या राष्ट्रांचे नेते कितपत प्रतिसाद देतात, आंद्रोपोव्ह आणि रेगन यांची भेट होऊन त्यांच्यात शस्त्रकपातीचा करार होतो काय यावर अलिप्तांचा प्रभाव किती याची खरी कसोटी लागणार आहे. अलिप्त परिषदेच्या अध्यक्ष या नात्याने याबाबत पंतप्रधान श्रीमती गांधींना आता पुढची पावले टाकावी लागणार आहेत. रेगन व आंद्रोपोव्ह यांची भेट घेऊन शिखरपरिषदेसाठी त्या प्रयत्न करतील.एकशे-एक राष्ट्रांच्या संघटनेच्या नेत्या या नात्याने त्यांच्याशी बोलणी करून या दोन बड्या नेत्यांची शिखरपरिषद त्या घडवून आणू शकल्या तर ते त्यांचे मोठेच यश ठरेल यात शंका नाही.

याबाबतीतल्या त्यांच्या प्रयत्नांना वजन येण्यासाठी अलिप्त राष्ट्रे आपसातले प्रश्न शांततेच्या व वाटाघाटींच्या मार्गाने सोडविण्याचे प्रयत्न करीत आहेत आणि त्यात प्रगती होत आहे असे काही तरी त्यांना या बड्या नेत्यांना दाखविता आले पाहिजे. दिल्लीची अलिप्त परिषद चालू असतानाच भारत आणि पाकिस्तान यांच्यात संयुक्त आयोग नेमण्याच्या करारावर सह्या झाल्याही त्या दृष्टीने महत्त्वाची घटना होय. परिषदेवर एक चांगला परिणाम करण्याच्या दृष्टीने इंदिरा गांधींनी या करारावर सहीसाठी हीच वेळ योजनापूर्वक ठरवून ठेवली असावी असा विचार मनात येतो.

इराक-इराण युद्ध थांबविण्याचा निर्णयही दिल्ली परिषदेत घेतला जावा अशी श्रीमती गांधींची इच्छा होती. त्यांनी त्यासाठी बरेच प्रयत्नही केले. परिषदेच्या राजकीय निवेदनातही इराक-इराण युद्ध थांबविण्याचा उल्लेख करण्यास इराणने विरोध केला. तेव्हा अखेर इंदिरा गांधींनी आपल्या समारोपाच्या भाषणात या दोन देशांना युद्ध थांबविण्यासंबंधी आवाहन करावे असे ठरले आणि इराक व इराणने त्यास मान्यता दिली. हा धागा आता पुढे पकडून हे युद्ध थांबविण्याचे प्रयत्न इंदिरा गांधींना करा-

यला हवेत. त्यांत त्यांना कितपत यश येते, यात अलिप्त राष्ट्रांच्या नेत्या म्हणून कितपत प्रतिष्ठा आहे याची कसोटी लागणार आहे. शांततेच्या मार्गावर अशी काही भरीव कृती अलिप्तांच्या संघटनेकडून होत नाही तोपर्यंत तिची निवेदने म्हणजे केवळ शब्दांचा बुडबुडा अशीच अलिप्तताविरोधी राष्ट्रांची प्रतिक्रिया राहील.




## अफगाणिस्तान .... कांपुचिया

अमेरिकेचे अध्यक्ष रेगन यांनी अलिप्त राष्ट्र-परिषदेस शुभेच्छा संदेश पाठविला हे अमेरिकेच्या बदललेल्या धोरणाचे निदर्शक होते. अलिप्तांच्या संघटनेस अमेरिकेचा पाठिंबा आहे असा याचा अर्थ नाही; पण ही संघटना म्हणजे जागतिक राजकारणातला एक महत्त्वाचा प्रवाह आहे, त्याला डावलून चालणार नाही ही जाणीव अमेरिकेस झाली आहे. रेगन यांनी आपल्या संदेशात या संघटनेच्या तत्त्वांनाही पाठिंबा दर्शविला. ' जगापुढील आजच्या अनेक प्रश्नांवर उत्तरे शोधायची असतील तर अलिप्त संघटना-पुरस्कारित असलेल्या शांतता, स्थैर्य, सार्वभौमत्व या उद्दिष्टांचा पुरस्कार आपण सर्वांनीच करायला हवा ' असे त्यांनी म्हटले होते; पण परिषदांना पाठविले जाणारे संदेश औपचारिक असतात, त्यात फारसा अर्थ पहायचा नसतो हेही लक्षात घेतले पाहिजे.

अलिप्त राष्ट्रांचा रशियापेक्षा अमेरिकेला अधिक विरोध आहे. अलिप्तांची अलिप्तता रशियाच्या बाजूला अधिक झुकली आहे अशी टीका अमेरिकेने अनेकदा केली आहे. अलिप्त राष्ट्रांचा अमेरिकेला असलेला विरोध कमी व्हावा असे प्रयत्न करण्याची आवश्यकता अमेरिकेलाही वाटू लागली आहे.

अलिप्त संघटना रशियाच्या बाजूला अधिक झुकू नये असा अमेरिकेचा प्रयत्न आहे. हा कल रोखणाऱ्या दोन महत्त्वाच्या घटना म्हणजे अफगाणिस्तानातील रशियाचा लष्करी हस्तक्षेप आणि कांपुचियातील व्हिएटनामचा लष्करी हस्तक्षेप. हे दोन्ही प्रश्न दिल्लीच्या परिषदेत गाजले. अफगाणिस्तानातून रशियन फौजा काढून घ्याव्या असा स्पष्ट उल्लेख राजकीय निवेदनात करावा की नाही यावर मतभेद झाले. हिंदी महासागराच्या संदर्भात दिएगो. गार्शियाचा उल्लेख केला जाणार असेल तर अफगाणिस्तानातून रशियन फौजा काढण्याचा उल्लेख करायलाच हवा असा आग्रह काही देशांनी धरला होता. अखेर कोणाचाच नामनिर्देश न करता परकीय फौजा, परकीय तळ काढून घ्यावेत असा मोघम उल्लेख निवेदनात करण्यात आला. कांपुचियाची जागा हॅवाना परिषदेप्रमाणेच या वेळीही रिकामी ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. हे दोन्ही प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने दिल्लीत फारशी प्रगती झाली नाही.

अफगाणिस्तानचा प्रश्न हा अलिप्त संघटनेच्या दृष्टीने खरोखर कसोटीचा प्रश्न आहे. अफगाणिस्तान कोणत्याही गटात नसलेला अलिप्त देश होता. रशियाने तेथे लष्करी हस्तक्षेप करून बाब्राक कारमाल यांच्या नेतृत्वाखाली आपल्या बाजूचे सरकार तेथे स्थापन केले. अफगाणिस्तानला आपल्या प्रभावक्षेत्राखाली आणण्याच्या अमेरिकेच्याही हालचाली चालू होत्या. रशियाने लष्करी हस्तक्षेप करून आपल्या बाजूचे सरकार अफगाणिस्तानामध्ये आणल्याने त्या देशाची अलिप्तताच नष्ट झाली आहे. अफगाणिस्तान आता अलिप्त देश राहिलेला नाही, तेव्हा त्याला दिल्ली परिषदेत प्रतिनिधित्व कसे दिले ही काही पाश्चात्य देशांनी केलेली टीका तत्त्वतः बरोबर आहे हे मान्य करायला हवे. कांपुचियाप्रमाणेच अफगाणिस्तानची जागा रिकामी ठेवायला हवी असे त्यांचे म्हणणे होते. अफगाणिस्तानला त्याची अलिप्तता परत मिळवून देणे हा अफगाणिस्तानचा प्रश्न सोडविण्याचा खरा मार्ग आहे. त्यासाठी रशियाने फौजा काढून घेणे, अमेरिका, चीन आदी देशांची बंडखोरांना मदत व बाह्य हस्तक्षेप थांबणे आणि अफगाणिस्तानात खुल्या निवडणुका घेऊन आपल्याला कोणते सरकार हवे ते निवडण्याचा हक्क तेथील जनतेला देणे, तसेच अफगाणिस्तान अलिप्त राहील, आम्ही तेथे कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप करणार नाही अशी हमी रशिया व अमेरिकेने देणे या पायावरच हा प्रश्न सोडविता येईल. संबंधित राष्ट्रात अनौपचारिक बोलणी घडवून आणून समझोत्याचे प्रयत्न करण्याच्या उद्देशाने संयुक्त राष्ट्रसंघटनेचे सरचिटणीस क्युलर परिषदेला स्वतः उपस्थित राहिले होते; पण त्यांच्या प्रयत्नांना फारसे यश आले नाही. एका अलिप्त देशाची अलिप्तता नष्ट झाली आणि अलिप्तांची संघटना त्याबाबत काही करू शकली नाही, यात त्या संघटनेचा दुबळेपणा दिसून आला हे स्पष्टपणे मान्य करायला हवे. अलिप्त परिषदेच्या अध्यक्ष या नात्याने या प्रश्नावर समझोत्याचे प्रयत्न इंदिरा गांधींना पुढे चालू ठेवायला हवेत.

## दिएगो गार्शियाचे काय ?

कांपुचिया प्रश्नही अलिप्ततेच्या तत्त्वाच्या आधारेच सोडवायला हवा. तेथे सध्या हेंग-समारेन यांचे व्हिएटनामच्या प्रभावाखालील सरकार आहे. व्हिएटनामी फौजांच्या पाठिंब्यावरच ते टिकून आहे. व्हिएटनाम-विरोधी शक्तींनी प्रिन्स सिहनुक यांच्या नेतृत्वाखाली प्रतिस्पर्धी सरकार स्थापन केले आहे. त्याला चीनचा व आग्नेय आशिया देशांच्या संघटनेचा पाठिंबा आहे. तेथे यादवी युद्ध चालू आहे. सर्व परकीय फौजा काढून घेऊन कांपूचियाच्या लोकांना स्वतःचे भवितव्य स्वतः ठरवू देणे आणि त्या देशाच्या अलिप्ततेची हमी देणे हाच तेथील प्रश्नावर तोडगा आहे. इंदिरा गांधींना हा प्रश्न सोडविण्यासाठीही नव्याने प्रयत्न करावे लागतील. वादग्रस्त व मतभेदाचे उल्लेख टाळल्याने राजकीय निवेदन मंजूर झाले तरी वाद अनिर्णितच राहिले. अलिप्त संघटनेच्या तत्त्वांच्या आधारेच ते सोडविण्याचे प्रयत्न चालू ठेवायला हवेत.

आशियाच्या दृष्टीने आणखी एक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे हिंदी महासागर शांतता विभाग म्हणून घोषित करण्याचा. त्यासाठी तेथील परकीय लष्करी तळ काढून घेण्याची मागणी परिषदेने केली आहे; पण डिएगो-गार्शिया या अमेरिकेच्या मोठ्या तळाचा त्यात नाव घेऊन उल्लेख केलेला नाही. या तळाचा उल्लेख करायचा तर रशियाच्या तळांचाही उल्लेख करायला हवा अशी काही देशांची मागणी होती व ती तत्त्वतः बरोबर होती. डिएगो गार्शियाचा उल्लेख वगळण्याचा आग्रह श्रीलंकेने धरला. संयुक्त राष्ट्रसंघटनेने हिंदी महासागर विभागातील राष्ट्रांची एक समिती स्थापन केलेली आहे. अमेरिकेच्या विरोधामुळे या राष्ट्रांची परिषद होऊ शकलेली नाही. डिएगो गार्शियाचा उल्लेख निवेदनात केला तर अमेरिकेचा विरोध अधिकच वाढेल व परिषद भरवण्यात अडचणी वाढतील अशी श्रीलंकेची भूमिका होती. डिएगो-गार्शियाचा उल्लेख या संदर्भात केलेला नसला तरी डिएगो गार्शिया बेट आपल्याला परत मिळायला हवे. या मॉरिशसच्या मागणीला निवेदनात पाठिंबा दिला आहे. आंतरराष्ट्रीय न्यायालयात हा प्रश्न नेऊन निर्णय लावून घेण्याचा प्रयत्न करायला हवा.

## अमेरिकेचा ' व्हेटो '

नामीबियाचे स्वातंत्र्य आणि दक्षिण आफ्रिकेतील वर्णभेद हे आफ्रिकेच्या दृष्टीने दोन महत्त्वाचे प्रश्न होते. दक्षिण आफ्रिकेतील वर्णद्वेष्टया गोऱ्या राजवटीशी लढा करूनच हे दोन्ही प्रश्न सोडवायला हवेत अशी आता आफ्रिकन राष्ट्रांची खात्री झाली आहे. दक्षिण आफ्रिकेला आपले धोरण बदलणे भाग पाडण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघटनेने नाकेबंदीचे ठराव केले; पण अमेरिका व काही पाश्चात्य राष्ट्रे दक्षिण आफ्रिकेची पाठिराखी असल्याने ते परिणामकारक ठरत नाहीत. आपल्या आंतरराष्ट्रीय हितसंबंधांचे रक्षणासाठी दक्षिण आफ्रिकेतील लष्करी तळ अमेरिकेला महत्त्वाचे वाटतात. त्यामुळे दक्षिण आफ्रिकेला अमेरिका दुखवू इच्छित नाही व तिच्या पाठिंब्यानेच दक्षिण आफ्रिका आपले वर्णद्वेष्टे व वसाहतवादी धोरण पुढे चालू ठेवीत आहे. या दोन्ही प्रश्नांवर आफ्रिकन जनतेच्या पाठीशी आपण आहोत असे अलिप्त परिषदेने निस्संदिग्धपणे पुनः एकदा जाहीर केले.

अरब राष्ट्रांच्या दृष्टीने इस्राइलने अरबांचा बळकावलेला प्रदेश सोडणे, लेबानन-मधून आपल्या फौजा काढून घेणे आणि पॅलेस्टिनी अरबांचे स्वतंत्र राज्य स्थापन करणे, हे प्रश्न महत्त्वाचे आहेत. त्यांच्या मागण्यांना अलिप्तांच्या संघटनेने नेहमीच पाठिंबा दिलेला आहे. दिल्लीच्या परिषदेतही हीच भूमिका पुनः एकदा मांडण्यात आली. दक्षिण आफ्रिकेप्रमाणे इस्राइलबाबतही संयुक्त राष्ट्रसंघटनेने नाकेबंदीचे ठराव केले; पण अमेरिकेने त्यावर नकाराधिकार (व्हेटो) वापरला. लेबाननमधील इस्राइलच्या आक्रमणासंबंधीच्या ठरावावरही अमेरिकेने नकाराधिकार वापरला. लेबाननमधील इस्राइलच्या आक्रमणास अमेरिकेचा पाठिंबा होता अशीही माहिती नंतर प्रकाशात आलेली आहे. पॅलेस्टिनींचा प्रश्न सुटत नाही तोपर्यंत अरबातील असंतोष असाच धुमसत राहणार. याबाबतीत जागतिक लोकमताचे दडपण इस्राइलवर आणि अमेरिकेवर आणणे एवढेच अलिप्त संघटना करू शकते.

## आर्थिक विकासाकडे दुर्लक्ष

दक्षिण आफ्रिकेतील राष्ट्रे हा अलिप्त राष्ट्रसंघटनेतील तिसरा महत्त्वाचा गट. ही राष्ट्रे स्वतंत्र असली तरी अमेरिकेच्या प्रभावाखाली व आर्थिक वर्चस्वाखाली आहेत. हा प्रभाव झुगारून आपले स्वतंत्र धोरण आखण्याचा ती प्रयत्न करीत आहेत. क्यूबात क्रांती होऊन कम्युनिस्ट राजवट आली हा या भागातील अमेरिकन वर्चस्वाला बसलेला पहिला मोठा हादरा. कस्ट्रोंची राजवट पाडण्याचे अमेरिकेने प्रयत्न केले; पण ते अयशस्वी झाले. क्यूबा हे कम्युनिस्ट गटातील राष्ट्र. त्याला अलिप्त राष्ट्रसंघटनेने आपल्यात सामील कसे करून घेतले अशी पाश्चात्य देशांची टीका आहे. अलिप्ततेच्या काटेकोर अर्थाने ती बरोबर असली तरी क्यूबा अलिप्त राष्ट्रांना जवळचा का वाटतो हे समजून घेतले पाहिजे. आफ्रिकेतील दक्षिण आफ्रिका विरोधी लढयाला क्यूबाने आपले सैनिक पाठवून सक्रिय मदत केलेली आहे. क्यूबाच्या मदतीमुळेच दक्षिण आफ्रिकेच्या आक्रमणापासून आम्ही आपले स्वातंत्र्य टिकवू शकलो असे अंगोलाचे नेते म्हणत आहेत. काही आफ्रिकन राष्ट्रांच्या सूचनेवरूनच क्यूबास अलिप्तांच्या संघटनेत सामील करून घेण्यात आले. पुढे सहावी अलिप्त राष्ट्रपरिषद हॅवानास झाली आणि संघटनेचे अध्यक्षपद तीन वर्षे क्यूबाकडे होते. ' समाजवादी राष्ट्रे अलिप्त राष्ट्रांची स्वाभाविक मित्र आहेत ' अशी भूमिका हॅवाना परिषदेच्या मसुद्यात कॅस्ट्रो यांनी मांडली होती; पण बाकी राष्ट्रांचा तिला विरोध असल्याचे दिसताच त्यांनी त्याबद्दल आग्रह धरला नाही आणि ते वाक्य मसुद्यातून वगळले. हीच भूमिका दिल्ली परिषदेनेही पुढे चालू ठेवली. 'आमचे स्वाभाविक, अस्वाभाविक मित्र कोणी नाहीत !' अशा शब्दात इंदिरा गांधींनी कॅस्ट्रो यांची भूमिका आपणास मान्य नसल्याचे दर्शविले.

क्यूबानंतर निकाराग्वा यामध्ये अमेरिकेतील देशात कम्युनिस्ट राजवट अधिकारावर आली आहे. एल् साल्व्हाडोरमध्ये कम्युनिस्ट गनिमी फौजा तेथील सरकारविरुद्ध लढत असून सरकारला अमेरिकेची मदत आहे. अमेरिकेचा हा हस्तक्षेप थांबला पाहिजे या मागणीस अलिप्त राष्ट्रपरिषदेने पाठिंबा दर्शविला आहे. दक्षिण अमेरिकन राष्ट्रांच्या दृष्टीने आर्थिक स्वातंत्र्याचा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे.

केवळ दक्षिण अमेरिकेच्या दृष्टीनेच नव्हे तर अलिप्त राष्ट्रसंघटनेच्या आर्थिक विकासाचा प्रश्न महत्त्वाचा आहे. पंतप्रधान श्रीमती गांधींनी उद्घाटनाच्या भाषणात आर्थिक प्रश्नांवर भर दिला होता; पण परिषदेत राजकीय प्रश्नांवरच अधिक चर्चा झाली. आर्थिक प्रश्नांना त्यामानाने कमी वेळ दिला गेला. राजकीय निवेदनात शस्त्रांवरचा खर्च कमी करण्याची मागणी केली आहे. शस्त्रांवर आणि लष्करी सामर्थ्य वाढविण्यावर फार मोठ्या प्रमाणात खर्च केला जात असल्याने विकासाला पैसा कमी पडतो. शस्त्रकपात व विकास हे प्रश्न याप्रमाणे एकमेकांशी निगडित आहेत. एका अण्वस्त्रसज्ज विमानवाहू जहाजास चार अब्ज रुपये खर्च येतो. जगातील ५३ देशांचे राष्ट्रीय उत्पन्नसुद्धा एवढे नाही, याकडे श्रीमती गांधींनी लक्ष वेधले आणि सारा पैसा शस्त्रांवरच खर्च झाला तर विकासाला काय उरणार असा प्रश्न उपस्थित केला. विकसनशील देशांच्या विकासासाठी संपन्न राष्ट्रांनी अधिक प्रमाणात मदत करायला हवी. विकसनशील देशांच्या व्यापारवाढीस पूरक असे धोरण विकसित देशांनी स्वीकारले पाहिजे. जगाच्या अर्थव्यवस्थेची नव्या पायावर उभारणी करायला हवी. विकसनशील देशांवर कर्जाचा मोठा बोजा आहे. या कर्जाचा काही भाग माफ केला पाहिजे किंवा कर्जफेडीची मुदत वाढवून दिली पाहिजे. या प्रश्नांच्या विचारासाठी विकसित व विकसनशील देशांची जागतिक परिषद भरविण्याची सूचना आर्थिक निवेदनात केली आहे. श्रीमती गांधींना त्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतील. संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या येत्या बैठकीस जगातील राष्ट्रप्रमुखांनी उपस्थित रहावे आणि विकसनशील देशांपुढे असलेल्या आर्थिक व इतर प्रश्नांचा विचार त्यांनी करून काही योजना आखावी असा प्रयत्न त्या करणार आहेत.

विकसित देशांकडून मदत मिळविण्याचे प्रयत्न तर करायला हवेतच; पण त्याचबरोबर विकसनशील देशांनी आपसातील सहकार्य वाढवून विकास करण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे यावरही आर्थिक निवेदनात भर दिला आहे. श्रीमती गांधींनीही आपल्या भाषणात याच मुद्द्यावर विशेष भर दिला. विकसित व विकसनशील देश यांची जागतिक परिषद भरविण्याच्या प्रयत्नांबरोबर विकसनशील देशांची वेगळी परिषद भरविण्याचे प्रयत्न होणेही आवश्यक आहे त्यातून या देशांचे एकमेकांशी सहकार्य वाढेल.

दिल्ली परिषदेत राजकीय निवेदन आर्थिक निवेदने, दिल्ली संदेश आणि सामुदायिक स्वावलंबनासंबंधीचे निवेदन मंजूर करण्यात आले. यापैकी दिल्ली संदेश म्हणजे राजकीय व आर्थिक निवेदनाचाच सारांश आहे; पण सामुदायिक स्वावलंबनासंबंधीचे निवेदन महत्त्वाचे आहे. समता, न्याय, एकमेकांचे हित, एकमेकांचे स्वातंत्र्य व सार्वभौमत्वाबद्दल पूर्ण आदर या तत्त्वांवर हे सामुदायिक स्वावलंबन व्हावयाचे आहे. केवळ अलिप्त संघटनेतलेच देश नव्हेत तर या संघटनेबाहेरच्या देशांचेही आर्थिक सहकार्य वाढविण्याकडे लक्ष वेधले आहे. स्वतःची साधनसंपत्ती, कौशल्य आणि तंत्रज्ञानावर भर देऊन विकास साधण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

## आव्हाने पेलतील ?

दिल्लीच्या परिषदेची फलश्रुति काय? अलिप्त राष्ट्रसंघटना ही आता संयुक्त राष्ट्र परिषदेच्या खालोखाल जगातील सर्वांत मोठी संघटना झालेली आहे. संयुक्त राष्ट्रसंघटनेचे दोनतृतियांश सभासद या संघटनेत आहेत. बेलग्रेडला पहिली परिषद भरली तेव्हा पंचवीस सभासद होते. ती संख्या वाढत वाढत आता १०१ पर्यंत गेली आहे. प्रत्यक्ष कृतीच्या दृष्टीने फारसे भरीव कार्य ती आतापर्यंत करू शकलेली नाही; पण जगापुढील महत्त्वाच्या प्रश्नांवर १०१ देशांचा आवाज मांडणारी ती एक शक्ती झालेली आहे. या संघटनेतील सर्वच राष्ट्रे काटेकोर अर्थाने अलिप्त आहेत, असे म्हणता येणार नाही. क्यूबा, व्हिएतनाम अफगाणिस्तान ही उघड कम्युनिस्ट गटातील राष्ट्रे आहेत; पण त्याचबरोबर अमेरिकेकडून मोठ्या प्रमाणावर लष्करी व आर्थिक मदत घेणारी पाकिस्तानसारखी राष्ट्रेही या संघटनेत आहेत; पण आपल्यापुढील विषयावर खुली चर्चा करून ही राष्ट्रे निर्णय घेतात, आवश्यक तेथे तडजोडही करतात. अमेरिका आणि रशिया या जगातल्या दोन महासत्तांमधील संघर्ष व तणाव वाढून त्यातून सर्वसंहारक जागतिक अण्वस्त्रयुद्ध होऊ नये असा प्रयत्न करायला हवा याबाबत त्यांचे एकमत आहे, तसेच आर्थिक विकासासाठी सहकार्याने प्रयत्न करायला हवेत यावरही एकमत आहे. जगात संहारक अस्त्रांच्या निर्मितीसाठी चालू असलेली शस्त्रस्पर्धा आणि त्यावर होणारा प्रचंड खर्च थांबवून तो विकसनशील देशांच्या विकासासाठी मिळावा असा या संघटनेचा प्रयत्न आहे.

आपल्यापुढील प्रचंड आव्हानांची श्रीमती गांधींना कल्पना आहे. समारोपाच्या भाषणात अलिप्त संघटनेच्या कार्याची गिर्यारोहणाशी तुलना करून त्या म्हणाल्या, 'गिर्यारोहणास आपण निघालो आहोत. पायथ्याशी तळ उभारला आहे. शिखर गाठण्यासाठी अजून बराच चढ चढावयाचा आहे' दिल्लीची ही शिखरपरिषद असली तरी शिखर अजून लांबच आहे. आपण केवळ पायथ्याशी तळ उभारला आहे, अशा शब्दांत आपल्या मर्यादित यशाची आणि आपल्यापुढे असलेल्या मोठ्या आव्हानांची कल्पना त्यांना दिली. अलिप्त राष्ट्रसंघटनेचे अध्यक्षपद तीन वर्षे संभाळताना या कार्यासाठी श्रीमती गांधींना बराच वेळ द्यावा लागणार आहे; पण त्यांच्यापुढचे अंतर्गत प्रश्नच एवढे बिकट आहेत की, त्यातून वेळ काढून अलिप्त राष्ट्रसंघटनेच्या कार्यासाठी त्यांना पुरेसा वेळ मिळू शकेल असा विचार मनात येतो. अंतर्गत घडी व्यवस्थित बसविलेली नसतानाच हे आव्हान त्यांनी स्वीकारले आहे आणि ते पेलणे त्यांना कठीण जाणार आहे.

अलिप्ततेसंबंधात एक मुद्दा स्पष्ट करायला हवा. जगातील बड्या राष्ट्रांच्या लष्करी गटापासून अलिप्तता त्यात मुख्यत: अभिप्रेत आहे. वाईट, अनिष्ट गोष्टींपासून केवळ अलिप्तता पुरेशी नाही त्यांचा प्रतिकार करायला हवा. अलिप्तांची अलिप्तता ही चांगल्या गोष्टींपासून अलिप्तता नाही. आर्थिक विकासासारख्या कार्यक्रमासाठी सहकार्य करायला हवे. तेथे अलिप्तता उपयोगाची नाही. एखाद्या राष्ट्रावर कोणी आक्रमण केले तर आक्रमक राष्ट्राचा निषेध करून आक्रमण झालेल्या राष्ट्राच्या मदतीस जायलाच हवे. तेथे अलिप्तता चुकीचीच ठरेल. अलिप्तता ही नकारात्मक विचारप्रणाली नाही. अहिंसा, असहकार यासारखेच ते एक प्रभावी शस्त्र आहे. त्याचा तसाच वापर करायला हवा ! ☐

# मार्क टली (बी. बी. सी.)

## आम्ही सनसनाटीपणाच्या मागे लागत नाही !

'मार्क टली, बी. बी. सी., न्यू डेली' हे तीन शब्द बी. बी. सी. च्या कोटच-वधी श्रोत्यांना गेली सतरा वर्षे परिचित आहेत. 'ट्वेंटीफोर अवर्स' या दैनंदिन कार्यक्रमात बी. बी. सी. च्या जगभरच्या देशांत पसरलेल्या, जवळजवळ दोन डझन वृत्तप्रतिनिधींकडून दूरध्वनीवर आलेले ताजे वृत्तांत त्यांच्याच आवाजात ऐकवले जातात. प्रत्येक जण आपापला वृत्तांत संपल्यावर स्वतःचे नाव व ठिकाण सांगतो.

मार्क टली हा बी. बी. सी. च्या दिल्ली ब्यूरोचा मुख्य आहे. गेल्या सतरा वर्षांच्या कारकीर्दीत त्याने आपल्या सहकाऱ्यांसह अनेक स्फोटक वृत्तांत पाठवून सत्ताधाऱ्यांच्या झोपा हराम करून टाकल्या आहेत. आणीबाणीत तर खरी बातमी ऐकायची म्हटली तर बी. बी. सी. ला पर्याय नव्हता. (अजूनही या परिस्थितीत फारसा फरक पडलेला नाही.) सतीश जेकब या मार्क टलीच्या सहकाऱ्याने नुकत्याच झालेल्या आसाम निवडणुकांच्या काळात आसाममध्ये तंबू ठोकून रोजच्या रोज घडणारी हत्याकांडे सर्वप्रथम उघड-कीला आणून दाणादाण उडवून दिली.

भारताकडे पाश्चात्य प्रसारमाध्यमे नेह-मीच दुर्लक्ष करीत आलेली आहेत. त्यामुळे भारताबद्दल पाश्चात्य लोकांमध्ये अजूनही बरेच गैरसमज आहेत; परंतु बी. बी. सी. ने भारतावर मोठ्या प्रमाणात लक्ष केंद्रित करून जास्तीत जास्त बातम्या व कार्यक्रम प्रसारित करण्याचे धोरण ठेवले आहे. भारतासाठी हिंदी, तमिळ, बंगाली व उर्दू सेवाही कार्यरत आहेत. यापैकी बी. बी. सी. ची हिंदी सेवा सर्वांत लोकप्रिय असून नुक-त्याच प्रसिद्ध झालेल्या आकडेवारीप्रमाणे बी. बी. सी. ची हिंदी सेवा साडेतीन कोटी श्रोते नियमित ऐकतात. वृत्तप्रसारणातला निःपक्षपातीपणा व एकूण सर्व कार्यक्रमांचा उच्च दर्जा हिंदी सेवेतही झिरपलेला आहे. (हिंदी सेवेच्या पत्रोत्तरविषयक कार्यक्रमात काही मराठी भाषिक श्रोत्यांची पत्रेही प्रसा-रित झाल्याचे या लेखकाने ऐकले आहे.)

आपण जेव्हा जेव्हा खेड्यापाड्यांतून हिंडत असतो तेव्हा लोक बी. बी. सी. चं नाव ऐकताच उद्गारतात, 'काय बी. बी. सी.? म्हणजे खऱ्याखऱ्या बातम्या देणारे तुम्हीच तर!' असं मार्क टली अभिमानाने सांगतो. एकदा राजस्थानात प्रवास करीत असताना त्याची गाडी बिघडली. ती दुरुस्त करणाऱ्या फिटरने मार्क टलीचे नाव ऐकताच त्याच्याकडून एक पैसाही घ्यायला नकार दिला! कारण तोही बी. बी. सी. चा फॅन निघाला! आपल्या महाराष्ट्रातले किती लोक बी. बी. सी. ऐकतात त्याची काही कल्पना नाही. त्यामुळे त्याचे नाव मराठी भाषिकांना माहीत आहे की नाही याचा अंदाज करता येत नाही. उत्तरभारतात मात्र त्याची ओळख सांगणारे असंख्य लोक भेटतील. मार्क टली हे नाव 'सिले ब्रिटी' या सदरात गणले जाते; पण आपण 'सिले ब्रिटी' नाही असे तो गमतीने म्हणतो.

मार्क टलीचा जन्म भारतातच झालेला आणि बरेचसे बालपण इथेच गेलेले. तो हिंदी उत्तम बोलतो. बंगाली भाषाही त्याला अवगत आहे. त्यामुळे भारतात कुठेही फिर-ताना त्याला भाषेची अडचण येत नाही. मध्यंतरी आपल्याकडे 'द सी वूल्व्हज्' हा चित्रपट आला होता. इंग्रज शिपायांनी एका जर्मन युद्धनौकेवर केलेला छुपा हल्ला त्यात दाखवलेला आहे. हा चित्रपट ज्या सत्य घटनेवर आधारित आहे त्या घटनेत स्वतः मार्क टली गोवलेला होता. भारतात बी. बी. सी. च्या कामगिरीवर येण्यापूर्वी त्याने पाकिस्तान, इराण, बेल्जिअम, नेपाळ व हॉलंड या देशांतूनही आपली 'आवाजी पत्र-कारिता' गाजवली. १९७९ च्या सार्वत्रिक निवडणुकांच्या वेळी त्याने अनेक राज्यांतल्या कानाकोपऱ्यात हिंडून तेथून वृत्तांत पाठवले होते. त्याचा हा प्रयत्न फार गाजला होता. शेतीच्या पाण्यासंबंधी त्याने विस्तृत वृत्तांत पाठवले आहेत. एवढेच नाही तर खेड्यांतून चालणाऱ्या जादूटोण्याच्या प्रकारांवरही त्याने एक कार्यक्रम तयार केला होता. 'ट्वेंटी-फोर अवर्स' या कार्यक्रमाबरोबरच 'रेडिओ न्यूज रील', 'आउट लुक' व 'फ्रॉम अवर कॉरसपॉंडंट्स्' या कार्यक्रमांमधूनही त्याचा आवाज ऐकायला मिळतो. दिल्ली–लंडन ही फोनलाइन खराब असल्याने बऱ्याच वेळा त्याचे वृत्तांत वाचून दाखवण्यात येतात. पाकिस्तान व श्रीलंकेसारख्या ठिकाणांहून पाठवलेले वृत्तांत स्पष्ट ऐकू येतात. भारता-सारख्या तंत्रदृष्ट्या पुढारलेल्या देशाला ही गोष्ट भूषणावह नाही असे तो म्हणतो ते खरेच आहे.

मध्यंतरी त्याने एका वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत आपल्या वृत्तसंकलनाच्या कार्य-पद्धतीची माहिती दिली. ती फारच उद्बोधक आहे. तो म्हणतो 'आम्ही सनसनाटी बात-म्यांच्या (डिझास्टर स्टोरीज) मागे लागत बसत नाही. त्याऐवजी इथल्या विकास-प्रकल्पांची, वैज्ञानिक क्षेत्रातील नव्या घट-नांची पार्श्वभूमी विशद करणाऱ्या कार्यक्रमां-वर (ज्याला बॅकग्राउंड फीचर्स म्हणतात) जास्त मेहनत घेतो. भारताचा एखादा उपग्रह आकाशात जातो तेव्हा आम्ही त्याला प्रसिद्धी देतो आणि जेव्हा तोच सणकून आपटतो तेव्हा तसे म्हणतो. अंतरिक्ष केंद्रांसारख्या प्रतिष्ठित संस्थांमध्ये आम्हाला सरकार शिरकाव करू देत नाही' अशी त्याची तक्रार आहे. 'बी. बी. सी. काही भारताची बद-नामी करण्यासाठी जन्मलेली नाही व ती एक सिद्ध वस्तुस्थिती आहे' हेही तो निदर्शनास आणून देतो. असंख्य भारतीय श्रोत्यांचा आकाशवाणीच्या बातम्यांपेक्षा बी. बी. सी. च्या बातम्यांवर अधिक विश्वास आहे. ही विश्वासार्हता वाढीस लावण्यात मार्क टलीचा सिंहाचा वाटा आहे.

गेल्या वर्षी बी. बी. सी. टी. व्ही. साठी मार्क टलीने सहा माहितीपट तयार केले. या माहितीपटांचे नुस्ते विषय पाहिले तरी हा माणूस या मातीत किती पक्का रुजलेला आहे ते लक्षात येते. बनारसचा रामलीलामहोत्सव, तमिळनाडूतला अयनारचा उत्सव, बंगलोरच्या इंडियन इन्स्टिटयूट ऑफ सायन्सचा खेड्या-पाड्यांतून विज्ञानाचे फायदे पोचवण्याचा उपक्रम, पंजाबमधून ब्रिटनकडे वाहणारा लोकांचा लोंढा व त्यातून निर्माण झालेल्या समस्या, भारतीय वृत्तपत्रसृष्टी व पाश्चात्य वृत्तपत्रांत तिसऱ्या जगासंबंधी येणाऱ्या बातम्या हे त्याच्या माहितीपटांचे विषय. विकासकार्यात गुंतलेल्या अनेक भारतीयांच्या मुलाखतींबरोबरच त्याने काही ठिकाणी आर. के. लक्ष्मणच्या व्यंगचित्रांचाही मार्मिक उप-योग केला आहे. त्याने काही वर्षांपूर्वी बनव-लेल्या बस्तरच्या आदिवासींवरच्या माहिती-पटावर बरीच टीका झाली होती. गेल्या वर्षीच पाकिस्तान सरकारने भुत्तोंचे शेवटचे उद्गार चुकीच्या स्वरूपात दिल्याबद्दल मार्क टलीविरुद्ध एक वॉरंट काढले होते; पण झियाच्या हातातून तो सध्या तरी सुखरूप निसटलेला दिसतो. कारण या संदर्भात पुढे फारसे ऐकायला मिळालेले नाही.

—मुकुंद सोमणी, संगमनेर

मराठवाडा रेल्वे आंदोलन

# ब्रॉफ नको, नामांतर हवे, नेतृत्वाचा घोळ !

निशिकांत भालेराव

हमारी माँग ब्रॉडगेज.
गनीखान तुम्हारा दिल क्यों नॅरो गेज ! नॅरो गेज !


–अशी जोरदार घोषणा तीन दिवस साऱ्या मराठवाड्यात घुमली व रेल्वेविषयक तीन मागण्यांवरून सुरू झालेले आंदोलन जनतेच्या पाठिंब्यामुळे यशस्वी झाले. आंदोलनाचे पहिले पर्व शांततामय होते. हजारो लोकांनी रुळावर येऊन सत्याग्रह केला व रेल्वे अडवल्या. तीन दिवस मनमाड–काचीगुडा–मार्गावरील रेल्वेवाहतूक विस्कळित झाली; परतु लोकसभेत अर्थसंकल्पावरील पुरवणी मागण्यांत याविषयी कोणतेच आश्वासन मिळाले नाही व मराठवाड्यात हा असंतोष धुमसतच राहिला. त्याचा स्फोट आज ना उद्या झाला नाही तरी सत्ताधारी पक्ष व लोकप्रतिनिधी यांच्याविषयीची नाराजी मात्र सर्वदूर पसरलीय व त्याचा परिणाम पुढे–मागे दिसण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

मराठवाडा हा भाग महाराष्ट्रात सामील झाला तोसुद्धा हट्टाने ! त्याच्या निर्मितीमागे निझामाविरुद्धच्या लढ्याची पार्श्वभूमी आहे. महाराष्ट्रात आल्यावर या भागाकडे फारसे लक्ष दिले गेले नाही. कोकण–विदर्भ–खानदेश यांच्याप्रमाणेच सात जिल्ह्यांचा हा भागही सर्वंकष विकासापासून वंचित राहिला. या अन्यायाचे खापर आजही सर्वसामान्य माणूस पुण्या–मुंबईच्या मंडळीवरच फोडतो. पुण्या–मुंबईची पब्लिक म्हणजे शहाणी, त्यांना आमचे गाऱ्हाणे कळणार असा दृढ समज मराठवाड्याचा झालेला आहे. अर्थात तो स्वाभाविक आहे. आर्थिक–सांस्कृतिक–शैक्षणिक–राजकीय किंबहुना सर्वच क्षेत्रात मराठवाड्याची पिळवणूक झाली. त्याच्या पुष्टचर्थ अनेक उदाहरणे देता येऊ शकतील. या सर्वांचा परिणाम मराठवाड्यात प्रादेशिक भावना बळकट झाली. अनेक राजकीय–सामाजिक गटांनी भावनेला फुंकर घालण्याचे काम कित्येकदा केले; परंतु त्यातून कधी फुटीरतेची मागणी पुढे आली नाही. मराठवाड्यच्या प्रादेशिकतेची ही सोशिकता म्हणावी लागेल.

मराठवाडा सोशिक असला तरी येथील जनतेला आपल्यावर झालेल्या अन्यायाविरुद्ध लढण्याची ईर्षा इतरांपेक्षा जास्त आहे. भांडल्याशिवाय काहीच मिळत नाही हे लक्षात आल्यावर मराठवाड्यात २–३ आंदोलने झाली. प्रारंभी निखळ विद्यार्थी-युवकांची असलेली ही आंदोलने, त्याची व्याप्ती वाढल्यावर सर्वांचीच झाली. दलित शिष्यवृत्तीवाढ, विकासआंदोलन, नामांतर-आंदोलन आणि फुटकळ मागण्यांवरून विद्यार्थ्यांचे मोर्चे–आंदोलने तर चालूच असतात. या सर्वांचा परिणाम, विकासाच्या प्रश्नावर, येथील जनता एकत्र होण्यात होत असतो.

विद्यापीठ–नामांतराच्या आंदोलनात मराठवाड्याचे हे 'ऐक्य' विभागले गेले. राजकीय पक्ष, शैक्षणिक संस्था, साहित्य-मंडळे, कामगारसंघटना व वस्ती–वस्तीमध्ये मतभेद पसरले, मने दुभंगली. ७२–७३ मध्ये दलित विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसाठी, सवर्ण विद्यार्थ्यांनी आंदोलन केल्याची घटना खोटी वाटावी, इतके प्रखर तणाव दलित–सवर्ण विद्यार्थ्यांत प्रामुख्याने पसरले. विकासाच्या प्रश्नावरही नामांतरावरून मतभेद झाले आणि नामांतरवाद्यांची विकासपरिषद वेगळी, नामांतर विरोधकांची विकासपरिषद वेगळी, असे स्वरूप ७८ ते ८२ च्या काळात होते. रेल्वेरुंदीकरणाच्या प्रश्नावरून नामांतरवादी–विरोधक एका व्यासपीठावर आले, सत्याग्रहात सामील झाले व रुंदीकरणाबरोबर एकीकरणाच्या प्रक्रियेत गुंतले, हे स्वागतार्ह झाले. नामांतराच्या प्रश्नावर ठाम भूमिका प्रत्येकाचीच असली पाहिजे; पण हा प्रश्न व्यापक चळवळीचे नुकसान करणारा असेल तर तो तात्पुरता बाजूला ठेवून, स्वार्थ साधण्याची रणनीती नामांतरवाद्यांना या निमित्ताने खेळता आली हे उत्तम.

रेल्वेरुंदीकरणावरून मराठवाड्यात वातावरण तापले. हे दुखणे खरे तर दहा वर्षांपूर्वीचे जुने आहे. १९७३ ला पंतप्रधान श्रीमती गांधी पैठणला आल्या होत्या. त्या वेळी त्यांनी मनमाड–मुदखेड आणि लातूर–मिरज या दोन रेल्वेमार्गांचे ब्रॉडगेजमध्ये रूपांतर होईल अशी घोषणा केली होती. त्या वेळी मराठवाड्यात दुष्काळ होता व दिलासा देण्यासाठी श्रीमती गांधींनी ही घोषणा केली असे म्हटले तरी त्यांनी या घोषणेचा पुनरुच्चार पत्रकार-परिषदेतही केला आणि हे आश्वासन नसल्याचे म्हटले. या गोष्टीला आज एक दशक पूर्ण झाले. ७३ ते ७७ श्रीमती गांधी सत्तेवर होत्या; पण त्यांनी आश्वासनाशिवाय काहीच केले नाही. ७३ च्या प्रारंभी रेल्वेचे विभागीय अभियंता श्री. कुलकर्णी यांनी विभागीय आयुक्त श्री. बी. के. चौगुले यांची भेट घेतली होती. मनमाड ते परभणी या ३४० कि. मी. अंतरातील मीटरगेजचे रूपांतर ब्रॉडगेज-मध्ये करण्याचे, तसेच कुर्डुवाडी ते सांगोला ६० कि. मी. लातूर ते कळंब ६० कि. मी. या अंतराच्या रूपांतर–कामाबद्दल चर्चा या भेटीत झाली... रेल्वेच्या काही अधिकाऱ्यांना जबाबदारीही देण्यात आली. रेल्वेरुंदीकरण जोरात सुरू होणार असा देखावा या काळात निर्माण झाला... जनता भाळली, देखावा तसाच राहिला. काहीच झाले नाही. इंदिरा



उत्साही आंदोलक, हतबल पोलीस — पुढे काय ?

गांधी ८० मध्ये पुन्हा सत्तेवर आल्या. कधी काळी त्यांनीच जाहीर केलेल्या या योजनेची कामेही त्यांनी बंद केली.

रुंदीकरणाच्या कामाला खरी सुरुवात झाली ती जनता सरकारच्या काळात. त्या वेळी मधू दंडवते रेल्वेमंत्री होते. ३ नोव्हेंबर ७८ ला दंडवते औरंगाबादला आले व त्यांनी समारंभपूर्वक कामाला प्रारंभ केला. द. म. रेल्वेचे महाव्यवस्थापक श्री. थॉमस यांनी एक लेख लिहून या विभागाचा विकास व पर्यटनाच्या दृष्टीने औरंगाबादचे महत्त्व लक्षात घेता ब्रॉडगेज कसे आवश्यक आहे हे सांगितले होते. रुंदीकरणास प्रारंभ झाल्याचे मोठ्या ऐटीत थॉमससाहेबांनी सांगितले; पण तसे काही झालेच नाही. जनता सरकारला त्या वेळच्या पुलोद सरकारने जमेल तेवढे सहकार्य केले. १९८१ पर्यंत रुंदीकरण होईल असे आश्वासन होते. त्याची पूर्ती होण्याच्या अगोदरच दोन्ही सरकारे गेली. बाई सत्तेवर आल्या. रुंदीकरणाची उरली–सुरली आशा नष्ट झाली. थॉमससाहेबांचा लेखही पुन्हा कोणी संदर्भालाही घेतला नाही.

## तीन पिढ्यांची मागणी

रेल्वेविषयक मागणी ही या भागातील परंपरागत म्हटली पाहिजे. तीन पिढ्यांपासून ही मागणी पुढे येत आहे, हा एक दुर्लक्षण्याचा विक्रमच म्हटला पाहिजे. मराठवाडा जनता विकास परिषदेने सातत्याने या मागणीचा पाठपुरावा केला आहे. परिषदेने गतवर्षी श्रीमती गांधींना एक निवेदन पाठवले होते. त्यात पुढीलप्रमाणे या मागणीची मांडणी होती. (अ) मनमाड–औरंगाबाद–परळी–परभणी या मार्गाचे रुंदीकरण झाले पाहिजे. (ब) परभणी-नांदेड–मुदखेड–अदिलाबाद या मार्गाचे रुंदीकरण होऊन तो मार्ग अदिलाबाद घुग्गूसशी जोडला जावा. (क) लातूर–कुर्डुवाडी–मिरज या नॅरोगेजचे रुंदीकरण करावे. (ड) अहमदनगर–बीड–परळी असा रेल्वेमार्ग व्हावा. या मागण्या करताना मराठवाड्यात रेल्वेचे जाळे निर्माण करण्याचा फक्त उद्देश नव्हता, तर रेल्वेच्या सर्व विभागांना हा भाग जोडून, एकूण देशाच्या विकासाचा प्रश्नही अंतर्भूत होता.

१९५१ ते ५५ च्या दरम्यान रुंदीकरण व नवे मार्ग यांची मागणी व्यापाऱ्यांनी व सधन शेतकऱ्यांनी केली होती. याच दरम्यान लातूर येथे सर्वपक्षीय बैठकही झाली होती. या सर्व मागण्यांचा पुनरुच्चार १९५५ ला शेतकरी परिषद, ५६ ला मराठवाडा चेंबर ऑफ कॉमर्स, ५८ साली मराठवाडा विभागीय विकास परिषद, ६४ मध्ये विकास परिषद यांनी केला. ७२ पासून मराठवाडा जनता विकास परिषदेने ही मागणी रेटली. ७४ ला विकास-आंदोलनच झाले व त्यानंतर आजतागायत रुंदीकरणाचे गुऱ्हाळ चालूच राहिले. विकासपरिषदेचे नेते श्री. गोविंदभाई श्रॉफ यांच्या नेतृत्वाखाली मराठवाड्याच्या सातही जिल्ह्यांत कित्येक मेळावे झाले, कैक वेळा निदर्शने झाली, शिष्टमंडळे भेटली; पण १९२१ ला जो रेल्वेचा लोहमार्ग या भागात बसला त्यात काही वाढ झाली नाही!

रुंदीकरणाबाबत सत्ताधाऱ्यांनी मराठवाड्याच्या जनतेला चक्क उल्लू बनवले. ७३ ला पंतप्रधानांनी रुंदीकरणाची घोषणा केली; पण रेल्वेअधिकाऱ्यांनी मनमाड ते परळी याच मार्गाचे रुंदीकरण होईल असे बजावून पंतप्रधानांच्या घोषणेला मर्यादा घातली. याचे कारण काय? तर मनमाड–परभणी व परळी हे टर्मिनस केन्द्र आहेत व गुंतवलेल्या भांडवलावर (रेल्वेने) किमान ८ टक्के व्याज सुटले पाहिजे. मराठवाड्यातील माल व प्रवासी वाहतुकीतून एवढे उत्पन्न सुटणार नाही अशी मखलाशी रेल्वेअधिकाऱ्यांनी करून मोडता घातला. पंतप्रधान मोठ्या की रेल्वेबोर्ड असा भ्रम निर्माण झाला. पंतप्रधानांनी घोषणा केली असली तरी नियोजनखात्याने त्याची नोंद घेतली नाही व कहर म्हणजे रेल्वेखाते व पंतप्रधान यांनी असे काही लेखी स्वरूपात नियोजनखात्याला कळवले नाही. रेल्वेमंत्री पै यांनी तर पोलादावर रुंदीकरण विसंबून असल्याने या मागणीला उडवूनच लावले.

७३ मध्ये मिश्रा, नंतर पै, नंतर त्रिपाठी तर आता गनीखान या रेल्वेमंत्र्यांनी मराठवाड्याच्या रेल्वेसाठी पैसे दिले; पण किती? तर १० हजार, ४० लाख व एक कोटी. या अल्पशा तरतुदींमुळे साधे मातीकामही अजून झाले नाही! एकदा तर रेल्वेकार्यालयही हलविण्यात आले. आरडाओरड करून ते परत वापस आले.

## रुंदीकरण–एकीकरण

रेल्वे रुंदीकरण व इतर मागण्यांबाबत इतकी उपेक्षा होऊनही लोक तसे शांतच होते. या प्रश्नावर ७४ मध्ये मराठवाड्यात विकासआंदोलन झाले खरे; परंतु त्यात इतर अनेक मागण्या होत्या व मुख्य बेकारी हटवण्याची मागणी होती. त्यामुळे आंदोलन होऊ शकले. नामंतराच्या प्रश्नाने सर्वच राजकीय गटांत दुफळी माजल्याने रेल्वेप्रश्नांवर लोक एकत्र येण्याची प्रारंभी चिन्हे दिसत नव्हती. दुष्काळाच्या छटांमुळे तर मराठवाड्यातील काही लोक त्रस्तच होते. त्यामुळे आंदोलन सर्वव्यापी बनणे अवघड होते. शेकाप, मार्क्सवादी, उजवे कम्युनिस्ट, युक्रांद, जनता पक्ष आणि नामांतरवादी मंडळी एकत्र येऊन त्यांनी डावी आघाडी स्थापन केली होती. नामांतरापूर्वी सर्वांची मिळून जनता विकास परिषद होती व विकासाचे प्रश्न यामार्फत सोडवले जायचे. विकास परिषदेत डॉक्टर्स, व्यापारी, भांडवलदार (विभागीय) वकील, प्राध्यापक व मध्यमवर्गीय मंडळींचा भरणा आहे. गोविंदभाई

श्रॉफ यांच्या नावावर ही परिषद चालते. नामांतराला गोविंदभाईंचा विरोध म्हणून विकासपरिषदेला व त्यांच्या कार्यक्रमाला डाव्या आघाडीचा विरोध. असे साधे राजकारण होते. विकासाच्या प्रश्नावरही या मंडळींनी एकत्र येऊ नये म्हणून इंदिरा गांधीचे राजकीय धोरण राबवणाऱ्या व भांडवलदारी वृत्तपत्रांच्या कच्छपी लागलेल्या काही उपद्व्यापी मंडळींनी हेतुतः ही तेढ वाढवण्याचे काम केले. मराठावर्ग विकासपरिषदेत जाणार नाही याची काळजी घेण्यासाठी काही साहित्यिकही (महामंडळासह) कार्यरत होतेच. गंमत म्हणजे नामांतराच्या प्रश्नावरून विकासपरिषदेला शिव्या घालणाऱ्या या मंडळींची भूमिका नामांतराबाबत ढोंगबाजीचीच होती. गोविंदभाईंनी नामांतराला उघड विरोध तरी केला, या मंडळींनी तर भूमिकाच घेतली नाही. डाव्या आघाडीत जनता पक्षाचे केवळ पदाधिकारी, अनुयायी मात्र विकास परिषदेत.

पँथरवाले हुषार ! त्यांना राजकीय डावपेच कळतात शिवाय Political wisdom ही ! त्यामुळे आपल्या स्वार्थासाठी ते डाव्या आघाडीत येत असतात. कम्युनिस्टांविषयी काय बोलावे ? व्यक्तिगत द्वेषापायी डावी आघाडी म्हणजेच लाल रंग असा आभास निर्माण करण्यात ही मंडळी यशस्वी होत असतात. या डाव्या आघाडीचे नेते कॉ. व्ही. डी. देशपांडे, वय साठीच्या वर. गोविंदभाईसमोर यांचे काहीच चालत नाही. आडून डावपेच करण्यात हे हुषार. डाव्या आघाडीचा मोर्चा निघणार तो शंभरेक जणांचा, तर विकासपरिषदेचा दीडशेचा अशी अवस्था !

रुंदीकरणासाठी पुरेशी तरतूद होणार नाही याचा सुगावा लागताच दोन्ही गटांनी मोर्चेबंदी केली. डाव्या आघाडीने १९ फेब्रुवारी रोजी बंदचा कौल दिला. विकासपरिषदेने २६ पासून म्हणजे रेल्वेबजेटनंतर रेल रोको जाहीर केला. विकासपरिषदेची नाही म्हटलं तरी इतरत्र केंद्रे आहेत. व्यक्तिगत संबंध, गोविंदभाईंच्या नावाचा त्यांना फायदा असतो. डाव्या आघाडीतील जनता व शुक्रांद यांनी आघाडीने या प्रश्नावर मतभेद दूर ठेवून विकासपरिषदेसमवेत जावे अशी भूमिका घेतली. आपल्याला पाठिंबा मिळणार नाही हे लक्षात घेऊन डाव्या आघाडीने आपले आवाहन परत घेतले. डाव्या आघाडीतील डाव्यांची खरी पंचाईत केली ती पँथर-नेत्यांनी ! आम्हाला गोविंदभाईंबरोबर जाण्यास हरकत नाही अशी भूमिका त्यांनी घेतली व डाव्या आघाडीला विकासपरिषदेबरोबर यावे लागले. मग दोन्ही घटकांची मिळून रेल्वे कृती समिती स्थापन झाली व रेल्वेआंदोलनाचे संयुक्त रणशिंग फुंकले गेले.

२६, २७, २८ फेब्रुवारीस औरंगाबाद परभणी–सेलू-नांदेड या प्रमुख रेल्वेस्थानकांवर लोकांनी रेल्वे अडवल्या. हजारोंनी सत्याग्रह केले व शांततापूर्णरीत्या आपला निषेध नोंदवला. काही तुरळक हिंसक घटना झाल्या, ज्या भागात रेल्वे नाही त्या बीड-उस्मानाबाद भागात फारसा प्रतिसाद मिळाला नाही. नांदेडकरांनी औरंगाबादचे आदेश न जुमानण्याचे ठरवले व स्वतंत्रपणे आपला कार्यक्रम घेतला.

## गाडी मूळ पदावर !

परखडपणे रेल्वेआंदोलनाचे विश्लेषण करायचे झाल्यास आज ना उद्या जी एकी आहे ती फुटणार हे उघडच आहे. केवळ उस्फूर्ततेवर आणि तीव्र संतापातून एखादे प्रदीर्घ आंदोलन चालू शकण्याचा हा काळ नाही. शिवाय नामांतर प्रश्नावरून आणि आंदोलनाचे नेतृत्व करण्याच्या मुद्द्यावरून या आंदोलनात व पर्यायाने रेल्वेकृतिसमितीत दुफळी माजणार हे स्पष्टच होते व आहे.

तीन दिवसांच्या यशस्वी 'रेल रोको' नंतर १२ मार्च रोजी परभणीला रेल्वे कृतीसमितीने एक परिषद घेतली. सातही जिल्ह्यांतील प्रतिनिधी बैठकीला हजर होते. आंदोलनाची पुढील दिशा व कार्यक्रम ठरविण्यासाठी, तसेच आंदोलनाची जी समिती आहे त्यातही इतरांना प्रतिनिधित्व देण्यासाठी म्हणून ही परिषद होती. परिषद गाजली ती भांडणामुळे ! आणि ही भांडणे-मतभेद अर्थातच नामांतर आणि नेतृत्वाच्या प्रश्नावरून झाले. प्रचंड गोंधळात व कोणताही ठोस निर्णय न घेता परिषद संपली.

रेल्वे-आंदोलनाने दलित-दलितेतर अशी जी फूट मराठवाड्यात सर्वच प्रश्नांवर होती ती सांधली जाणार, मने जुळणार असे जे वातावरण निर्माण झाले ते तात्कालिक होते की काय अशी भीती या परिषदेतील भानगडीमुळे वाटायला लागली. गोविंदभाई श्रॉफ हे रेल्वेआंदोलनाचे नेते. डाव्या आघाडीनेही त्यांचे नेतृत्व मान्य केले होते. अर्थातच नाइलाजास्तव. डाव्या आघाडीचे नेते कॉ. व्ही. डी. देशपांडे. श्रॉफ आणि देशपांडे यांच्या वयात फार फरक नाही. दोघेही म्हातारे आहेत; परंतु तरीही डावी आघाडी श्रॉफ यांच्या नेतृत्वाला ' आउट डेटेड ' म्हणते व देशपांडे यांच्या गळ्यात नेतृत्वाची माळ पडावी म्हणून कार्यरत असते. हे राजकारण अर्थातच छुप्या पद्धतीने चालत असते. म्हणजे कृतिसमितीच्या बैठकीत श्रॉफ यांना ' काउंटर ' करणे वगैरे. अर्थात हे स्वाभाविक आहे. ' रेल रोको'ला भरपूर प्रतिसाद मिळाल्याने हा प्रश्न ' अँनकॅश ' करावा अशी इच्छा कोणत्याही राजकीय पक्षाला असणार ! देशपांडे व त्यांची डावी आघाडीही यातून सुटणार कशी ? देशपांडे यांनी परिषदेच्या आधी नांदेड व परभणीचा दौरा केला. परभणीत त्यांनी परिषदेच्या एक दिवस आधीच तंबू ठोकला. शेकापचा जोर परभणीत आहे. त्यातल्या त्यात युवकनेते विजय गव्हाणे यांचा. मग देशपांडे यांनी राजकीय डावपेचांची आखणी केली म्हणे ! आणि याचा परिपाक परिषदेत दिसून आला. प्रारंभीच विजय गव्हाणे यांनी काही आक्षेप घेतले. त्यांच्या अनुयायांनी सातत्याने इतरांच्या बोलण्यात अडथळे आणले. अर्थात हे स्थानिक राजकारण होते. गव्हाणे विरुद्ध हेमराज जैन (श्रॉफ यांचे अनुयायी) यांची तर जुंपलीच होती. पुढे नामांतरवादी कृतिसमितीचे, तसेच जिल्हा जनता पक्षाचे व लायन्स क्लबचे अध्यक्ष अंकुश भालेकर यांनी नामांतर प्रश्नावरून श्रॉफ आणि इतर मंडळींवर तोफ डागली. दलित पँथरचे प्रीतम शेगावकर यांनीही श्रॉफ यांचेवर टीका केली. लॉबिंग करून नामांतराचा प्रश्न परिषदेत काढायचा व कसेही करून श्रॉफ यांची हकालपट्टी करायची असा बऱ्याच जणांचा डाव होता. जिल्ह्याचे प्रतिनिधी होतानाही पुन्हा ताणाताणी झाली. शेवटी गोंधळातच परिषद संपली. निर्णय एकच झाला की, पुढची बैठक औरंगाबादला घ्यावी !

या परिषदेनंतर औरंगाबादेत रेल्वे-प्रश्न हा विकासाचा आहे काय ? असा परिसंवाद झाला. ज्यांनी हा आयोजित केला होता ते कधी शरद कॉंग्रेसच्या साप्ताहिकाचे संपादक असतात तर कधी इंदिरा कॉंग्रेस बाळासाहेब पवारांच्या कळपात. मराठ्याचे राजकारण गावाबाहेरील अलिशान ' देवगिरी 'त बसून करायचे हा यांचा उद्देश ! तर अशा या संयोजकांच्या परिसंवादात वक्त्यांनी श्रॉफ यांच्या नेतृत्वावर आडून तोंडसुख घेतले व नामांतराचा मुद्दाही अनेकांनी घोळला. नामांतराचा प्रश्न हाच विकासाचा प्रश्न आहे असा सूर काहींनी लावला.

श्रॉफ नको– नामांतर हवे– आणि नेतृत्वाच्या शोधात असलेली जनता असे चित्र रेल्वे–आंदोलनाच्या यशस्वितेनंतर आज उभे ठाकले आहे. ही परिस्थिती लक्षात घेता आता नव्याने जोरदार आंदोलन उभे राहण्याची शक्यताच नाही असे म्हणावे लागेल. □




# पोलंडचा पुरुषोत्तम लेक वालेसा

देशातला कामगार असंतुष्ट होता. त्याचं राहणीमान दिवसेंदिवस खालावत चाललं होतं. अन्नधान्यासाठी रांगा लावून कामगारवर्ग कंटाळला होता. असंतोष आतल्या आत धुमसत होता. त्यातच गिरेक सरकारनं १९८० च्या जुलैमध्ये मांसाच्या किमती एकदम वाढविल्या. ही वाढ कामगारांच्या खिशाला परवडण्याजोगी नव्हती. आतापर्यंत खिशाला ओढ बसत होती. यापुढं पोटाला चिमटा बसणार होता, हे मात्र कामगारांना चालण्याजोगं नव्हतं. दिवसभर उरी फुटस्तोवर राबायचं, मरमरून काम करायचं अन् दमून–भागून घरी परतलं की, चुली पेटलेल्या नसायच्या. घरातल्या बायका कामावरून परतून रांगा लावण्यासाठी अन्नधान्याच्या आणि मांसमटणाच्या दुकानांपुढं उभ्या असायच्या. खूप उशिरा त्या परतायच्या, ते अपुरं मांस अन् अन्न घेऊन कधीकधी त्यांना हात हलवीत परत यावं लागे. दुकानातला मर्यादित माल केव्हाच संपून गेलेला असायचा. भुकेल्या नवऱ्यांना अन् उपाशी पोराबाळांना पोटभर खायला घालणं त्यांना अशक्य होऊन बसलं होतं. कामगारांच्या सहनशीलतेनं परिसीमा गाठली होती.

कामगारांनी निदर्शनं सुरू केली, संप सुरू केले; पण नेहमीप्रमाणं त्यांचं स्वरूप सर्वसाधारण नव्हतं काही तरी निश्चित निष्पन्न व्हावं तरच संप अन् निदर्शनं करण्यात तथ्य आहे हे कामगारनेत्यांच्या लक्षात आलं होतं. कामगारांनी सरळसरळ कारखाने ताब्यात घेतले, खाणी व्यापून टाकल्या. तरीसुद्धा सरकार दाद देत नाही हे पाहून कामगारांचा धीर खचू लागला.

इकडं लेनिन बोटकारखान्यात वेगळंच नाटच घडत होतं. बोटकारखान्यातल्या कामगारांनी बैठा सप सुरू केला होता काम संपूर्ण थांबलं होतं. कारखान्यातल्या अधिकाऱ्यांना हुसकून देण्यात आलं होतं कारखान्याचं बाहेरचं गेट बंद करण्यात येऊन त्यावर कामगारांनी खडा पहारा ठेवला होता. पोलिसांच्या मदतीनं अधिकाऱ्यांनी कारखाना ताब्यात घेऊ नये हा त्यामागचा हेतू होता.

एक दिवस गेला... . दोन दिवस गेले......आठ दिवस गेले तरी प्रतिपक्षाकडून काहीच हालचाल होत नव्हती. भडका उडू नये म्हणून गिरेकनं लेनिन बोटकारखान्याच्या संपात हस्तक्षेप न करण्याचं ठरविलं होतं. देशातली सर्वांत महत्त्वाची अन् वर्माची जागा म्हणजे लेनिन बोटकारखाना. साऱ्या देशाचं लक्ष तिकडं लागलं होतं. नुसती ठिणगी पडण्याचा अवकाश सारा देश पेटून उठला असता. म्हणूनच सरकारनं तिथं सबुरीचं धोरण स्वीकारलं.

कामगारांची परिस्थिती दिवसेंदिवस अवघड होत चालली. घरातला अन्नधान्याचा साठा संपत आला होता, खिसे रिकामे होत आले होते. घरून येणारे डबे हळूहळू बंद होऊ लागले होते. कामगारांची सहनशक्ती संपुष्टात आली. संप बारगळणार अशी लक्षणं दिसू लागली. यश मिळविण्याच्या जिद्दीनं सुरू करण्यात आलेला संप निराशेच्या गर्तेत कोसळणार असं वाटू लागलं......

तोच लेनिन बोटकारखान्याच्या गेटावरून उडी मारून एक माणूस आत आला. लालसर केसांच्या अन् मिस्किल चेहऱ्याच्या या माणसाला सारे ओळखत होते. केवळ आठच महिन्यांपूर्वी त्याला तिथल्या कामावरून कमी करण्यात आलं होतं. बेकायदेशीर कामगार संघटनेचं तो नेतृत्व करतो अन् कामगारांत असंतोष पसरवतो असे आरोप अधिकाऱ्यांनी त्याच्यावर ठेवले होते. त्याला काढून टाकण्यामाग कारखान्याच्या अधिकाऱ्यांपेक्षा सरकारचा हात जास्त होता हे एक उघडं गुपित होतं. तो लेनिन बोटकारखान्याच्या कामगारांचं वा गडॅन्स्कमधल्या कामगारांचं नेतृत्व करत असता तर सरकारनं त्याच्या अपराधाला क्षमादेखील केली असती; पण तो तर साऱ्याच पोलंडमधल्या कामगारांच्या आशा–आकांक्षांचं प्रतीक बनला होता. सरकारचा त्याच्यावर रोष ओढवला होता तो याचसाठी......

गेटावरून आत आलेल्या त्या माणसाला पाहताच कामगारांच्यात नवा उत्साह संचरला. त्यांनी टाळ्या वाजवून त्याच्या आगमनाचं स्वागत केलं. कारखान्याच्या परिसरात अर्धपोटी अवस्थेत कसाबसा तग धरून बसलेले अन् वैफल्यानं ग्रासलेले ते कामगार लेक वालेसाच्या आगमनाची वार्ता कळताच आनंदानं आरोळ्या मारू लागले. विझत चाललेली संपाची ज्योत वालेसाच्या आगमनानं पुन्हा एकदा तेजानं उजळू लागली.

**तो म्हणायचा I am the leader. I am No. 1. त्याच्या बोलण्याला अहंकाराचा वास येतो असं म्हणणाऱ्या त्याच्या विरोधकांनादेखील त्याचं नेतृत्व मान्य करावंच लागलं. केवळ पोलंडमधल्या कामगारांचाच नव्हे तर जगातल्या सगळ्या कामगारवर्गाचाच तो प्रतिनिधी बनला होता !**

**लेखांक : पाचवा**

**लेखक : श्रीकांत मुंदरगी**

आल्या आल्या वालेसानं कामगारांना धीर दिला, 'मित्रांनो, निराश होऊ नका. आणखी धीर धरलात तर यश आपल्यापासून दूर नाही. आणखी थोडासा त्याग हवा, आणखी थोडासा संयम हवा. तुम्ही सहकार्य द्या, मी यशाची खात्री देतो !' कामगारांनी हात उंचावून आपली संमती दिली.

### स्टो लॅट ! स्टो लॅट !

संपानं एकदम निराळं वळण घेतलं. बाल्टिकपासून सायलेशियापर्यंतचे सर्व कारखाने अन् खाणी संपाला जोमानं साथ देऊ लागले. ५,००,००० कामगारांनी हा संप सुरू केला होता. संप बारगळत आला होता तोच वालेसाचं आगमन झालं. त्यांच्या मरगळलेल्या वृत्ती उल्हसून उठल्या. त्यांनी एकमुखानं अन् एकमतानं वालेसाकडं संपाचं नेतृत्व सुपूर्द केलं.

नेतृत्व हाती येताच वालेसानं आपल्या मागण्या जाहीर केल्या. 'कामगारांना संप करण्याचा कायदेशीर हक्क मिळायला पाहिजे, तसंच कामगार युनियन स्थापण्याचं स्वातंत्र्य हवं.' या मागण्या मान्य केल्यानंतरच प्रत्यक्ष वाटाघाटीची तयारी वालेसानं दर्शविली.

साऱ्या देशाचं लक्ष आता वालेसाकडं लागलं. कुठल्याही कम्युनिस्ट देशात, कोणत्याही कामगारनेत्यानं आपल्या भलत्यासलत्या मागण्या करण्याचं धारिष्ट्य दाखविलं नव्हतं. त्यामुळं लोक वालेसाला अफलातून आदमी समजू लागले.

बोटकारखान्याचं स्वरूप पालटून गेलं. त्याचं गेट फुलांनी मढवून टाकण्यात आलं. गेटाच्या आत आवाराच्या मध्यभागी उभारण्यात आलेल्या व्यासपीठावर मागं भलामोठा पोलिशध्वज फडकू लागला. शेजारी पोप दुसरे जॉन पॉल यांचं भलंमोठं छायाचित्र टांगण्यात आलं होतं. चर्चेसाठी अधिकाऱ्यांनी इथं यावं असं अगत्याचं (?) निमंत्रण गेलं. साऱ्या जगाला चिंता पडली की, हे निमंत्रण पोलंडच्या सरकारी अधिकाऱ्यांना नसून रशियन रणगाड्यांनाच आहे ! अमेरिकेतल्या अनेक राजकीय निरीक्षकांनी तर रशियन सेना पोलंडमध्ये घुसणं अपरिहार्य आहे असं भाकित वर्तवलं. पोलंडची जनता भयभीत होऊन गेली होती. सरकारी अधिकारी पुढं यायला तयार नव्हते, वालेसा अन् त्याचे सहकारी मागं हटायला तयार नव्हते !

सहनशक्ती संपत आलेल्या कामगारांनी हिंसाचाराचा आश्रय घेऊ नये म्हणून वालेसानं जाहीर आवाहन केलं, 'कामगारबंधूंनो, निःशस्त्र युद्धाची ही सुरुवात आहे. जयापजयाची पर्वा न करता आपण ते लढविणार आहोत. प्रसंग कसाही येवो, धीर सोडू नका ! शांततेनं साऱ्याला तोंड द्या. मद्यपान वर्ज्य करा. बेशिस्त बनू नका. हिंसेचा आश्रय घेऊ नका. देव अन् धर्माची आपल्याला साथ आहे. अंतिम विजय आपलाच आहे !' त्याचं हे आवाहन म्हणजे शांततेचा भंग न होऊ देण्याचा इशाराच होता.

गिरेक सरकारला वालेसाच्या वाढत्या सामर्थ्याची जाणीव झाली. त्याला काही तरी मिळाल्याशिवाय तो गप्प बसणार नाही हे लक्षात येताच सरकारनं वाटाघाटीसाठी शिष्टमंडळ धाडलं. त्या शिष्टमंडळाला थोडीशी देनघेन करण्याचाही सल्ला देण्यात आला. वालेसाच्या पदरात काहीच टाकलं नाही तर त्याच्या शब्दावर सारा देश आपल्या विरुद्ध उभा राहील हे न ओळखण्याइतपत गिरेक मूर्ख नव्हते.

वाटाघाटी सुरू झाल्या. देशानं सुटकेचा निःश्वास सोडला. रशियानं हस्तक्षेप करण्याची सध्याची गरज तरी सरली होती. बोटकारखान्याच्या सभागृहात सरकारच्या प्रतिनिधींबरोबर वालेसा अन् त्याचे सहकारी चर्चा करू लागले. सुरुवातीचे काही दिवस सरकार ओढून धरणार हे वालेसा ओळखून होता. त्यानही पहिल्यापासून धरलेला सूर सोडला नाही. आपल्या मागण्या कशा योग्य आहेत हे शिष्टमंडळाला पटवणं वालेसाला तितकंसं अवघड गेलं नाही.

चर्चा संपल्यानंतर दररोज सायंकाळी कारखान्याच्या लोखंडी गेटावर चढून वालेसा उभा राही. चर्चेची फलनिष्पत्ती ऐकण्यासाठी हजारो लोक गेटच्या बाहेर जमत. वालेसाला पाहताच ते त्याच्या नावाचा जयजकार करीत अन् मोठमोठ्यानं एका सुरात ओरडू लागत, 'स्टो लॅट, स्टो लॅट !' ( तो शतायुषी होवो, तो शतायुषी होवो ! )

एखाद्या जाणत्या अभिनेत्याप्रमाणं अभिनय करून वालेसा बोलू लागे. बोलता बोलता तो हातवारे करीत असे. मधूनमधून खुसखुशीत विनोदाची पेरणी त्याच्या बोलण्यात होत असे. त्याचं भाषण श्रवणीय असायचं, त्याहून जास्ती प्रेक्षणीय असायचं. भाषण संपल्यानंतर त्याच्या मुलाखतीसाठी जमलेल्या परदेशी वार्ताहरांना तो मोठ्या



प्रसन्न वातावरणात आवडत्या ' डनहिल ' बरोबर...

¤

अभिमानानं सांगायचा, ' मी यांचा पुढारी आहे. मी कामगारांचा नेता आहे. मी देशातल्या असंतुष्टतेचा जनक आहे. मी सर्वश्रेष्ठ आहे ! '

I am the leader. I am No. 1 त्याच्या बोलण्याला अहंकाराचा वास येतो असं म्हणणाऱ्या त्याच्या विरोधकांनादेखील त्याचं नेतृत्व मान्य करावंच लागलं. पोलंडच्या लोकांच्या सुखदुःखाला वाचा फोडण्याचं काम समरसतेनं अन् समर्थपणे करणं केवळ त्यालाच शक्य आहे हे सर्वजण जाणून होते. केवळ पोलंडमधल्या कामगारांचाच नव्हे तर जणू जगातल्या साऱ्या कामगारवर्गाचा तो प्रतिनिधी बनला होता.

## मी राजकीय पुढारी नाही !

वाटाघाटी चालू राहिल्या. दोन्ही बाजू आपलंच म्हणणं पुढं दामटत होत्या. विरोधी पक्षाचं म्हणणं ऐकून घ्यायची कोणाचीच तयारी नव्हती. कामगारनेत्यांना आपलंच म्हणणं योग्य आहे अशी खात्री होती. कामगारांच्या मागण्या सर्वस्वी अयोग्य असल्याची सरकारी शिष्टमंडळाला खात्री होती. वालेसा दररोज होणाऱ्या वाटाघाटींचा अहवाल सायंकाळी लोकांना देत असे. सरकारी शिष्टमंडळाचा नेता गिरेकसाहेबांशी फोनवरून संपर्क साधून पुढच्या चर्चेची तयारी ठरवीत असे.

लेक वालेसानं कामगारांच्या वतीनं अनेक मागण्या सरकारी शिष्टमंडळापुढं मांडल्या, त्या त्यांच्या पहिल्या दोन मागण्या मान्य झाल्यानंतरच ! कामगारांना संप करण्याचा हक्क आणि युनियन्स स्थापण्याची परवानगी दोन्हीही सरकारनं मान्य केलं होतं. वालेसानं पुढं केलेल्या नंतरच्या मागण्या जशाच्या तशा मान्य होतीलच असं इतरांनाच काय पण खुद्द वालेसाला देखील वाटत नव्हतं.

: कामगारांना आपलं म्हणणं कारखान्यांच्या अधिकाऱ्यांसमोर दर महिन्याला मांडता आलं पाहिजे.

: कारखान्यांच्या अधिकाऱ्यांनी ते म्हणणं सहानुभूतिपूर्वक ऐकून घेतलं पाहिजे.

: ज्या मागण्या रास्त वाटतील त्यांचा विचार लागलीच झाला पाहिजे.

: वादग्रस्त मागण्या वा शंकास्पद तक्रारी डावलण्यात येऊ नयेत. त्यांचा विचार वरिष्ठ अधिकाऱ्यांनी करावा. त्यातूनही काही निष्पन्न न झाल्यास कामगारांच्या नेत्यांना चर्चेसाठी पाचारण करण्यात यावं.

: जे प्रश्न स्थानिक पातळीवर सुटू शकत नाहीत ते सोडवण्यासाठी सरकारी अधिकाऱ्यांची मदत घेतली जावी.

: कामगारांचे कामाचे तास कमी केले जावेत.

: आठवड्यातून फक्त पाचच दिवस कामाचे ठरवून दोन दिवसांची सुट्टी देण्यात यावी.

: कामगारांच्याकडून जबरदस्तीनं जादा काम करून घेण्यात येऊ नये.

: जादा काम करून घेण्याची गरज भासल्यास त्याचे वेगळे व योग्य वेतन मिळावे.

: काही तसे विशेष कारण असल्याशिवाय पोलिसांनी कारखान्याच्या कामकाजात हस्तक्षेप करू नये.

: निश्चित आरोप असल्याखेरीज कामगारांना अटक करण्यात येऊ नये.

: अटक झालेल्या कामगारांना आपली बाजू मांडण्याचा हक्क असावा.

: पोलीसकोठडीत डांबल्या गेलेल्या कामगारांना माणुसकीपूर्ण वागणूक मिळाली पाहिजे.

: कामगारावर खटला चालू झाल्यास युनियनतर्फे त्याला वकील देण्याची परवानगी मिळावी.

: कामगाराच्या वेतनाचा पुर्नविचार दरवर्षी करण्यात यावा.

: वेतनवाढीची सांगड भाववाढीशी घालण्यात यावी.

: अन्नधान्याची टंचाई कामगाराचे शारीरिक व मानसिक स्वास्थ्य बिघडविते, यास्तव अशी टंचाई निर्माण होऊ नये याची काळजी सरकारने विशेष जागरूकतेने घ्यावी.

या साऱ्या मागण्या कामगारांच्या खाजगी जीवनाशी निगडित होत्या. त्या मांडताना वालेसाला संकोच वाटण्याचं कारण नव्हतं; पण वालेसा आणि त्याचे सहकारी एवढ्यावरच समाधान मानायला तयार नव्हते. त्यांना आर्थिक आणि सामाजिक हक्कांबरोबरच इतर काही विशेष हक्कही प्राप्त करून घ्यायचे होते. या विशेष हक्कांना राजकीय हक्क म्हणून संबोधण्याची मात्र त्यांची तयारी नव्हती. परदेशी वृत्तसंस्थांना मुलाखती देताना वालेसा नेहमी म्हणायचा, ' मी काही राजकीय पुढारी नाही. मी आहे साधा कामगार युनियनचा नेता. कामगारांच्या कल्याणासाठी झटणं हे माझं आद्य कर्तव्य आहे. कुठल्याही राजकीय महत्त्वाकांक्षांना माझ्या मनात मुळीच स्थान नाही. असं जरी तो वारंवार म्हणत असला तरी सरकारी शिष्टमंडळाबरोबर होणाऱ्या वाटाघाटीत पुढं ज्या मागण्या मांडण्यात आल्या त्यांना राजकारणाचा थोडादेखील वास नाही असं म्हणणं धाष्टर्याचं ठरणार होतं.

: कामगार संघटनांना आपलं म्हणणं मांडण्यासाठी वर्तमानपत्रात ठराविक जागा देण्यात यावी.

: वृत्तपत्रावरचे सरकारी निर्बंध सैल करण्यात यावेत.
: शक्यतो सर्व बातम्या काटछाट न करता आणि खऱ्या-खुऱ्या छापण्यात याव्यात.
: रेडिओ आणि टेलिव्हिजनवर कामगार युनियन्सना आणि धर्मपीठांना स्वतंत्रपणे कार्यक्रम सादर करण्याची संधी मिळावी.
: पोलंडच्या नागरिकांना विदेशगमनासाठी अकारण अडथळे आणले जाऊ नयेत.
: प्रत्येक इच्छुक नागरिकाला पासपोर्ट द्यावा.

आणि या सर्व मागण्यांच्या शेवटी आणखी एक मागणी पुढं करण्यात आली, ती म्हणजे कामगारसंघटनांचे स्वतःचे स्वतंत्र असे एक मुखपत्र असावे.

## कम्युनिस्ट राज्याला हादरा !

आश्चर्याची गोष्ट अशी की, कित्येक दिवसांच्या प्रदीर्घ वाटाघाटींनंतर कामगारांच्या बहुतेक मागण्या मान्य करण्यात आल्या. काही मागण्या थोडासा फेरफार करून मांडाव्या लागल्या इतकेच. या गोष्टीचं वालेसासकट साऱ्यांना इतकं आश्चर्य वाटलं की, त्यांनी जे मिळवलं त्यावर त्यांचाच विश्वास बसेना. या सर्वाचं श्रेय वालेसा आणि त्याचे सहकारी यांच्या कुशल वाक्‌चातुर्य आणि असीम चिकाटी या गुणांना देण्यात आलं.

कामगार संघटनेच्या स्वतंत्र मुखपत्राची मागणी मात्र सर्वस्वी फेटाळून लावण्यात आली. त्या बाबतीत शिष्टमंडळ विचार करायला देखील तयार नव्हतं. वालेसाच्या काही सहकाऱ्यांनी या मागणीवर अडवणुकीचं धोरण स्वीकारताच वालेसानं त्यांना खाजगी चर्चेत सरळ प्रश्न केला, 'मुखपत्र पाहिजेच असेल तर रशियन सेनेचं स्वागत करायला तुम्ही तयार आहात का ? आपण जे मिळवलंय तेच इतकं अपेक्षेपेक्षा जास्ती आहे की, अधिक मिळवण्यासाठी अडून बसलो तर सारंच गमावण्याची पाळी येईल ! रबर तुटेपर्यंत ताणणं हे शहाणपणाचं लक्षण नव्हे.'

सरकारी शिष्टमंडळाशी वाटाघाटी करण्यासाठी ज्यांची नियुक्ती करण्यात आली होती ते सारेच काही कामगार युनियनचे नेते नव्हते. त्यात KOR चे काही नामवंत पुढारीही समाविष्ट करण्यात आले होते वाटाघाटी यशस्वी करणाऱ्या या नेत्यांच्या समूहाला 'सॉलिडॅरिटी' हे नामाभिधान प्राप्त झालं. याच नावाच्या झेंड्याखाली पोलंडच्या क्रांतीची वाटचाल सुरू झाली.

सरकार आणि सॉलिडॅरिटीच्या समझोत्याची यशस्वी सांगता टेलिव्हिजनवर पोलिश जनतेला पहायला मिळाली. सॉलिडॅरिटीचे नेते आणि सरकारचे प्रतिनिधी एकमेकांशेजारी उभे राहून पोलंडचं राष्ट्रगीत एका सुरात म्हणू लागले, त्या वेळी पोलिश लोकांचा स्वतःच्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. कम्युनिस्ट राष्ट्रात असा चमत्कार प्रथमच पहायला मिळत होता. अखेरीस वालेसानं सॉलिडॅरिटीतर्फे कराराच्या कागदावर एका भल्या मोठ्या पेननं सही केली. या पेनचं वैशिष्ट्य असं होतं की, त्याचा आकार पोप पॉलच्या प्रतिमेसारखा होता. लोकसत्ता, धर्मसत्ता आणि राज्यसत्ता यांचा तो त्रिवेणीसंगम कितीही नयनमनोहर असला तरी कम्युनिस्ट साम्राज्याला हादरा देणारा ठरला !

सॉलिडॅरिटीनं मिळविलेल्या या दैदिप्यमान यशामुळं दिपून गेलेल्या कामगारांनी सॉलिडॅरिटीचं सदस्यत्व मिळविण्याशाठी एकच घाई केली. केवळ काही महिन्यांतच सभासदांची संख्या एक कोटीच्या आसपास पोहोचली. म्हणजेच पोलंडच्या लोकसंख्येचा एकचतुर्थांश भाग सॉलिडॅरिटीमध्ये समाविष्ट झाला. या प्रचंड संघटनेचं संचलन करणं हा एक अत्यंत अवघड अन् अशक्यप्राय वाटणारा प्रकार होता; पण वालेसा आणि त्याच्या सहकाऱ्यांनी पूर्वानुभव नसूनदेखील त्याची योग्य बांधणी करण्यास सुरुवात केली. साऱ्या देशासाठी सॉलिडॅरिटीची प्रांतिक पातळीवर ३८ शाखांत विभागणी करण्यात आली. तिचं मुख्य कार्यालय गडॅन्स्क येथे उघडण्यात आलं, इथूनच संघटनेच्या सर्व कारभाराची सूत्रं हलविण्यात येऊ लागली.

आता प्रश्न उभा राहिला तो संघटनेच्या कार्यपद्धतीचा अन् कार्यक्रमाचा. यासाठी संघटनेचे मूळ उद्देश निश्चित करणं आणि त्यामागची तत्त्वप्रणाली ठरविणं हे आवश्यक होतं. करायला गेलो एक अन् निर्माण झालं वेगळंच अशीच काहीशी ही समस्या होती. भोपळा मागितला तर आवळा तरी हाती पडेल या कल्पनेनं वालेसा अन् त्याच्या सहकाऱ्यांनी ढीगभर मागण्या सरकारपुढं मांडल्या होत्या; पण दान असं काही पडत गेलं होतं की, मागावं ते मिळत गेलं. आता हे मिळवलेलं सांभाळणं मिळविण्यापेक्षा जिकिरीचं ठरलं होतं, कामगारांची गाऱ्हाणी मांडण्यासाठी पुढं झालेली सॉलिडॅरिटी अनपेक्षित मिळालेल्या या यशामुळं फक्त कामगारांचंच नव्हे तर साऱ्या पोलिश जनतेचं नेतृत्व करू लागली आणि वालेसा आपोआपच लोकनेता बनला !

## प्रश्नांचा भडिमार !


सॉलिडॅरिटी ही निव्वळ कामगार संघटना असावी असं वालेसाचं वैयक्तिक मत होतं. सभासमारंभातून हेच मत तो अट्टाहासानं मांडत असे; पण गडॅन्स्क येथे सॉलिडॅरिटीच्या मुख्य कार्यालयाचं उद्घाटन त्याच्या हस्ते करण्यात आलं त्या वेळी जमलेल्या वार्ताहरांनी वेडेवाकडे प्रश्न विचारून त्याला भंडावून सोडलं. डाव्या हातात लाकडी क्रूस आणि उजव्या हातात फुलांचा भला मोठा गुच्छ घेतलेला वालेसा वार्ताहरांच्या प्रश्नांना उत्तरं देत उभा होता.

एका इंग्लिश वार्ताहरानं प्रश्न केला, 'सॉलिडॅरिटी ही कशा प्रकारची संघटना आहे ?'

'कामगारांची गाऱ्हाणी सरकारच्या कानावर घालून दाद मागणारी कामगार संघटना आहे.' वालेसा उत्तरला.

'असं असेल तर पूर्वी कामगार संघटना अस्तित्वात असताना सॉलिडॅरिटीसारख्या वेगळ्या संघटनेची स्थापना करण्याची गरज तुम्हाला का भासावी ?' वार्ताहराचा प्रतिप्रश्न.

## तसं असेल तर सॉलिडॅरिटीसारख्या संघटनेची गरजच का भासावी ?



अशक्य असं काहीच नसतं—लेक व्हॅलेसा.

¤

'ती वेगळी आहे असं तुम्हाला का वाटावं? नाव बदललं तरी कामाचं स्वरूप बदललं असं थोडंच आहे?' इति वालेसा.

'सॉलिडॅरिटीचे सर्व सभासद केवळ कामगारच आहेत का?' एका जर्मन वार्ताहरानं विचारलं.

'नाही. काही बुद्धिवादी विचारवंतही आम्हाला येऊन मिळाले आहेत.'

'बुद्धिवादी विचारवंत कोणत्याही संघटनेत शिरले की, त्यात राजकारणाचा शिरकाव झाल्याशिवाय राहील असं तुम्हाला वाटतं का?' हा प्रश्न एका फ्रेंच वार्ताहरानं केला. यावर काडकन् वालेसा म्हणाला, 'राजकारण ही काय बुद्धिवादी विचारवंतांची मक्तेदारी आहे असं तुम्हाला वाटतं? राजकारण काय कुणीही करू शकेल.'

याचा अर्थ राजकारणाचं तुम्हाला वावडं नाही असाच होतो. नाही का?' त्या फ्रेंच वार्ताहरानं आपल्याला शब्दात पकडलेलं पाहून वालेसा मोठ्यानं हसला आणि म्हणाला, 'तुम्हा लोकांच्याबरोबर बोलायचं म्हणजे जरा जपून बोलायला हवं. अर्थाचा अनर्थ करायला तुम्ही अगदी टपून बसलेले असता. मला वाटतं वार्ताहर ही जमातच तशी धोकादायक असते.' त्याचा सूर थोडासा गंभीर झाला होता. ते पाहून एका अमेरिकन वार्ताहरानं हातातलं '५५५' चं सिगारेट पाकीट उघडून वालेसापुढं धरलं अन् म्हणाला, 'बराच वेळ तुम्ही धूम्रपान केलं नाहीत.'

'मी म्हणजे काय गिरणीची चिमणी वाटलो की काय तुम्हाला? चोवीस तास थोडंच धूम्रपान करतो मी?' त्यातली सिगारेट न घेता वालेसा उद्गारला.

'सॉरी! आमच्या देशात सिगार ओढणारी तुमची छबी अतिशय लोकप्रिय झाली आहे. म्हणून कदाचित आमची तशी कल्पना झाली असेल.'

'नाही तरी भांडवलशाही राष्ट्रांना नको त्या गोष्टीचं भांडवल करण्याची सवय जडली आहे.' वालेसाच्या या द्व्यर्थी बोलण्यावर सारेजण खळखळून हसले.

'तुमच्या विनोदी स्वभावाची लागण इतरांनाही होते असं म्हटलं जातं ते काही खोटं नाही!' असं म्हणत पुढे आलेल्या एका तरुण स्त्रीवार्ताहरानं आपल्या हातातलं सिगारेटचं पाकीट वालेसापुढं धरलं. त्या अमेरिकन स्त्रीवार्ताहराच्या हातातला डनहिल–ब्रॅन्ड हा वालेसाचा आवडता ब्रॅन्ड होता. हातातला फुलांचा गुच्छ खाली ठेवून वालेसानं त्यातली एक सिगारेट घेतली अन् ती ओठात ठेवली. मघाचा तो अमेरिकन वार्ताहर चटकन् पुढं आला अन् हातातल्या लायटरनं वालेसाच्या तोंडातली सिगारेट पेटवत कृतककोपानं म्हणाला, 'पुरुषाची सिगारेट नाकारायची अन् स्त्रीनं दिली की ती आनंदानं स्वीकारायची याला काय म्हणायचं?'

सिगारेटचा धूर तोंडातून बाहेर सोडत मिस्किलपणे वालेसा उत्तरला, 'माझ्या समजुतीप्रमाणं तुमच्या देशात याला स्त्रीदाक्षिण्य असं म्हणतात!' वालेसाच्या या उत्तरानं वातावरणातलं उरलंसुरलं गांभीर्य नाहीसं होऊन गेलं अन् वार्ताहर मोकळेपणानं वालेसावर प्रश्नांचा भडिमार करू लागले.

'सॉलिडॅरिटीसारख्या संघटना इतर कम्युनिस्ट देशात तुमचं यश पाहून स्थापन होऊ लागतील अशी शक्यता कितपत आहे?'

'इतर देशांचं मी कसे सांगणार? पण जे जे काही चांगलं असतं अन् यशस्वी ठरतं त्याचं अनुकरण होणं ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे असं मला वाटतं!'

'आज ना उद्या, आणखी पाच–पंचवीस वर्षांनंतर म्हणा हवं तर रशियात सॉलिडॅरिटीची स्थापना होणं ही गोष्ट तुम्हाला अशक्यप्राय वाटते का?'

## माझं तत्त्वज्ञान सोपं आहे!

'जगात अशक्य असं काहीच नसतं. आम्हालादेखील एवढे हक्क, एवढं स्वातंत्र्य मिळेल असं कुठं वाटलं होतं? आम्ही प्रयत्न करीत राहिलो, आम्हाला हवं ते मिळवणं शक्य झालं. कुठल्याही एका विशिष्ट देशात अमुकच गोष्ट घडून येईल का, तमुक संघटना स्थापन होईल का हे सांगणं एखाद्या ज्योतिषालादेखील शक्य नाही; पण मी एवढं सांगू शकतो, लोकांचे हक्क अन् त्यांचं स्वातंत्र्य फार काळ हिरावून घेतलं असेल तर कधी ना कधी त्याची जाणीव त्यांना झाल्याशिवाय रहात नाही. अशा जाणिवेतूनच सॉलिडॅरिटीसारख्या संघटना जन्म घेतात!'

'तुम्ही फार धार्मिक आहात असं म्हटलं जातं हे खरं आहे का?'

'तसं पाहिलं तर धर्म ही माझी वैयक्तिक बाब आहे. युनियन वा सॉलिडॅरिटीच्या बैठकांची सुरुवात प्रार्थनेनं केली जावी असा आग्रह मी कधीच धरला नाही. मी स्वत: मात्र कोणत्याही महत्त्वाच्या कामाची सुरुवात प्रार्थना करूनच करतो!'

तुम्ही नियमितपणे चर्चला जाता ते कशासाठी?'

'मनाचं समाधान मिळविण्यासाठी. मन अस्वस्थ झालं की शांती मिळवण्याचा तो एकच मार्ग मी चोखाळतो. माझी अशी धारणा

आहे की, ऐहिक सुखासाठी सॉलिडॅरिटीसारख्या संघटनांची जरुरी आहे, तद्वतच आत्म्याच्या उन्नतीसाठी चर्चेस वा धर्मपीठांची गरज आहे.'

'परमेश्वरावर तुमची श्रद्धा आहे का ?'

'अर्थात ! अन्यथा चर्चला जाण्याचं ढोंग करण्याचं मला काहीच कारण नव्हतं. अखेर या ज्ञात विश्वाच्या पलीकडं अशी काही तरी अज्ञात शक्ती असल्याखेरीज या विश्वाचं रहाटगाडगं चालूच शकणार नाही, असं माझं ठाम मत आहे. टाकीत पेट्रोल असल्याशिवाय गाडी जशी धावू शकत नाही त्याप्रमाणं कुठून तरी शक्तीचा पुरवठा झाल्याखेरीज हे जग चालू शकणार नाही!'

'पण कम्युनिझममध्ये देवाला, धर्माला वा श्रद्धेला स्थान नाही, असं असता तुम्ही स्वतःला कम्युनिस्ट कसं म्हणवून घेता ?'

'देव, धर्म वा श्रद्धेशी राजकीय मतप्रणालीची गल्लत करू नका. मी मघाशीच तुम्हाला सांगितलं, धर्म ही वैयक्तिक बाब असते. माझी तर ती निश्चितच आहे अन् श्रद्धा म्हणाल तर ती मी राजकीय पुढाऱ्यांकडून वा तत्त्वज्ञानाच्या पुस्तकांतून घेतली नाही. श्रद्धेचा वारसा मला माझ्या माता पित्यांकडून मिळाला आहे. माझं तत्त्वज्ञान अगदी साधं सोपं आहे. मी तुम्हाला ते थोडक्यात सांगतो. माझ्या वडिलांनी मला जर एक सायकल घेऊन दिली असेल तर मी माझ्या मुलाला मोटर घेऊन द्यायचा प्रयत्न करेन. तुम्हाला ज्या ज्या चांगल्या गोष्टी वाडवडिलांकडून मिळतात त्यात भर टाकून तुम्ही त्या पुढच्या पिढीला देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. श्रद्धेचेही तसंच आहे. चांगल्या विचारसरणीचंही तसंच आहे. आम्हा कामगारांना जे मिळतं त्यापेक्षा पुढं जास्ती मिळालं पाहिजे हीच त्यामागची भावना आहे.

'श्रद्धा वगैरे गोष्टी, परिस्थितीच्या दडपणाखाली तुम्ही असल्यामुळं सांगता आहात अशी शक्यता नाही काय ?'

परिस्थितीचं दडपण माझ्यावर कधीच आलं नाही. मी कारखान्यात असलो काय, घरी असलो काय किंवा तुरुंगात असलो काय मला सर्व जागा तशा सारख्याच वाटतात. याचा अर्थ असा नव्हे की, मला कायम तिथंच रहावंसं वाटतं. देशाच्या परिस्थितीचं दडपण देखील मला खचवून सोडत नाही. ग्रुन्वॉल्डमध्ये लढाई झाली त्या वेळी पोलिश आणि लिथुनियन लोकांनी जर्मनांशी १४१० साली युद्ध करून मातृभूमीला मुक्त केलं. त्यानंतर स्वातंत्र्यासाठी लढण्याचा आमच्या लोकांवर अनेक वेळा प्रसंग आला. तरीही पोलिश लोक लढत राहिले, हरत राहिले अन् जिंकतही राहिले. दुसऱ्या महायुद्धात जर्मनांनी आमचा देश व्यापला; पण अखेर त्यांचाच पराभव झाला. कदाचित् आज आमचा लढा अयशस्वी होईल अन् उद्या आम्ही विजयी होऊ. आज आम्ही बाजी जिंकली तरी उद्या हरणारच नाही अशी खात्री कोण देऊ शकेल का ? आज आम्ही आहोत, उद्या आम्ही असणार नाही; पण श्रद्धा, भावना, तत्त्वज्ञान सारं तिथंच राहणार आहे. येशू ख्रिस्ताला सुळावर चढविण्यात आलं, माणूस म्हणून तो अयशस्वी ठरला असेल; पण परमेश्वरी अंश म्हणून अखेर त्याचाच विजय झाला. त्यानं जगाला दिलेल्या तत्त्वज्ञानाचा विजय झाला. परिस्थितीचं दडपण हे तात्कालिक असतं. तत्त्व अन् श्रद्धा या मात्र चिरंतन असतात !'

'लोकांच्यावर तुमचा इतका प्रभाव पडतो. जनमानसावर तुम्ही इतकी मोहिनी घालता त्या अर्थी तुमच्यात काही तरी असामान्य गुण असावेत. ते नेमके कोणते हे तुम्ही सांगू शकाल का ?'

## सारं जग सुखी होईल ?

'माझ्यात कोणतेच असामान्य गुण नाहीत. यशाला नेहमीच सर्व सद्‌गुण चिकटवले जातात. अगदी गुणच म्हणायचा असेल तर तो म्हणजे माझ्यापुढं जे काम असेल ते मी अगदी मनापासून आणि सर्व कसब पणाला लावून करतो. मी कारखान्यात इलेक्ट्रिशियन म्हणून कामाला लागलो. तिथं मी सर्वोत्कृष्ट इलेक्ट्रिशियन बनण्याचा प्रयत्न केला. लष्करात दाखल झालो असतो तर अतिशय शूर सैनिक होण्याचा मी प्रयत्न केला असता. स्वयंपाकी झालो असतो तर अति उत्तम आणि चविष्ट स्वयंपाक करणं हे माझं उद्दिष्ट राहिलं असतं. एखाद्या कामावरून लाथ मारून मला काढण्यात आलं वा मी ते सोडलं तर मात्र मी त्या कामाकडे पुन्हा ढुंकून पाहणार नाही ! सॉलिडॅरिटीनं माझ्याकडून नेतृत्व हिरावून घेतलं तर मी चुकूनही या भानगडीत पुन्हा पडणार नाही, ही माझी जीवनाबद्दलची कल्पना. बायकोसाठी उत्तम नवरा व्हायचं, मुलांसाठी उत्तम पिता व्हायचं अन् जनतेच्या भल्यासाठी त्यांचा उत्तम सेवक व्हायचं हे माझ्या जीवनाचं सार ! तुम्ही याला तत्त्वज्ञान म्हणत असाल तर म्हणा बापडे !'

'आम्ही असं ऐकतो की, तुम्ही नेहमी भाषणातून लोकांना सांगता की, आपण पोलिश लोक इतरांच्यापेक्षा निराळे आहोत, इतरांच्यापेक्षा सुखी आहोत. अमेरिकन, फ्रेंच, इटालियन आणि जर्मन आदी लोकांनी ऐहिक सुखाच्या मागं धावून आंतरिक समाधानाशी फारकत करून घेतली आहे. असं जर असेल तर तुम्ही ऐहिक सुखं मिळविण्यासाठी एवढे का धडपडताय ?'

'असं सांगण्यात माझा तो उद्देश नाही. गरजेपुरती ऐहिक सुखं जरूर हवीत. ऐहिक सुखांच्या राशीवर लोळावं असं मला कधी वाटत नाही. तुम्ही लोक या सुखांच्या मागं धावताना देहभान विसरता. ऐहिक सुख हेच तुमचं सर्वस्व होऊन बसतं अन् अशा सुखांच्या शोधात निघालेल्या माणसाला कितीही मिळालं तरी ते अपुरंच वाटत राहतं अन् या भावनेतून असमाधानाची, दुःखाची सुरुवात होते. तुम्हाला ठाऊक आहे ? ३६ वर्षांपूर्वी आमच्यावर नवी तत्त्वप्रणाली ( कम्युनिस्ट ) लादण्यात आली. भलत्याच लोकांवर प्रेम करायची आम्हाला आज्ञा देण्यात आली. हुकूम सोडून कुणी कुणावर प्रेम करू शकतं का ? धर्माकडं पाठ फिरविण्याची आज्ञा आम्हाला दिली गेली. देव, धर्म सारं थोतांड आहे असं आम्हाला पढविण्यात आलं. त्याचा परिणाम काय झाला ? नेमका उलटा ! सारा देश धर्ममय होऊन गेला, परमेश्वराच्या भजनी लागला. वाईट शाळेत आम्ही चांगल्या गोष्टी शिकलो; पण अमेरिकेचं उदाहरण पहा.

**सॉलिडॅरिटीनं माझ्याकडून नेतृत्व हिरावून घेतलं तर मी तिकडे ढुंकूनही पाहणार नाही !**

तिथले लोक सर्वच अर्थानं बंधमुक्त आहेत. त्यांच्यावर कसलीही सक्ती केली जात नाही, तरीदेखील ते सर्वार्थानं सुखी आहेत का ? म्हणजेच चांगल्या शाळेत काही वाईट गोष्टी शिकण्याचाही त्यांच्यावर प्रसंग आला. मला वाटतं ऐहिक आणि आंतरिक सुखांचा समन्वय साधता आला पाहिजे. नाही तर सारं जीवन दु:खमय होऊन जाईल !'

'पोलंडच्या भवितव्याविषयी तुमची काय स्वप्नं आहेत ?'

'पोलंडच्या भवितव्याविषयी माझी फार मोठी स्वप्नं नाहीत. फक्त सर्वार्थानं सुधारलेला, सर्वार्थानं सुखी पोलंड एवढंच माझं साधसुधं स्वप्न आहे. पोलंडच्या इतिहासाचा मागोवा घेतला तर उमजून येईल, पोलंड आतापर्यंत एक हजार वेळा सुधारलं आहे, हजार वेळा त्याची प्रगती झाली आहे अन् तितक्याच वेळा त्याला खच्चीही करून टाकण्यात आलं आहे. आम्हाला असं वाटत नाही की आम्ही इतके सुधारू, इतके समाधानी होऊ की, ज्यापुढं सुधारणेची वा प्रगतीची गरजच राहणार नाही. जगातला कोणताही देश प्रगतीच्या परमोच्च शिखरावर पोहोचला आहे आणि स्वत:विषयी पूर्ण संतुष्ट आहे असं चित्र कुठंही कधीही दिसून येत नाही. कारण असं झालं तर ती कदाचित मानवजातीची अखेर ठरण्याचा संभव आहे. आता गंमत पहा, तुम्ही काय, आम्ही काय सारखं काही तरी नवनवीन करण्याच्या, चांगलंचुंगलं करण्याच्या प्रयत्नात असतो. लोकांना ते पहावत नाही. ते त्यात मोडता घालण्याचा प्रयत्न करतात. मुंग्यांचं वारूळ पाहिलंय का तुम्ही ? जरा काळजीपूर्वक पहा. खूप शिकण्यासारखं आहे त्यांच्याकडून. त्या सतत कामात असतात. आळस त्यांना ठाऊकच नाही. त्यांचे रस्ते असतात, वाहतुकीच्या खुणा असतात, नवजातांचं त्या काळजीनं संगोपन करतात. मेलेल्यांची योग्य व्यवस्था लावतात. त्यांच्यात झगडे नसतात, संघर्ष नसतात, संहार नसतात. आपण माणसं कधीकधी त्यांचं सुरळीत चाललेलं पाहतो अन् उगीच त्यात काठी घालून ढवळाढवळ करतो. त्यांचं विस्कळित झालेलं जीवन पाहून सुखावतो. ज्यांचं व्यवस्थित चाललं आहे ते पाहून वाईट वाटून घ्यायचं अन् त्यात निष्कारण काड्या घालायच्या ही माणसाची दुष्प्रवृत्ती कमी झाली तर सारं जग सुखी अन् समृद्ध बनेल ! (क्रमश: )

---

रंगभूमी

# गुंतवून ठेवणारं तेंडुलकरांचं नवं नाटक !

'इंडियन नॅशनल थिएटर' निर्मित श्री. विजय तेंडुलकर-लिखित आणि सदाशिव अमरापूरकर-दिग्दर्शित 'कन्यादान' हे नाटक पाहिले आणि श्री. तेंडुलकरांमधल्या प्रतिभावंताचा आविष्कार बऱ्याच दिवसांनी पहायला मिळाला असे वाटले.

'कन्यादान' म्हणजे एका समाजवादी विचारसरणीच्या ध्येयशील माणसाची कथा.

श्री.नाथ देवळालीकर (श्रीराम लागू) राष्ट्र सेवादलाचे कार्यकर्ते. त्यांची पत्नी सेवा हीसुद्धा समाजकार्यकर्ती (सुहास जोशी). त्यांची दोन मुले – प्रकाश (शिरीष आठवले) आणि ज्योती (सुषमा तेंडुलकर). घरात विचारांचे, कृतीचे प्रत्येकाला स्वातंत्र्य. केवळ दोन महिन्यांच्या ओळखीवर ज्योती एका दलित मुलाशी अरुण आठवलेशी (सदाशिव अमरापूरकर) विवाह ठरवते. तिच्या आईला आणि भावाला पसंत नसले तरी ते टोकाचा विरोध करत नाहीत. समजावून सांगतात. नाथ मात्र या विवाहास प्रोत्साहन देतात. विवाहानंतर दारू पिऊन मारहाण करणारा अरुण सहन न होऊन ज्योती माहेरी निघून येते–पुन्हा त्याचे तोंड पहायचे नाही म्हणून! तिच्यापाठोपाठ नशेतच अरुण येतो. ज्योतीला मारहाण केल्याचे सांगून आम्ही असे का याबद्दल बरीच बडबड करतो. ज्योती पुन्हा अरुणबरोबर जाते. पुन्हा मारहाण सुरूच होते. अरुणचे आत्मचरित्र प्रसिद्ध होते. नाथला ते प्रथम आवडते; पण ज्योतीशी अरुणच्या वागणुकीचा विचार करता ते खोटे वाटते. ते आत्मचरित्र गाजते. पारितोषिके मिळवते. ज्योतीचा मार चुकावा म्हणूनच केवळ नाथ सभेत त्या आत्मचरित्राबद्दल वरवरचे बोलतो. त्याच्या या वागणुकीबद्दल ज्योती त्याला 'सगळ्या पेचातून सुटून जगणारा भेकड माणूस' ठरवते. नाथ हताशपणे बसून रहातो.

प्रथमपासून शेवटपर्यंत प्रेक्षक नाटकात अगदी गुंतून पडतात. नाथ आणि सेवा यांची सुजाण व्यक्तिचित्रे, विचार–आचार–स्वातंत्र्य उपभोगणाऱ्या घरातील वातावरणाचे वास्तव चित्र यामुळे नाटक प्रेक्षकांची पकड घेते. आंतरजातीय विवाह, त्यामुळे कुटुंबात होणारा प्रलय तसा हिंदी चित्रपटांनी चघळून चोथा केलेला विषय आहे; परंतु या नाटकात या विषयाला विचारशील कुटुंबाची पार्श्वभूमी लाभली आहे, त्यामुळे त्याचे स्वरूप सर्वस्वी वेगळे झाले आहे. जातिनिर्मूलनाचे आपले ध्येय मुलगी प्रत्यक्ष कृतीत आणते आहे म्हणून आनंदित झालेला नाथ मुलीला शंभर टक्के बरोबर आहे असे म्हणत नाही. ती बरोबर किंवा चुकीची असेल; पण हा एक प्रयोग आहे, आपण सगळ्यांनी तिच्याबरोबर रहायचे आहे अशीच त्याची भूमिका आहे. त्याचे ध्येयवादित्व आणि वैचारिक परिपक्वता यांचे या भूमिकेत सहज दर्शन होते. सेवाचाही या विवाहाला विरोध असला तरी त्यामागची वैचारिक भूमिका तिच्या बोलण्यातून सहजपणे प्रकट होते. एका रात्रीत सगळे संस्कार पुसता येत नाहीत असे तिला वाटते. दलितांबद्दलचे तिचे विचार परंपरेतून आलेले नाहीत, तिच्या समाज–कार्याच्या निरीक्षणातून आलेले आहेत. अशी व्यक्तिचित्रे उभी करणे कठीण आहे; पण येथे तेंडुलकरांना ते सहज जमून गेले आहे. त्यामुळे ही माणसे निर्जीव वाटत नाहीत. ज्योती घरी आल्यावर, प्रयोग फसतो आहेसे वाटून निराश होणारा नाथ, अरुणला मन:पूर्वक समजून घेणारा नाथ, ज्योतीला मारतो

म्हणून अरुणवर चिडणारा नाथ, सभेला जाण्याचे नाकारणारा नाथ, अगतिकपणे भाषण करायला जाणारा नाथ, बापाच्या शहाणपणावर विश्वासू नकोस असे मुलाला सांगणारा नाथ ! नाथाच्या व्यक्तिमत्त्वाचे असे किती तरी कोन आपल्याला दिसतात. त्याच्या व्यक्तिमत्त्वाने नाटक पूर्णपणे व्यापून टाकले आहे. या कुटुंबातली माणसे एक-सारखी आपले विचार मांडतात; पण ते रुक्ष मतप्रतिपादन वाटत नाही किंवा जड चर्चा चालली आहे असेही वाटत नाही. कारण काही अपवाद. संवादांना पात्रानुसार एक स्वाभाविक ओघ आहे. यामुळे नाटक प्रभावी झाले आहे. लेखक, दिग्दर्शक, कला-कार यांच्या सुरेख संगमामुळे प्रयोग उत्तम होतो.

तेंडुलकरांच्या प्रस्तुत नाटकात काय आहे त्यामुळे ते चांगले वाटते ते सांगितले. त्याच-बरोबर तेंडुलकरांच्या गेल्या काही वर्षांतल्या लेखनाचा विचार करता नेहमीचे काहीबाही नसल्यामुळेही नाटक चांगले वाटते असे म्हणावे लागेल. प्रस्थापित समाजाच्या कल्पनेप्रमाणे जी माणसे हीन मानली गेली आहेत, विकृत मानली गेली आहेत त्यांचे समर्थन करण्याकडे तेंडुलकरांचा कल असतो.

## बांधिलकी तीच, बोधवाक्य उलटे !

सखाराम बाइंडर समाजाचा एक अवि-भाज्य घटक म्हणून कितीही ओंगळपणे रंगविला तरी हरकत नाही; परंतु तेवढाच खरेखरे जगणारा वीर, बाकी पांढरपेशावर्ग म्हणजे दुबळेपणाने, भेकडपणाने जगणारे फडतूस जीव असा सूर तेंडुलकर लावतात. तेव्हा ते समर्थन होते. समलिंगी संभोगाचे चित्र नाटककाराने व्यक्त करूच नये असे मुळीच नाही; पण तेंडुलकरांच्या 'मित्राची गोष्ट' या नाटकातील अशा विकृत सुमित्रे-बद्दल तिचीच शिकार झालेल्या नमाला आकर्षण का वाटते हे कळत नाही. हा केवळ सुमित्रेकडे प्रेक्षकांची सहानुभूती खेचण्याचा प्रयत्न वाटतो. यामुळे ते विकृतीचे समर्थन होते.

यामागे प्रस्थापित मूल्यांकडे चिकित्सक दृष्टीने पहाण्याची प्रेरणा असली तरी प्रत्य-क्षात तेंडुलकर तितके खोलात जात नाहीत आणि त्या प्रेरणेचे रूपांतर समाजाला अति-शय उथळपणे उगीचच धक्के देण्याच्या वृत्तीत होते. आचार्य अत्रे यांनी माधव ज्यूलियनांच्या बंडखोरीची प्रवृत्ती दाखवताना एक उदाहरण दिले होते. सगळ्याच माणसांना भुवया असतात. तेव्हा एक मुलगा भुवयांचे केस साफ काढून वर्गात आला आणि म्हणू लागला, 'मी क्रांती केली.' तेंडुलकरांची प्रस्थापित मूल्यांविरुद्धची क्रांती काहीशी याच जातीची आहे. कारण जे प्रस्थापित आहे ते दांभिक आणि खोटे आहे असे ते मांडतात; पण त्याची सूक्ष्म कारणे मात्र ते देत नाहीत किंवा ती ढोबळ असतात. म्हणू-नच 'श्रीमंत' या नाटकात, मुलीची अब्रू वाचविण्यासाठी नातवाच्या बारशाला आण-लेला कोणी कनिष्ठ वर्गातला बाप त्या मुलाचे खऱ्याखुऱ्या वात्सल्याने चुंबन घेतो; पण ते पांढरपेशे कुटुंब मात्र काम होताक्षणीच त्याला बाहेर घालवते. त्याची अवहेलना होते. ते कुटुंब सुखात ! 'कमला' या नाटकात खरीखुरी वस्तुस्थिती उघडकीला आणणाऱ्या बंडखोर नायकाची नोकरी जाते. 'आक्रित' मध्ये खुनांपाठिमागचा पुढारी सुटतो. (अपुऱ्या कारणांनी आलेली ही चित्रे पाहून वाटते तेंडुलकरांच्या मनात एक बोधवाक्य आहे – 'असत्यमेव जयते'. 'सत्यमेव जयते' हे बोधवाक्य डोळ्यासमोर ठेवून लिहिणारे बाळबोध लेखक होऊन गेले, आजही आहेत. तेंडुलकर त्यांच्याच जवळचे आहेत असे ही ढोबळ चित्रे पाहून वाटते. तीच बांधिलकी ! पण बोधवाक्य उलटया अर्थाचे. 'कन्यादान' हे नाटक या तेंडुलकरी मर्यादेपासून पुष्कळच प्रमाणात मुक्त आहे म्हणून ते आकर्षून घेते; परंतु पूर्ण मुक्त आहे असे म्हणता येणार नाही.

ज्योती अरुणशी विवाह का करते हे स्पष्ट होत नाही. त्याच्या कविता आवडल्याचे ती सांगते; पण प्रेमाचा साक्षात्कार झाला नसल्याचेही स्पष्ट सांगते. मी हा निर्णय घेतला असे ती म्हणते; पण निर्णय घेण्याचे कारण सांगत नाही. हा प्रयोग आहे असे तिचे वडील म्हणतात; पण ती म्हणत नाही. तिची कौटुं-बिक पार्श्वभूमी लक्षात घेता ती स्वतःचे मन व्यवस्थित समजू शकणारी आणि व्यक्त कर-णारी असावी असे वाटते. वयाच्या दहाव्या वर्षापासून ती आपल्या वडिलांच्या व्याख्या-नांची टीकाकर असल्याचा उल्लेख नाटकात आहे. अगदी सुरुवातीला ती वडिलांना फाइल तयार करून देताना दिसते. शेवटी स्वतः-लाच न पटणारे भाषण केल्याबद्दल वडिलांना जाब विचारते. अशी हुषार मुलगी आई-वडिलांची माया, वात्सल्य, त्यापोटी उद्भव-णारी हतबलता, निराशा समजू शकत नाही,



तुम्ही आम्हाला मुद्दाम खुरटं केलंत ! – ज्योती आणि नाथ

याचे आश्चर्य वाटते. 'तुम्ही आम्हाला मुद्दाम खुरटं केलंत. तुम्ही सगळ्या पेचातून सुटू शकता. खरी झगडते आहे ती मी !' अशा आशयाच्या शब्दात ती वडिलांची संभावना का करते ते कळत नाही. कारण नाथाचे वागणे प्रामाणिक दिसते. म्हणूनच तिचे शेवटचे वाक्ताडन अत्यंत अविचाराचे, आक्रस्ताळे आणि मुजोरीचे वाटते. या प्रसंगाला 'युवक आघाडी की जय' या घोषणेचा वास मारतो.

नाटकात आलेले दलित अरुण आठवलेचे चित्रही तितकेसे पटत नाही. सभेसाठी तो नाथांना बोलवायला येतो. तेव्हाचे त्याच्या बोलण्यातले पेच फार योग्य आलेले आहेत; परंतु त्याचा असंस्कृतपणा फारच ढोबळपणे, भडकपणे दाखवला आहे. तो ज्योतीचा हात वेदना होईपर्यंत पिरगळतो हे पटतच नाही. दारूच्या नशेचा तमाशाही अतिरेकी वाटतो. शहरी शिक्षित दलितांचे हे चित्र वास्तवाला धरून वाटत नाही.

**दोन होड्यांतला प्रवास**

विजय तेंडुलकरांच्या नाटकात इतका ढोबळपणा पाहिला की खेद होतो. कारण तेंडुलकर प्रतिभावंत आहेत. 'कोवळी उन्हे' हे ललित निबंध वाचताना 'नवनवोन्मेष-शालिनी प्रतिभा' या सुभाषिताचा अर्थ कळतो. 'राजकारणी' म्हणून अवघ्या एक-दोन तासांच्या निरीक्षणात वसंतराव नाइकांचे तेंडुलकरांनी रेखाटलेले चित्र म्हणजे उत्कृष्ट साहित्याचा नमुना आहे. ग्रामीण राजकारणाच्या जाणिवेचा उत्तम आविष्कार 'पाहिजे जातीचे' या नाटकात दिसतो. कलावंताची कुतरओढ 'मी जिंकली, मी हरलो' या नाटकात सूक्ष्मपणे चित्रित केली आहे. दूरदर्शनवर त्यांनी घेतलेल्या मुलाखती तर केवळ आदर्श वाटतात. निरक्षर कामकऱ्यापासून, उच्च विद्याविभूषित डॉक्टरपर्यंत कोणालाही ते सहजपणे बोलके करतात. त्यांची मनुष्यस्वभाव–आकलनाची सूक्ष्मता त्यात कळते. तरी आपल्या लेखनातील मनुष्य-स्वभावदर्शन घडवताना तेंडुलकर प्रस्तुत नाटकाच्या संदर्भात सांगितल्याप्रमाणे ढोबळ चुका करतात, याचे कारण काय असावे ?

याचे कारण असे दिसते की, प्रतिभावंत तेंडुलकरांच्या मनात काही हिशोब पक्के दिसतात. अभिरुचीचे स्थूलमानाने दोन प्रवाह आता प्रेक्षकांमध्ये आढळतात. एक विजया मेहतांच्या नाटकांचा आणि सत्यजित रे यांच्या चित्रपटांचा चाहता प्रेक्षकवर्ग. दुसरा हिट अ‍ॅन्ड हॉट नाटक–चित्रपटांचा प्रेक्षकवर्ग. तेंडुलकर आपल्या नाटक-चित्रपटात पहिल्या वर्गातील प्रेक्षकांना हवे तसे वातावरण, व्यक्तिचित्रे घेतात आणि त्यात दुसऱ्या वर्गातल्या प्रेक्षकांना आवडणारा मसाला खुबीने भरतात. म्हणून आक्रित, आक्रोश, उंबरठा चित्रपटात वातावरण वास्तव आहे आणि धुव्वाधार शयनदृश्येही आहेत. 'घरकुल' या नाटकात वास्तव गृहचित्र आहे; पण गृहप्रमुखाची प्रेयसी प्रथम भेटीतच त्याच्या पत्नीला सांगते, 'माझी त्याची ओळख आहे. सांगू ! त्याच्या मांडीवर एक डाग आहे' असा तेंडुलकरांचा दोन होडयात पाय ठेवून प्रवास चाललेला दिसतो. हा ओढाताणीचा प्रवास करताना चालू जमान्यात पुरोगामित्वाचा टिळा मिरविण्यासाठी जे काही लागते तेही तेंडुलकर आपल्या नाटक, चित्रपटात चलाखीने ढकलून देतात. पांढरपेशांचा उपहास, त्यांची पराभूत वृत्ती, स्त्रीमुक्ती, युवकांचा जय, शोषितांचा सच्चेपणा, लैंगिक सत्य या कल्पनांचा उद्घोष केला की, पुरोगामित्वाचा टिळा सहज लागतो. तेंडुलकरांच्या नाटक–चित्रपट-कथात या कल्पनांचा उद्घोष ठायी ठायी झाला आहे.

'कन्यादान' मात्र या उद्घोषातून खूपच सुटले आहे. (अरुणची दलितांविषयीची नशेतली बडबड, ज्योतीचे शेवटचे 'मी महारीण आहे' वगैरे वाक्ताडन आणि 'तुमचा संबंध नेमका कुठपर्यंत आला आहे' असे सेवाचे विचारणे एवढ्या तीनच ठिकाणी ठरीव ठशाचे तेंडुलकर दिसतात.) म्हणूनच तेंडुलकरांचे हे महत्त्वाचे नाटक आहे. समाजातल्या शोषित दलितवर्गातील अरुण आठवलेचे चित्र प्रेक्षकांची सहानुभूती खेचून घेणार नाही. पांढऱ्या टोपीच्या राज्यातल्या शहरी मुजोर दलिताचे हे चित्र आहे. प्रेक्षकांची सहानुभूती गमावण्याइतकी ही मुजोरी भडक झाली आहे. तेंडुलकर कोणत्या सभांना उपस्थित असतात, तेथे कोणत्या प्रकारची भाषणे करतात हे लक्षात घेता त्यांनी रंगविलेले दलितचित्रही त्यांच्यातला बदल दर्शविते. काही वर्षांपूर्वी 'अशी पाखरे येती' या नाटकात एका निष्क्रिय एकांतिक रा. संघस्वयंसेवकाचे चित्र तेंडुलकरांनी दाखविले होते. तेंडुककर ही व्यक्ती लक्षात घेता यात काही आश्चर्य नव्हते; पण 'कन्यादान'मध्ये एका एकांतिक, पराभूत समाजवाद्याचे सानेगुरुजींच्या भक्ताचे चित्र आहे ही महत्त्वपूर्ण घटना आहे.

तेंडुलकरांमधले हे बदल स्वागतार्ह आहेत. अनेक बाह्य आणि आंतरिक दडपणांनी बंदिस्त झालेली त्यांची प्रतिभा मुक्त होऊ पहात आहे असे यातून दिसते. प्रतिभावंताने उंच भरारी घेऊन सर्व भूतल पहायचा असतो. जमिनीवर रहाणाऱ्यांना तो विशिष्ट दृष्टिकोनातूनच दिसू शकतो. भरारी घेण्याची ताकद असूनही – तेंडुलकरांनी भोवताली असे विशिष्ट दृष्टिकोनातून पाहिले आहे. या दृष्टिकोनाच्या मर्यादा त्यांच्यावर पडल्या. त्यामुळे माणसाचा स्वार्थ, माणसाची विचारा-आचारातली विसंगती, माणसाने माणसाचे केलेले शोषण हे सगळे पाहून त्यांना एक दुर्मुखलेपण आले आहे. या दुर्मुखलेपणातून त्यांच्या लेखनाचा ठरीव साचा झाला आहे. दुर्मुखलेपणाचे रूपांतर करुणेत व्हायला हवे आहे. प्रतिभेला करुणेचा वर मिळाला तर खचितच सुंदर कलाकृती निर्माण होऊ शकते. म्हणूनच आता तेंडुलकरांनी क्षणकाल थांबायला हवे आहे. अनेक दडपणांनी झाकोळून गेलेल्या स्वतःच्या अंतःप्रेरणांचा शोध घ्यायला हवा आहे. आंतरिक ऊर्मींना साद घालायला हवी आहे आणि मग पुढची वाट चालायला हवी आहे.

–विनया खडपेकर


**दुसरी आवृत्ती**

# एक होता कार्व्हर

**लेखिका : सौ. वीणा गवाणकर**

**प्रकाशनाच्या वाटेवर**

'माणूस' १९८२ दिवाळी अंकात
प्रसिद्ध झालेली

## आयडा स्कडर

या आद्य मिशनरी स्त्री डॉक्टरची
अपूर्ण जीवनकहाणीही
लवकरच पूर्ण पुस्तकरूपात.
लेखिका : सौ. वीणा गवाणकर

**राजहंस प्रकाशन, पुणे**

# हॅट्स ऑफ टू थिएटर अॅकॅडमी

डॉ. सदानंद बोरसे


'काय, कसं होतं नाटक ?' या प्रश्नाला एकदम 'भिकार, वाईट' किंवा 'का ऽ ऽ ही कळत नाही' असे शेरे मारायला माणूस बिचकला किंवा 'अरे, भन्नाट, अफलातून !' अशी एकदम स्तुतिसुमनांची आतषबाजी करायला लागला, तर अचूक ओळखावे की, नाटक थिएटर अॅकॅडमीचे आहे. 'थिएटर अॅकॅडमी' या नुसत्या नावाने आज मराठी रंगभूमीवर स्वतःचा एवढा दबदबा निर्माण केला आहे. घाशीराम कोतवाल–मराठी रंगभूमीवरील मैलाचा दगड, थिएटर अॅकॅडमी–भारताबाहेर नाट्यप्रयोग करणारी मराठी रंगभूमीवरील पहिली संस्था, जब्बार पटेल–सामूहिक अभिनयाची मुहूर्तमेढ मराठी रंगभूमीवर रोवणारा पहिला दिग्दर्शक अशी कित्येक पहिलेपणे थिएटर अॅकॅडमीने खात्यावर गेल्या दहा वर्षांमध्ये जमा करून ठेवली आहेत; पण दहा वर्षांपूर्वी–

जेव्हा जब्बार पटेल नुकताच पी. डी. ए. च्या भुईतून डोके वर काढत होता, जेव्हा थिएटर अॅकॅडमीचा जन्मही झालेला नव्हता, जेव्हा संस्कृतिरक्षकांची वादळं रोज 'घाशीराम कोतवाल' आणि संबंधितांना धोपटत होती, पुण्यात त्या वेळी असं एकही वर्तमानपत्र नव्हतं, ज्यात रोज 'घाशीराम कोतवाल'बद्दल काहीही उलटसुलट बातमी नाही, तेव्हा थिएटर अॅकॅडमीच्या या भावी संस्थापकांना तरी उद्याच्या आपल्या या यशाची कल्पना होती की नाही कोण जाणे. एक नक्की, स्वतःच्या या नवजात नाटकाबद्दल–'घाशीराम कोतवाल'बद्दल ही सगळी मंडळी एकमेकांशी आणि या नाटकाशी घट्ट बांधलेली होती. या बांधलेपणातूनच 'थिएटर अॅकॅडमी'चा जन्म झाला आणि या नव्या संस्थेतर्फे 'घाशीराम कोतवाल' दिमाखात रंगभूमीवर वावरू लागला. 'घाशीराम'-बद्दल आक्षेप घेणाऱ्यांचे त्या वेळचे विनोद मला अजून आठवतात, 'ते नाटक वाईट आहे. मी ते पाहिलेले नाही, पाहणारही नाही कारण ते नाटक भिकार आहे. आमच्या पपू ऐतिहासिक पुरुषाची निंद्य कुचेष्टा करणाऱ्या त्या नाटकाचे तोंड मी स्वप्नातही पाहणार नाही !' 'घाशीराम'बद्दल आक्षेप घेणाऱ्या सर्व नानाभक्तांना 'घाशीराम' नाटक न वाटता मराठेशाहीच्या इतिहासाचे क्रमिक पाठ्यपुस्तकच वाटत होते. नाटकवाल्यांनी मात्र घाशीरामलाच आपले दैवत बनवले. घाशीरामचा प्रयोग पाहिलेला नसणे ही गोष्ट नाट्यविषयक अज्ञानाची, अनभिज्ञतेची आणि प्रायोगिकतेबद्दलच्या अनाकर्षणाची निदर्शक बनली. मूलतः तमाशा आणि अन्य कला व संगीताच्या आविष्करणतंत्राच्या मिश्रणाने बनलेल्या 'घाशीराम कोतवाल'ने मराठी रंगभूमीवर स्वतःचे वेगळे आविष्कारतंत्र निर्माण केले. पार शालेय नाट्यस्पर्धांपासून ते पुरुषोत्तम करंडक अथवा अन्य एकांकिका स्पर्धांपर्यंत अनेक ठिकाणी 'घाशीराम कोतवाल'चा जबरदस्त पगडा अजूनही दिसून येतो. खुद्द जब्बारच्या डोक्यावरसुद्धा ही 'घाशीराम'ची पगडी किती घट्ट बसली आहे, याचे प्रत्यंतर घाशीरामनंतर पाच–सात वर्षांनी जब्बारने बनवलेल्या 'तीन पैशाचा तमाशा'मधून बघायला मिळते.

आणि घाशीरामनंतर महानिर्वाण, महापूर, खेळिया अशा एकामागोमाग एक यशस्वी नाटकांची थिएटर अॅकॅडमीने माळच लावली.

## कौतुक आहेच आणि आश्चर्यही

'घाशीराम'च्या सर्व दिव्यांतून तावूनसुलाखून निघण्याचा व्यत्यास म्हणून असेल कदाचित; पण नाटकाच्या प्रत्येक अंगातील अत्यंत सुपीक डोके असलेला एक तरी मोहरा थिएटर अॅकॅडमीच्या वाट्याला आला. 'घाशीराम' विजय तेंडुलकरांचे आहे अथवा 'तीन पैशाचा तमाशा' पु. ल. देशपांड्यांचे आहे, हा भाग सोडूनही सतीश आळेकरांसारखा मराठी प्रायोगिक रंगभूमीवरील एक बिनीचा नाटककार थिएटर अॅकॅडमीला लाभला. प्रत्येक कलाकाराचे मनातील आशय व्यक्त करण्यासाठी एकेक माध्यम असते. सतीश आळेकरांच्या डोक्यात आशय भरपूर आहेच, (क्वचित तो आपल्या डोक्यावरून जातो, ते सोडा), शिवाय तो समर्थपणे व्यक्त करण्याचे त्यांचे माध्यम नाटक हेच आहे. त्यांनी (चुकून) एका कॉलेजच्या नियतकालिकासाठी एक कथा लिहिली होती, ती वाचल्यानंतर तर नाटक आणि फक्त नाटक हेच त्यांचे अभिव्यक्तीचे माध्यम आहे, ही गोष्ट फारच पटते. शिवाय 'महापूर' वगळता स्वतःची सर्व नाटके स्वतःच दिग्द-



चांगल्या कलाकारांची एक लांबलचक पलटणच टि. ए.कडे आहे. 'महानिर्वाण'मध्ये चंद्रकांत काळे



**' मिकी आणि मेमसाब ' ते**
**' शनिवार–रविवार ' – आळेकर**

शित केल्याने लेखक आणि दिग्दर्शक यांच्या इंटरप्रिटेशनमध्ये येणारा फरक वगैरे याही गोष्टी आळेकरांना टाळता आल्या. आळेकरांच्या नाटकात–लेखन आणि दिग्दर्शन या दोन्ही दृष्टींनी क्लृप्त्या भरपूर असतात, पुनरावृत्ती भरपूर असते, अत्यंत तात्कालिक आणि त्यामुळेच तकलादू असणारे संदर्भही भरपूर असतात; पण नाटकांमधील आशयघनता, बहुतेक व्यक्तींचे सुंदर मनोविश्लेषण आणि खवचट, बोचऱ्या आणि अनपेक्षित विनोदाची (या विनोदाचासुद्धा मराठी नाटकांमध्ये खास आळेकरी साचा बनून गेला आहे) पखरण लाभलेले अत्यंत चपखल संवाद यांच्या जोरावर नाटचलेखनातील आधी उल्लेखलेल्या तांत्रिक बाजू कोणाच्या लक्षातही येत नाहीत. ' मिकी आणि मेमसाहेब ' पासून ' शनिवार–रविवार ' पर्यंतची आळेकरांची कामगिरी म्हणजे एक स्वतंत्र प्रबंधाचाच विषय आहे.

जब्बार पटेलांबद्दल तर थिएटर ॲकॅडमी, त्यांची नाटके आणि चित्रपट या सर्व संदर्भात इतके लिहिले आणि बोलले गेले आहे की, त्यातून जब्बारला स्वतःलाही स्वतःबद्दल काही नवीन शोध लागतील. या संशोधनमोहिमेत आणखी काही मोलाची भर घालण्याची माझी तरी इच्छा नाही.

अभिनेत्यांच्या बाजूला थिएटर ॲकॅडमीकडे डॉ. मोहन आगाश्यांपासून ते प्रसाद पुरंदऱ्यांपर्यंत मोठी पलटणच्या पलटण उभी असली तरी अभिनेत्रींच्या बाबतीत अन्य संस्थांसारखीच अवस्था थिएटर ॲकॅडमीचीही होत असावी. मंजिरी परांजपे, हेमा लेले अशी नावे डोक्याला जरासा शीण देऊन आठवूनच काढावी लागतात.

आनंद मोडक हा अष्टपैलू संगीतकार ही थिएटर ॲकॅडमीची मराठी रंगभूमीला मिळालेली आणखी एक देणगी. 'घाशीराम' आणि 'तीन पैशांचा तमाशा' मध्ये पं. भास्कर चंदावरकरांचा साहाय्यकच राहिलेल्या आनंद मोडकची संगीतकार म्हणून कामगिरी ' महानिर्वाण ' आणि ' वदकांचं गुपित ' ( मर्ढेकरांची संगीतिका ) यांमधून भरभरून वाहिली आहे. हीच गोष्ट थिएटर ॲकॅडमीच्या सर्व गायकीचे आधारस्तंभ ठरलेल्या चंद्रकांत काळे आणि रवींद्र साठे या गायक नटांची.

केवळ कलागुणांच्या जोरावर माणसे व्यक्तिशः चमकू शकतील; पण संस्थेचा डोलारा भक्कमपणे उभा राहात नाही. नाटकासारख्या बेभरवशी खेळाला वाहून घेतलेल्या संस्थेला तर आपला आर्थिक पाया मजबूत ठेवावाच लागतो. थिएटर ॲकॅडमीचे सुदैव म्हणजे ही अर्थकारणाची तारेवरची कसरत त्यांनी चांगलीच तोलली. घाशीरामचे दोन प्रयोग केल्यास महापूरचा एक प्रयोग किंवा घाशीरामच्या एका प्रयोगाबरोबर अन्य नाटकाचा एखादा प्रयोग अशा रीतीने नाटचप्रयोगांबरोबर ही आर्थिक सांगडही उत्तम बसली आहे. अर्थकारण आणि संस्थेच्या एकूण व्यवस्थापनाच्या बाबतीत श्री. श्रीधर राजगुरूंची कामगिरी माझ्या मते अतिशय उल्लेखनीय आहे. अण्णांनी पूर्वी नाटकांमधून भूमिका केल्या आहेत किंवा नाटके दिग्दर्शित केली आहेत, ह्या गोष्टीची आठवण करून द्यावी लागेल, इतके राजगुरूंनी थिएटर ॲकॅडमीच्या व्यवस्थापनाला वाहून घेतले आहे. प्रत्येक थिएटर ॲकॅडमीच्या मागे एका जब्बार पटेल वा एका सतीश आळेकरच्या बरोबरीने असा एक श्रीधर राजगुरु खंबीरपणे उभा असावा लागतो !

पण थिएटर ॲकॅडमीच्या बाबतीत या सगळ्याच गोष्टींचे सांधे जुळून आले असावेत. अन्यथा आळेकरांची नाटके स्वतःच्या फायद्यासाठी पुस्तके प्रकाशित करणाऱ्या प्रकाशकांनी हातात तरी धरली असती की नाही, शंकाच आहे; पण नाही, प्रकाश रानडेचे नीळकंठ प्रकाशन हजर आहे ना त्यासाठी ! खरे म्हणजे त्याचेही नाव बदलून ' थिएटर ॲकॅडमी प्रकाशन ' असे नवे नाव द्यायला काही हरकत नाही !

मला नाटकाच्या बाबतीत या सर्व मंडळींचे कौतुक वाटतेच; पण त्यांच्याबद्दल आश्चर्य वाटायला लागते ते ना. धों. महानोरांच्या कविता त्यांच्यातर्फे आपल्या कानावर पडतात

## दृष्टिक्षेपात –

| | नाटक | प्रथम प्रयोगाचा दिनांक | एकूण प्रयोग |
|---|---|---|---|
| १ ) | मिकी आणि मेमसाहेब | १–१२–७३ | ८ |
| २ ) | घाशीराम कोतवाल | ११–१–७४ | २६७ |
| ३ ) | बीज | २७–७–७४ | ७ |
| ४ ) | महानिर्वाण | २०–११–७४ | ११२ |
| ५ ) | महापूर | ३१–१०–७५ | २८ |
| ६ ) | खेळिया | ३–४–७७ | ३४ |
| ७ ) | भाऊ मुरारराव | २२–८–७७ | ६ |
| ८ ) | फरारी | १८–११–७७ | ३ |
| ९ ) | तीन पैशाचा तमाशा | २५–६–७८ | १०० |
| १० ) | बेगम बर्वे | १०–३–७९ | १७ |
| ११ ) | डॉल्स हाउस | २९–२–८० | २ |
| १२ ) | शनिवार–रविवार | ५–५–८२ | २१ |
| १३ ) | पडघम | आगामी | |
| १४ ) | गाभारा | आगामी | |

तेव्हा, मर्ढेकरांच्या कविता त्यांच्यातर्फे पु. ल. आणि सुनीता देशपांड्यांच्या कंठातून ऐकू येतात तेव्हा, शंभू मित्रांचा अिडिपस त्यांच्यातर्फे बालगंधर्वमध्ये पाहायला मिळतो तेव्हा किंवा हबीब तन्वीरचा 'चरणदास चोर' त्यांच्यातर्फे सादर होतो तेव्हा किंवा सावरी मित्राचे काव्यवाचन त्यांच्यातर्फे सादर केले जाते तेव्हा. चित्रपटाच्या क्षेत्रात तर या मंडळींनी केव्हाच सूर आणि मुटके मारलेले आहेत. उद्या जर 'थिएटर अॅकॅडमी'तर्फे कबड्डी आणि हुतूतूचे सामने जाहीर झाले किंवा कोणी लोकसभेला उभे राहिले तरी माझ्या आताच्या आश्चर्यात फार वाढ होणार नाही.

थिएटर अॅकॅडमीच्या दहा वर्षांच्या वाटचालीचा विचार करताना एक गोष्ट मात्र प्रकर्षाने जाणवते आणि त्याबाबतीतच एक आक्षेप घ्यावासा वाटतो. थिएटर आणि अॅकॅडमी यांची परस्परांपासून झालेली फारकत. थिएटर अॅकॅडमीतील जब्बार पटेल, सतीश आळेकर, मोहन गोखले, मोहन आगाशे, आनंद मोडक, चंद्रकांत काळे अशा हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्या माणसांनी लेखन, दिग्दर्शन, संगीत, अभिनय अशा वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये स्वतःची स्वतंत्र स्थाने निर्माण केली; पण या लोकांनी निर्माण केलेले 'थिएटर' त्यांच्यानंतरच्या फळीपर्यंत पोहोचविण्यात त्यांना कितपत यश मिळाले? दुर्दैवाने पूर्णतः स्वतंत्ररीत्या नाटक हाताळू शकेल, असा एकही कलाकार अजूनपर्यंत यानंतरच्या फळीत दिसू शकलेला नाही. थिएटर अॅकॅडमीच्या बॅनरखाली जब्बार पटेल, सतीश आळेकर इत्यादी तीच नावे आम्हाला चांगली नाटके देतात, हे मान्य करूनही 'थिएटर अॅकॅडमी—एक संस्था, एक चळवळ' असा विचार केला तर वाटते, दहा वर्षं झाली, खूप झाली; आता ही स्थिरता फोडण्यासाठी तरी थिएटर अॅकॅडमी फुटायला हरकत नाही.

थिएटर अॅकॅडमीतर्फे सादर करण्यात आलेल्या या एकूण सहाशेसहा नाट्यप्रयोगांमध्ये प्रत्येक प्रयोगाला सरासरी सुमारे सातशे ते आठशे प्रेक्षक उपस्थित होते. गेल्या दहा वर्षांमध्ये हे सुमारे सहाशे प्रयोग झाले, याचा अर्थ दर आठवड्याला कमीत कमी एक प्रयोग थिएटर अॅकॅडमीतर्फे सादर होत होता. संस्थेतर्फे सादर केले जाणारे एकांकिका-प्रयोग अर्थातच यात धरलेले नाहीत. ☐

# मुंबई वार्ता

**पृष्ठ ७ वरून**

बदल आहेत. आयकरविषयक कायद्यात तर एकूण पस्तीस बदल आहेत. मागच्या अर्थसंकल्पाप्रमाणे धर्मादाय-संस्थांचे इक्विटी शेअर्स घेण्याची कंपन्यांना परवानगी होती. हा अर्थसंकल्प म्हणतो— जर असे शेअर्स त्या कंपनीमध्ये मुळातच १ जून १९७३ रोजी असतील तरच त्यांना परवानगी आहे. अगोदर 'मुळातच' आणि '१ जून १९७३रोजी' या दोन वेगळ्या गोष्टी आहेत हेही सरकारला कळत नाही काय ? आणि कायद्यातल्या अगोदरच्या दुरुस्तीनं ज्या कंपन्यांची दिशाभूल झाली असेल त्यांचं काय ?

कायद्यांच्या भाषेत बोलायचं तर सरकारनं रीतसर पास केलेले कायदे वैध असतील; पण ते संपूर्ण अनैतिक कायदे आहेत. त्यामध्ये घटनात्मक तरतुदींचा अवमर्द तर आहेच; पण त्याबरोबर व्यापार उदीम करणाऱ्या कंपन्यांवर हा निष्कारण झालेला अन्याय आहे. सरकारनं सुजाण, कायद्याला धरून चालणाऱ्या नागरिकांची अनैतिकपणे केलेली ही दिशाभूल आहे आणि या घटनात्मक अनैतिकतेविरुद्ध लढा द्यायला हवा !'

¤

काळवंडत चाललेला परिसर माणसांनी फुलून गेलेला ब्रेबॉर्न स्टेडियमचा नॉर्थ स्टँड धारदारपणे कापत जाणारा पालखीवालांचा आवाज, त्यांच्या आवाजातली कळकळ एका समंजस, जाणकार नागरिकाला आलेला सात्त्विक संताप. परिस्थितीचा समजपणे विचार करणारी त्यांची विलक्षण बुद्धी आणि दूरदृष्टी. शांतपणे, अडचणीतही उभं राहून ते ऐकणारी हजारो माणसं. हे सारं दृश्य भारावून टाकणारं होतं.

'निर्यातीचा मुद्दा घ्या. निर्यातदारांच्या यादीत १९५० साली आपला सोळावा क्रमांक होता. १९८२ साली सेहेचाळिसावा आहे. ही तुलना पहा. १९७२ साली चीन अमेरिकेला बारा लाख कापड निर्यात करीत असे. १९८२ मध्ये तो आकडा ६०० लाखांवर आला आहे. म्हणजे जग कुठं चाललं आहे ?

प्रत्येक गोष्टीचं राजकीयीकरण होतं आहे. ग्रामीण विकासाच्या कार्यक्रमांसाठी देणग्या दिल्या, तर कंपन्यांना सहजासहजी करातून सूट मिळणार नाही. पंतप्रधान-निधीला देणगी दिली, तर मात्र लगेच मिळेल आणि पंतप्रधान-निधी म्हणजे मुख्यमंत्रीनिधीसारखाच. त्याचा कसा वापर होतो ते जाहीरच आहे ! मुख्य विरोध आहे तो याला की, एका माणसाच्या ताब्यात ही मोठी रक्कम जाते आहे. एकीकडे राजकीय पक्षांना देणग्या देण्यावर निर्बंध घालायचे; पण हा पैसा मतदार गटवण्यासाठी जाणार नाही याची काय खात्री ?

कंपन्यांवर, त्यांच्या पाहुणचारांच्या खर्चांवर निर्बंध आलेत. कर्मचाऱ्यांवर केलेल्या खर्चाचा आणि पाहुणचारावरच्या खर्चाचा कंपन्या वेगवेगळा हिशोब ठेवतील अशी का सरकारची कल्पना आहे ? की वेगवेगळी कॅन्टिन्स बांधली जाणारेत ? वाहतुकीवर कंपन्यांनी अतिरिक्त खर्च करू नये म्हणून अगोदरच निर्बंध आहेत. त्यांचाही नव्यानं उल्लेख आहे. त्यामध्ये टांगा, बैलगाडी आणि रिक्षाच्या प्रवासाचा मात्र उल्लेख नाही ! कंपन्यांची ही उधळपट्टी सरकारला खुपते; पण मंत्र्यांचे विमान-प्रवास, दिल्लीच्या वाऱ्या यांचं काय ? जनतेच्या पैशाचा तो चुराडा नाही का ?

अखेर या अर्थसंकल्पाचं तत्त्वज्ञान तरी काय ? उत्तर एकच— काही नाही. त्याला दिशा नाही, ध्येय नाही. एका प्रसिद्ध शास्त्रज्ञानं म्हटलं होतं की, माणसाच्या लेखी तो खूप कोणी तरी असतो; पण डासाच्या मते तो फक्त एक बऱ्यापैकी खाद्यपदार्थ असतो. आमच्या सरकारलाही बहुधा असंच वाटतं की, या देशातली जनता म्हणजे कर लादण्यासाठी, लादून घेण्यासाठीच जन्माला आली आहे !

अर्थव्यवस्थेत नवा जोम येईल असं या अर्थसंकल्पात काही नाही. खरं म्हणजे अर्थव्यवस्थेच्या या पडत्या काळात असा अर्थसंकल्प हवा होता की, त्या व्यवस्थेवर त्याचा ठसा उमटेल आणि येणाऱ्या काळाला काही वळण लागेल. त्याऐवजी हा असा अर्थसंकल्प मांडला गेला आहे की, खिशातल्या हातरुमालावर उडवलेल्या अत्तराहून त्याला अधिक मूल्य नाही. त्याहून अधिक काळ त्याचा प्रभाव टिकणार नाही.'

—ललिता बर्वे

**मी माझं तुटलेलं हृदय विसरलो, राग विसरलो आणि एका मुलीपायी होणारं ' रणकंदन ' वाचवण्याचा प्रयत्न सुरू केला. त्या मुलीचा हात धरला आणि तिला हॉटेलबाहेर नेऊन सोडलं. त्या तिघांना लिफ्टमध्ये घातलं आणि रूमवर घेऊन गेलो.**

# ' टू हेल विथ हॉकी '

**इंग्रजी शब्दांकन : मतीनखान**

**मराठी रूपांतर : द्वारकानाथ संझगिरी**

' कॅरॉल साद ' मला कौलालंपूरला एका पार्टीत भेटली. विश्वचषक जिंकल्यावर विजय साजरा करण्यासाठी ती पार्टी आयोजित केली होती.

ती पार्टी, ती लोकांची झुंबड, शाळा-कॉलेजच्या मुला-मुलींनी स्वाक्षरीसाठी घातलेला गराडा अजून तस्साच्या तस्सा माझ्या डोळ्यांसमोर आहे. त्या दिवशी मी भयंकर सुखावलो होतो. यशाची नशा, यशाची शक्ती मला कळली. यंत्रमानवासारखा मी स्वाक्षऱ्या देत सुटलो होतो. कागदाचे चिटोरे, हॉकीस्टिक्स, कागदी नोटा जे समोर येत होतं त्यावर स्वाक्षरी करत होतो.

फक्त काही तासांपूर्वी मी घोर निराशा अनुभवली होती. नशिबावर, हॉकीवर, अल्लावर, अगदी स्वत:वरही मी वैतागलो होतो. तेव्हढंच भयानक यश मी आता अनुभवत होतो. अपयशात मी एकटा होतो. कुणीसुद्धा माझं नव्हतं. आता माझे साथीदारही मोठ्या उत्साहात माझी ओळख करून देत होते. यशाची जादू ही अशी असते.

' माझ्यासाठी काही तरी उर्दूत लिहिशील ?' सह्या करण्यात दंग असताना हे शब्द कानावर पडले. मी मागं वळून पाहिलं. एक सुंदर चेहरा माझ्याकडे याचना करत होता ! एक १६–१७ वर्षांची मुलगी होती ती ! जीन आणि ठिपक्या-ठिपक्याचा टॉप घातलेली !

माझ्या हृदयाची तार छेडली गेली. तिला कुठें तरी पाहिल्याचा भास झाला. ते मोठे उदास डोळे, गालाची वर आलेली हाडं आणि रुंद जबडा. कुठे पाहिलं असेल ? तेहरान की सिंगापूर, म्युनिच की भारतातच... का कधी तरी विमानात ? आठवण्याचा प्रयत्न केला; पण आठवत नव्हतं.

' तुला उर्दू येतं ?' मनातले सर्व विचार बाजूला सारून मी तिला विचारलं.

तिनं उत्तर दिलं; पण माझ्यापर्यंत पोहचलं नाही. इतर गोंगाटात ते हरवून गेलं.

' कधी भारतात आली आहेस ?'

' नॉट इव्हन अॅज अॅन एम्ब्रियो !' ती जवळ येत म्हणाली.

' मुस्लीम ?' मी विचारलं. कारण ' एम्ब्रियो '( embryo ) म्हणजे काय हेच मला कळलं नाही.

' अर्धी मुस्लीम ' ती म्हणाली, ' माझी आई फ्रेंच प्रोटेस्टंट आहे आणि वडील भारतीय मुस्लीम; पण धंद्यानिमित्त इथे सेट्ल झालेले ! पाहिजे तर अर्धी एशियन, अर्धी युरोपियन म्हण. ' आणि ती जोरात हसली.

तिच्या हसण्याला एक दु:खाची छटा आहे असं मला वाटलं. मी तिला त्याबद्दल विचारलंही !

' नो शिट् !' ती म्हणाली. ' वडलांचं समाजातलं वजन, आईचा पैसा ह्यासाठी मला कुठेही अॅक्सेप्ट केलं जातं... पुन्हा मी ' मुलगी ' आहे. '

शाळेत असताना थोडं फार मार्क्सचं तत्त्वज्ञान कानावरून गेलं होतं. ' आहे रे ' आणि नाही रे ' असे फक्त दोनच वर्ग असतात वगैरे ! जग लिंगावरही दुभंगलंय, हे आता जाणवलं.

' तू काय करतेस ?' काही तरी विचारायचं म्हणून विचारलं. मला संभाषणही थांबवायचं नव्हतं म्हणा. तिच्याशी बोलत रहावंसं वाटत होतं.

' मी मेडिकलला आहे. ' ती म्हणाली.

' आणि काय ?' मी बोलणं चालूच ठेवलं.

' मला वाईल्ड लाईफ आवडतं; पण तथाकथित सुसंस्कृत जगातलं नाही हं ! आणि वैराण वाळवंटही आवडतं. तुला आवडतं ?' तिनं हसत विचारलं.

लहानपणी भूगोलात, काही तरी अरेबियन वाळवंटाबद्दल वाचलं होतं आणि थराथरलो होतो !

' नाही मला वाळवंट अजिबात आवडत नाही. तिथे भयंकर उष्णता असते. मला मृगजळ आवडतं !'

बरोबर बोललास ! प्रत्येकालाच मृगजळ आवडतं. कुणाला ते घरी सापडतं, कुणाला कामात, तर कुणाला मैदानावर ! काहींना ते सापडतच नाही !'

मला काही कळलं नाही. मी उगाचच मान डोलवली.

' चल फिरू या, इतरांना भेटू या, मीच फक्त तुला चिकटून रहाणं बरोबर नाही. आज सर्व डोळे तुला न्याहाळतायत. '

' छे ! छे ! अजिबात नको. ' मी विरोध केला. मला फक्त तुझ्याबरोबरच रहायचंय, तुझ्याशीच बोलायचंय. मला पार्टीत अजिबात रस नाही...'

मग तिने मला ' सोसायटी ' म्हणजे काय ते समजावण्याचा प्रयत्न केला. इतरांत कसं मिसळलं पाहिजे... समोरच्याचा राग येत असला तरी खोटं हसू तोंडावर ठेवून कसं त्या व्यक्तीचं स्वागत केलं पाहिजे वगैरे बौद्धिक तिने घेतलं.

### सोसायटी इज् ब्लू फिल्म्स्...

मला ते पटलं नाही. समाजाने मला काय दिलं ? काहीही नाही. उलट मनस्तापच जास्त दिला. वडील वारल्यावर कष्ट उपसत, मला



बॉंबे गोल्ड कप उचलून आणल्यावर...
इंडियन एअरलाइन्सने मिळवलेल्या
अनेक विजयांपैकी एक.

अम्मा वाढवत असताना आमच्याकडे ढुंकूनही पाहिलं नाही. तो पंचावन्न वर्षांचा थेरडा कोच, त्याच्या विकृत वासना शमविण्यासाठी माझ्यावर झडप घालत होता, तेव्हा समाजाने फक्त मूकपणे पाहिलं! अशा समाजाची मला पर्वा नव्हती. हे सर्व मी कॅरोलला सांगणार होतो; पण स्वतःला आवर घातला... तीसुद्धा एक समाजाचा भाग होती. तिला पटलं नाही तर?...

इतक्यात तीच म्हणाली, 'तुला पटत नसेल तर राहू दे! मलाही काही फरक पडत नाही!'

'आपण हॉटेलात गेलो तर व्यवस्थित बोलता येईल. इथे गर्दीत आणि गोंगाटात धड नीट ऐकूही येत नाही.' असं मी बोललो आणि तिचा हात धरण्यासाठी हात पुढे सरकवला; पण तो पूर्ण पुढे गेला नाही. का कुणास ठाऊक भिडीमुळं तो वाटेतच थांबला.

तिनं माझ्याकडं आश्चर्यानं पाहिलं आणि जवळ सरकली. माझ्या कमरेभोवती हात टाकला आणि म्हणाली, 'सोसायटी इज् ब्लू फिल्मस् पॉपकॉर्न, अ‍ॅण्ड लूज टॉक्स! चल तुझ्या हॉटेलात जाऊ या!'

तिच्या देखण्या गाडीत आम्ही बसलो आणि हॉटेलकडे निघालो...

'तू मलेशिया पाहिलंयस?' तिनं विचारलं.

'फक्त मर्डेका स्टेडियम आणि आमचं हॉटेल!' मी म्हणालो. आता बरीच भीड चेपली होती. त्यामुळे मला कौलालंपूर दाखवशील का? असं विचारून मी मोकळा झालो.

'का नाही?' ती म्हणाली. 'पण एक लक्षात ठेव, मीच पुढाकार घेतेय, तुझ्यावर हुकमत चालवतेय असं वाटू देऊ नकोस!'

'छे! छे! कुणी कुणावर हुकमत चालवत नाही. कुणीही पुढाकार घेत नाही. प्रत्येकजण स्वतःच्याच पापाने नशिबाकडे मार्गक्रमण करत असतो!'

आम्ही हॉटेलात पोहोचलो. रूममधे शिरल्यावर ती म्हणाली, 'मला एक कॉफी सांग, काळी कॉफी, दूध अजिबात नको!' आणि ती सरळ कार्पेटवर आडवी झाली. मला जरा विचित्र वाटलं. मी पुरुषासारखा पुरुष असून घाबरलो. फक्त काही मिनिटांपूर्वी तिची माझी ओळख झाली होती आणि ती बिनधास्तपणे माझ्या रूमवर आरामात कार्पेटवर पहुडली होती. कसलीही भीती-भय तिला वाटत नव्हतं!

'तुझ्या आई-वडिलांनी, तुला माझ्याबरोबर ह्या रूममध्ये पाहिलं तर त्यांना काय वाटेल?' मी विचारलं.

'त्यांना कळणार नाही.' ती शांतपणे म्हणाली, 'आणि जरी कळलं तरी हा सर्वस्वी माझा प्रश्न आहे आणि तू नेहमी इतर काय म्हणतील ह्याची काळजी कशाला करतोस? त्यांना काय म्हणायचं ते म्हणू दे!'

## तुला काय झालंय?

त्या दिवशी रात्री मला झोप येणं शक्य नव्हतं. कधी सकाळ होते आणि तिला भेटतो असं मला झालं होतं. आता माझा टीमशी काही संबंध नव्हता. त्या विजय साजरा करणाऱ्या पार्ट्यांशीही मला काही कर्तव्य नव्हतं. कौलालंपूर मधले उरलेले दिवस मला फक्त तिच्याच सान्निध्यात घालवायचे होते.

कॅरोल सकाळी दहाला येणार होती; पण मी माझ्या उत्साहात नऊलाच तयार होऊन बसलो.

त्या दिवशी तिच्या गाडीतून सर्व कौलालंपूर आम्ही पालथं घातलं. ती मोठ्या उत्साहात मला प्रेक्षणीय स्थळं दाखवत होती. मला त्यात रस नव्हता. मला तीच जास्त प्रेक्षणीय वाटत होती. तिची साथ मला जास्त प्रिय होती. ती अशीच आयुष्याच्या अंतापर्यंत लाभावी असं वाटत होतं. माझ्या भावना कशा बोलून दाखवाव्यात ह्यासाठी मनातल्या मनात मी शब्दांची जुळवणी करत होतो, इतक्यात हॅंबरगर खायला आमची गाडी थांबली.

'तुला काय झालंय?' तिनं विचारलं.

'कुठे काय?'

'हे बघ, तू मला फसवू शकशील; पण स्वतःला फसवू शकणार नाहीस. खरंच सांग ना काय झालंय? कसला विचार करतोयस?'

'मी...मी.. माझं तुझ्यावर प्रेम बसलंय.' सर्व सामर्थ्य पणाला लावून मी बोललो आणि खिडकी बाहेर बघितलं कान मात्र तिच्या उत्तराकडे होते...पुढचा प्रत्येक निःस्तब्ध क्षण माझा थरकाप उडवत होता.

'ओह! तेवढंच ना!' एवढंच ती म्हणाली आणि जोरात हसली.

मला ते लागलं ! अगदी जिव्हारी लागलं ! ती जर एक वेळ म्हणाली असती की तिचं माझ्यावर प्रेम नाही किंवा दोस्तीचा भलताच अर्थ मी लावला, तर वाईट निश्चित वाटलं असतं; पण अपमानास्पद वाटलं नसतं ! तिचं हसणं मला अपमानास्पद वाटलं. माझ्या प्रेमाची ती कुचेष्टा करतेय असं वाटायला लागलं.

'आय ॲम सॉरी ' मी कापऱ्या आवाजात म्हटलं. डोळ्यांतही गंगा-यमुना उभ्या रहाणार असं वाटायला लागलं. इतक्यात गाडीला जोरात ब्रेक लागला. गाडी धाडकन् थांबली ! गाडी कशासाठी थांबवलीस असं मी तिला विचारणार इतक्यात ती म्हणाली' 'आय ॲम सॉरी, दुखावलास ? खरोखरच तू सीरियसली बोलतोयस ह्याच्यावर माझा विश्वास नव्हता. अरे, अजून आपण एकमेकांना पुरते ओळखतसुद्धा नाही. खरोखरच जर तुझं माझ्यावर प्रेम असेल तर घरी चल, माझ्या घरच्यांना भेट !'

त्या दिवशी संध्याकाळी आम्ही मर्लन ब्रँडोचं पिक्चर पाहिलं. शेवट 'ट्रॅजेडी ' होता. ब्रँडो त्यात मरतो असा शॉट होता. मी तिला म्हटलं, ' माझा मृत्यू ह्याहीपेक्षा सुंदर असेल !' तिनं ताबडतोब माझ्या तोंडावर हात ठेवला. ' मृत्यूबद्दल बोलू नकोस असलं. तू खूप जगावंस आणि महान क्रीडापटू व्हावंस असं मला वाटतं '.

तिला माझं वाक्य भयंकर लागलं असावं. त्याला कारणही होतं. हॉटेलवर आल्यावर ती मला म्हणाली, ' माझ्या वडलांचा एक मित्र होता. पायलट होता. अपघातात अचानक वारला. आम्ही सर्वजण त्याच्या प्रेतयात्रेला गेलो होतो. आम्हाला पहायल्याबरोबर त्याच्या बायकोनें हंबरडा फोडला !'

" काल रात्री तो बऱ्याच उशीरा घरी आला. खूप थकलेला होता. तरीही त्याला रतिक्रीडा करावीशी वाटत होती. मी त्याला म्हटलं, ' तू दमलायस, उद्या करू या...आणि बघा आज काय झालंय...' त्याची बायको रडत रडत सांगत होती...त्याला इच्छाही पूर्ण करता आली नाही.

आम्ही घरी जाताना वडील आम्हाला सांगत होते, उद्याचा काही भरवसा नसतो. आजचा क्षण तो आपला—त्याचा पूर्ण उपभोग घ्यायला आपण शिकलं पाहिजे !




## बक्षिसांची खैरात झाली !

तिच्या वडलांचं म्हणणं खरं होतं. भविष्यकाळाबद्दल कुणीच काही सांगू शकत नाही; पण आमच्यासारख्यांना धड वर्तमानकाळही नीट समजत नाही. कर्ता, करविता सर्व ' तो ' आहे. ' तोच ' आमचा प्रोग्रॅम ठरवतो आणि आम्ही त्याप्रमाणे जगतो.

का कुणास ठाऊक पण त्या ' मृत्यू 'च्या गप्पांनी माझ्या मनात पार दबलेल्या भावना पृष्ठभागावर आल्या. "खरोखरच मी कॅरोलला सुखात ठेवू शकेन का ?" हा प्रश्न मला भेडसावयाला लागला. कुठे माझं रहाणीमान आणि कुठे तिचं ! जमीन—अस्मानाचा फरक ! ऐश्वर्यात लोळणारी ही मुलगी माझ्या मातीच्या पडक्या घरात सुखाने नांदू शकेल का ? तिथं स्वैंयपाकाला गॅस नाही, वीज नाही. पावसाळा आला की घराचं तळं होऊन जातं. उन्हाळ्यात पाण्याचं रेशनिंग ! आंघोळीसाठी पाणी मिळणंही मुश्कील ! पण प्रेमाची ओढ एव्हढी प्रचंड होती की, पैसा, धर्म वगैरे सर्व भिंती मी जमीनदोस्त करायला सिद्ध होतो.

कौलालंपूरहून निघायच्या आदल्या दिवशी कॅरोलनं मला तिच्या घरी बोलावलं. त्या दिवशी रात्री भारतीय संघाला ' अधिकृत खाना ' होता. तो झाल्यावर तिच्या घरी येण्याचं वचन मी तिला दिलं.

"पण आत्ता मला आधी मार्केटला घेऊन चल. अम्मा आणि माझ्या बहिणींसाठी मला खरेदी करायची आहे. " मी तिला ' आज्ञा ' केली.

ती एका पायावर तयार झाली. तिच्या मर्सेडिझमधून आम्ही मार्केटात गेलो. वाटेत तिची अखंड बडबड चालली होती. तिच्या आई—वडलांबद्दल, कुत्र्यांबद्दल, गाड्यांबद्दल आणि एकंदरीत तिच्या आयुष्याबद्दल ! पण पहाणाऱ्याला एखादा ' मूक ' चित्रपट पहातोय असंच वाटलं असेल. कारण माझं इंग्लिश आणि तिचं उर्दू...एकमेकांना समजणं अशक्य होतं !

मार्केटात कुणी तरी मला ओळखलं. एका कानातून दुसऱ्या कानात बातमी गेली. " अस्लम शेरखान आलाय !" लगेच घोळका जमला आणि माझ्यावर बक्षिसांची खैरात झाली. टेपरेकॉर्डर्स, ट्रानझिस्टर्स, साड्या, शर्टस् ह्यांचा माझ्यावर अभिषेक चालला होता. एव्हढ्या बक्षिसांचं काय करावं हे कळत नव्हतं. आमच्या मर्सिडीझची ' डिलिव्हरी व्हॅन ' झाली !

जाताना कॅरोल भलतीच शांत होती. मला मजा वाटली. माझं स्टेटस् पाहून चक्क एक मुलगीही शांत झाली होती !



कौतुकाच्या नजरा झेलत अस्लम !
पंजाबचे मुख्यमंत्री गुरुमुखसिंग मुसाफिर
आणि इतर...

तिनं मला हॉटेलवर सोडलं. 'खाना' आटोपल्यावर मला न्यायला पुन्हा येणार होती. हॉटेलच्या दारात पुन्हा स्वाक्षरी मागण्यासाठी मुला–मुलींचा घोळका होता. त्यांच्यातून वाट काढत मी कसाबसा पुढे सरकत होतो. इतक्यात हाताला स्पर्श झाला.

"मला तुझ्याशी जरा बोलायचंय." एक तरुण मुलगी म्हणाली. 'म्हटलं, चल रूमवर. तिथे बोलू.' रूमवर गेल्यावर तिचीव ही घेतली आणि स्वाक्षरी केली. नंतर मी मोर्चा त्या मार्केटमध्ये मिळालेल्या 'अहेरा'वर वळवला. "ह्यातलं काय घरी न्यावं ?" "काय इथंच वाटून टाकावं ?" ह्याबद्दल विचार चालला होता. सिंगापूरहून येतानाचा कस्टम्सचा माझा अनुभव वाईट होता. पुन्हा मद्रासला 'दया किसन' फक्त मद्रासी खेळाडूंनाच कस्टम्सच्या जंजाळातून सोडवणार ह्याची खात्री होती; पण लोकांनी एव्हढ्या प्रेमाने दिलेल्या वस्तु मलेशियातच सोडून जाणं मनाला पटेना.

## मी उत्तर दिलं नाही

हे सर्व करेपर्यंत ती मुलगी माझ्या खोलीत बसून होती.

"तू साड्या घालतेस ?" मी तिला विचारलं आणि एक साडी तिला दिली.

"माझ्या घरी चिक्कार साड्या आहेत; पण मी घालत नाही." ती म्हणाली. तिचं माझ्या रूममधलं अस्तित्व मला बेचैन करत होतं.

शेवटी मी कंटाळून तिला म्हटलं, "तू घरी का जात नाहीस ? तुझे आई-वडील काळजी करतील ! का तुला आणखीन दुसरं काही हवंय ?"

"काही नको, पण मी इथे बसते." ती म्हणाली.

मी तिच्याजवळ गेलो. दोन्ही हातांनी तिचे गाल कुरवाळले. तिने माझा हात धरला. मी वैतागून म्हटलं, "मला जर लहान बहीण असती, ती तुझ्या वयाची असती आणि माझ्या बहिणीने विनाकारण असं अनोळखी माणसाच्या खोलीत बसून रहाणं मला आवडलं नसतं."

ती अचानक उभी राहिली. मला वाटलं माझा गाल आता लाल होणार; पण तिने तसं काहीच केलं नाही. माझ्या मानेभोवती हात टाकले आणि माझं चुंबन घेतलं.

तिच्या डोळ्यात अश्रु तरारले ! "कुणीही, अगदी कुणीही माझ्याबद्दल असे उद्‌गार काढले नव्हते." ती हुंदके देत म्हणाली.

मी तिला हॉटेलच्या दारापर्यंत सोडून आलो. तसं करणं मस्त होतं. कारण तिच्यावर झडप घालायला अनेक गिधाडं बाहेर घोंघावत होती. जाताना वाटेत अनेक मंडळी आमच्या दोघांकडे आश्चर्याने पहात होती. ती मुलगी अखंडपणे रडत होती. तिच्या गाडीत मी तिला नेऊन बसवलं.

"मला तुला भाऊ मानता येणं शक्य नाही अस्लम...मी तुझ्यावर प्रेम करतेय आणि शेवटपर्यंत करत राहीन !" जाताना रडत रडत तिने प्रेम व्यक्त केलं.

मी रूमवर परतलो. माझा रूममेट धावत माझ्याकडे आला. लालबुंद झाला होता.

"मियाँ, यू सन ऑफ अ बिच ! अरे आयुष्यात फक्त पेनल्टी कॉर्नर्सच मारायचे नसतात. इतर अनेक 'गोल्स'ही असतात. अरे, अशी सुवर्णसंधी सोडलीस ? तुला माहितीये का, ती कौलालंपूरमधली 'हायएस्ट पेड कॉल गर्ल' होती. अरे, आम्ही सर्व तिला 'अंगाखाली' घ्यायची संधी शोधत होतो आणि ती स्वतःहून तुझ्याकडे आली तर तू 'बहिणीच्या' वगैरे गप्पा मारल्यास...साला मूर्ख!...यू डम्ब बास्टर्ड !"

मी उत्तर दिलं नाही.. गरजही नव्हती. ते त्याला पटलंही नसतं.

रात्री डिनर झाल्यावर, हॉकीतल्या दोन ज्येष्ठ खेळाडूंनी मला म्हटलं, चल, तुला हॉटेलवर सोडतो. 'त्यांच्याबरोबर त्यांच्या गाडी-जवळ मी आलो तर गाडीत तीन मुली बसल्या होत्या. तिघींनीही जोरदार स्माइल दिलं... 'चल, नाइट क्लबमध्ये जाऊन जरा त्यांच्याबरोवर नाचू या!' त्या दोघांनी हट्टच धरला. हे दोन्ही खेळाडू हॉकीमधले महान फॉरवर्ड म्हणून गणना होणारे... एक आशियायी देशातला तर दुसरा युरोपमधला... दोघंही 'गोल' मारण्यासाठी सवकलेले, कधी मैदानावर... तर कधी मैदानाबाहेर !

नाईटक्लबमध्ये आम्ही दोघांचा ग्रुप करून बसलो होतो. प्रकाश अंधुक होता. धुंद संगीत कानावर आदळत होतं. माझ्या पार्टनरने

मला म्हटलं, ' चल फ्लोअरवर जाऊन डान्स करू या. '

' मी फक्त हॉकीच्या मैदानावरच नाचतो. ' मी तिला म्हटलं.

ती उडाली. ' काय म्हणतोस काय, तू फ्लोअरवर कधीच नाचला नाहीस ?'

' I mean, I have only been floored before ' मी तिची नक्कल करत म्हटलं.

वर्ल्डकप जिंकल्यावर माझं आयष्यच बदललं होतं. मी काहीही बोललो तरी कुणी मनावर घेत नव्हतं.

तरीही ती मला फ्लोअरवर घेऊन गेली. मला अक्षरशः घाम फुटला. मी ह्या पंचतारांकित संस्कृतीला लाखोली वाहिली. ती संस्कृती, ते जग मला परकं होतं. मी ज्या पार्श्वभूमीवर वाढलो तिथे ' पंच ' काय ' एक ' तारांकितही काही नव्हतं. मी चांगले कपडे घालायचो; पण रुमाल ठेवणं परवडत नव्हतं.

तोंडावरचा घाम नेहमीप्रमाणे शर्टाच्या बाहीने पुसायचा मोह मला होत होता; पण मी तो आवरला. ज्या संस्कृतीत मी सध्या होतो तिला ते मंजूर नव्हतं

सुदैवाने लवकर ते संगीत थांबलं आणि मी तिथून पळ काढला.

## इज्जत जाईल असं वागू नका !

हॉटेलवर पोहचायला मला बराच वेळ लागला. तिथे प्रतीक्षाकक्षेत सोफावर बसून कॅरोल माझी प्रतीक्षा करत होती. मुलींच्या घोळक्यांतूनच मी तिच्याकडे गेलो. तिने माझ्याबरोबरच्या इतर मुलींकडे लक्ष दिलं नाही. मी सॉरी म्हणणार इतक्यात ती म्हणाली, ' मला कारणं नकोयत. फक्त माझ्या वडिलांना सांगू नकोस की तू मला वाट पहात ठेवलंस. त्यांना ते आवडणार नाही. ते माझाच खून करतील. चल आता लवकर चल !'

कॅरोलचं घर अगदी तिच्यासारखं होतं. सुंदर नीटनेटकं ! घरासमोर बाग होती. बागेत कारंजी लावली होती. झाडांप्रमाणेच सुंदर पुतळ्यांनी ती बाग सजवली होती. घरात आपल्यासारखे दिवे नव्हते. तिथे शॅंडीलियर्स होते. भिंतीवर आकर्षक पेंटिंग्ज होती. असं घर मी आयुष्यात पहिल्यांदाच पहात होतो. मातीच्या घरात वाढलेला माणूस मी, त्या महालात वावरताना सुरुवातीला जरा नर्व्हसच झालो; पण नंतर नेहमीच अशा वास्तूत माझा वावर असतो अशा थाटात वावरायला लागलो.

मला कॅरोलची आई आवडली. अगदी कॅरोलसारखीच होती. फ्रेंच बाई म्हटल्यावर माझ्या काही वेगळ्या कल्पना होत्या... पण ती तशी नव्हती. कॅरोलचे वडीलही चांगले वाटले... त्यांनी माझ्याशी हॉकी, ' इंडियन फूड ' वगैरे विषयावर गप्पा मारल्या. माझ्या आई-वडलांची विचारपूस केली आणि नंतर विषय हळूच कॅरोल आणि माझ्या संबंधाकडे वळला... मला काय बोलावं तेच कळेना !

आमची चर्चा सुरू असताना कॅरोल तिथे नव्हती. ती उठून आत घरात गेली होती. थोड्या वेळाने ती बाहेर आली. तिला येताना पाहिलं आणि माझ्या नाजुक हृदयाला अणकुचीदार दाभणाने कुणी तरी टोचतंय असं वाटायला लागलं. एका तरुण मुलाच्या हातात हात आणि बोटात बोटं गुंफून ती माझ्या दिशेने येत होती.

माझा चेहरा घामाने डबडबला. मी भयंकर दुखावला गेलो होतो. माझ्यासारखी छोट्या शहरात रहाणारी मुलं भयंकर भावनाशील असतात. त्यांच्या बायकांबद्दल पझेसिव्ह असतात. दुसऱ्याची सावली तिच्यावर पडणंही त्यांना सहन होत नाही आणि मी तर पठाण जमातीतला...! आम्ही सर्वच बाबतीत टोकाला जाणारे. प्रेमही हात राखून करत नाही आणि रागावताना, द्वेष करतानाही पुढचा मागचा विचार करत नाही. माझी होणारी बायको दुसऱ्याच्या कुशीत पहाणं. मला सहन झालं नाही. मला तिथून पळ काढावासा वाटला; पण जाऊ शकत नव्हतो. रात्री हॉटेलला जायला ट्रान्सपोर्ट मिळणं त्या श्रीमंतांच्या वस्तीत कठीण होतं.

शेवटी कॅरोल सोडायला आली. ' उद्या भेटेन !' तिने मला सांगितलं... माझी इच्छा नव्हती.

हॉटेलचं प्रतीक्षाकक्ष एखाद्या भकास समाधीसारखं वाटत होतं. ' Fuck you ! Fuck you every body. ' हॉटेलच्या पॅसेज-मधून जाताना मी जोरात ओरडलो... माझ्या मनात दबलेल्या क्रोधाचा लाव्हारस वाहायला लागला होता. आठ डोळे मला आश्चर्यचकित होऊन न्याहाळत होते. माझे तीन साथीदार आणि एक मुलगी तिथे उभी होती. ते तिघं आपसात भांडत होते आणि ती मुलगी त्यांचं भांडण लक्षपूर्वक ऐकत होती. त्या तिघांपैकी एक आमचा ' फॉरवर्ड ' होता... आघाडीतल्या फळीतला एक निष्णात खेळाडू, दोघं ' हाफ ' पोझिशनमधले ! भांडणाचा विषय अर्थातच त्या मुलीला कुणी उपभोगायचं हाच होता ! त्या दोघांचं म्हणणं की तिघांनी मिळून ' गोल ' मारायचा ! पण त्या फॉरवर्डला मंजूर नव्हतं. त्याला एकट्याने ' गोल ' मारायचा होता.

मी माझं तुटलेलं हृदय विसरलो, राग विसरलो आणि एका मुलीपायी होणारं ' रणकंदन ' वाचवण्याचा प्रयत्न सुरू केला. त्या मुलीचा हात धरला आणि तिला हॉटेलबाहेर नेऊन सोडलं. त्या तिघांना लिफ्टमध्ये घातलं आणि रूमवर घेऊन गेलो.

' आपली इज्जत जाईल असं वागू नका. कुठलीही मुलगी त्या लायकीची नसते...' मी समजावलं.

दुसऱ्या दिवशी कॅरोल हॉटेलवर पोहचायच्या आधीच आम्ही विमानतळ गाठला होता! ... (क्रमशः)

नंतर अरुणा भोपाल कांबळेशी बोललो. ही वीस-पंचवीसच्या दरम्यानची तरुणी ! मेघजीभाई-वाडी या मिरजजवळील एका वस्तीवरची राहणारी. हिच्या दोन्ही हातांची बोटं झडून गेली आहेत. पाच वर्षांपूर्वी विवाह झालेला. नवरा पूर्वी निरोगी होता; पण सध्या पॉझिटिव्ह. अरुणा मात्र पूर्णपणे निगेटिव्ह. एक मुलगा व एक मुलगी. आता कुटुंब नियोजन-शस्त्रक्रिया करून घेतली आहे. ती अंगावरचे पिसवर्क करते. ६ ते ७ रुपये मजुरी मिळते असं तिनं सांगितलं–
' बाई, तुम्हाला पगार पुरतो का ?' या माझ्या प्रश्नाबरोबर तिच्या डोळ्यात पाणी आलं.
' साहेब, आजच्या महागाईच्या काळात एका माणसाला एक वेळेला ३–४ रुपये लागतात, मग मी, नवरा, दोन मुलं यांचं कसं भागणार ?'
मिरजेच्या वॉन्लेसवाडी अपंग पुनर्वसन केंद्रातल्या एका कामगार बाईची ही अवस्था !
केंद्रातल्या सगळ्या कामगारांची हीच दुरवस्था ! कुष्ठरोगी हे आपल्या समाजाचं सर्वात दुबळं अंग; पण १ जानेवारी १९८३ ला केंद्रातले सगळे कामगार लाल बावटा युनियनच्या झेंड्याखाली एकत्र आले आणि संघर्षाची ठिणगी पडली ....

**झडलेले हात, दोन हात करायला उभे रहातात ....**

**एक खास वार्तापत्र....माणूस पुढील अंकी**

विज्ञानेश्वरी....

# नावात काय आहे ?

भारतातील कोणत्याही शाळेत जा आणि 'सर्वांत अवघड विषय कोणता ?' यावर विद्यार्थ्यांची मतं घ्या, गणितालाच सर्वांत जास्त मते पडतील. क्वचित एखाद्या शाळेत इंग्रजीचाही विजय होईल; पण तेच महाविद्यालयातील ११ वीच्या विज्ञान-शाखेतील मुलांची मते पहा. सर्वांत अवघड विषय ? अर्थात जीवशास्त्र ! त्याचे दोन्ही भाग, प्राणिशास्त्र व वनस्पतिशास्त्र ११ वीत आलेल्या नवीन मुलांना घाबरवून सोडतात. शेक्सपियर काहीही म्हणो, नावांत जबरदस्त सामर्थ्य आहे. PLATHELMANTHES, ECHINODERMATA किंवा ACANTHOHAMINGIA यासारखी नावे वाचतानाच नव्हे तर ऐकतानाही अंगावर शहारे येतात. ही नावे देवनागरीत लिहिली, प्लॅटिहेल्मँथिस, एकिनोडर्मटा, अकांथोहॅमिंजिया, तर कदाचित एका दमात वाचता येतील. आता अवघडपणाबद्दल थोडे दुमत होणे शक्य आहे. काहींच्या मते नावे अवघड असली तरी विषय अवघड नाही. दुसऱ्या एका मताप्रमाणे नावापासूनच विषयाच्या अवघडपणाला सुरुवात होते. काही म्हणतात की, जीवशास्त्रात येणारी ही नावे अवघड नाहीतच. हे शेवटचे मत अर्थातच सामान्यांचे नाही.

पृथ्वीच्या पाठीवर प्राण्यांचे व वनस्पतींचे लक्षावधी प्रकार आहेत. त्याचा अभ्यास करणे सुलभ व्हावे म्हणून त्यांचे वर्गीकरण केले आहे. तसेच प्राण्याच्या प्रत्येक प्रकाराला वेगळे नावही दिले पाहिजे. सजीवांचे वर्गीकरण करून त्यांना नावे देणे याचाच अभ्यास करणारी जीवशास्त्राची एक शाखा आहे. तिला 'टॅक्सॉनॉमी' ( Taxonomy ) म्हणतात. तिची स्थापना कॅरोलस लीनियस (१७०७–१७७८) याने केली. याने हजारो प्राणी व वनस्पतींचे वर्गीकरण केले व त्यांना नावे दिली. जीवशास्त्रीय नावे देण्याचे काही नियम आहेत. एक तर ही सर्व नावे लॅटिन या मृत भाषेतच असतात. (आता लक्षावधी सजीवांची नावे ज्या भाषेत आहेत तिला 'मृत' तरी कसे म्हणायचे ?) तसेच ही सर्व नावे 'कॅरोलस लीनियस' असा स्वरूपाची म्हणजे दोन भागांची असतात. उदा. Felis domestice, Homo sapiens, Annona squamosa, Rana tigrina. या दोन भागांपैकी पहिला भाग प्रजाती दर्शवितो व दुसरा जाती दर्शवितो (Genus व Species).

वरील प्रकारच्या नावाने त्या त्या प्राण्याचा बोध व्हायचा तर त्यात त्या प्राण्याचे शरीर-वैशिष्ट्य, स्थान किंवा जीवनपद्धती यांपैकी कसले तरी वर्णन हवे. बहुतेक प्राणी किंवा वनस्पतींची नावे तशीच दिलेली आहेत. वरीलपैकी Felis domestica म्हणजे 'मांजर–घरगुती' असा अर्थ असतो; परंतु नवा प्राणी सापडल्यावर त्याला नाव देताना सर्वांनी हा विचार मनात ठेवला आहे असे नाही. नावे देताना वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करून इतरच गोष्टींचा विचार प्रभावी ठरल्याची अनेक उदाहरणे देता येतील. प्रेम आणि आदर यांनीही प्राण्यांची व वनस्पतींची नावे देण्यात आपला वाटा उचलला आहे असे दिसून येते. कित्येक शास्त्रज्ञांनी आपल्या आईच्या, वडलांच्या, मित्रमैत्रिणींच्या, पत्नींच्या नावांचा उपयोग प्राण्यांच्या व वनस्पतींच्या नावात केला आहे.–स्मिथी,–विलसनी,–स्टिफन्सी,...अशी जाती–नामे वरील भावनांतूनच दिली गेली आहेत. लीच नावाचा एक शास्त्रज्ञ गेल्या शतकात होऊन गेला. त्याने कठीण कवचाच्या अनेक सागरी प्राण्यांना नावे दिली आहेत. त्यापैकी काही अशी आहेत :– लिरोनिका (– tironica ) –नेरोसिला ( –nerocila ), –रोसिनेला ( –rocinela ) या विचित्र जातिवाचकांचे एक रहस्य आहे. ही व अशी सर्व नावे Carolina ( कॅरोलिना ) या नावातील अक्षरांची आलटापालट करून तयार केलेली आहेत. कॅरोलिना हे लीचच्या बायकोचे नाव होते. त्या नावातून अशी नावे तयार करण्याचे त्याला वेडच होते. पत्नीवरील प्रेम अमर करण्यासाठीच लीचने असे केले. बिचारा लीच ! पुढे त्याला खरेच वेड लागले. त्यावर नेपल्समध्ये उपचार घेत असतानाच त्याला कॉलरा झाला व त्यामुळेच तो मृत्यू पावला !

राल्फ बोलिन हा एक प्रसिद्ध मत्स्य-शास्त्रज्ञ होता. एकदा त्याला पोस्टाने विख्यात कादंबरीकार जॉन स्टाइनबेकने स्वतःची नवी कादंबरी, स्वाक्षरी करून पाठवली. ही भेट पाहून बोलिन भारावून गेला. स्टाइनबेकविषयी वाटणारा आदर व्यक्त करण्यासाठी त्याने त्यानंतर शोधून काढलेल्या दीपमत्स्याचे नामकरण 'लॅम्पानिक्टस स्टाइनबेकी' ( Lampanictus Steinbecky) असे केले. त्यानंतर थोड्याच दिवसांत लेखकमहाशयांनी बोलिनकडून आपली कादंबरी परत मागून घेतली आणि 'तुम्हाला ती चुकून पाठवली गेली होती' अशा खुलासा केला ! यावर बोलिनने म्हटले आहे की, त्यानंतर मी दुसऱ्या काही प्राण्यांना तसेच नाव देऊन मूळ नावातला अर्थ नष्ट करण्याच्या विचारात खूप दिवस घालवले, पण व्यर्थ! बिचारा शास्त्रज्ञ. त्याला साहित्यिकांची 'सारंग–शृंगकुटिलानि विचेष्टितानि' ( सांबराच्या शिंगाप्रमाणे वळणावळणाचे–लबाड–चाळे ) कोठून कळायला ?

एका कृमीचे नाव देण्यावर दुसऱ्या महायुद्धाचा परिणाम झाला आहे नक्की. १९४६ मध्ये डब्लू. के फिशरला जपानजवळील कागशिमा आखातात एका नव्या कृमीचा शोध लागला. त्याला फिशरने Acanthohamingia paradola हे नाव दिले. पॅराडोला हा शब्द पॅरा ( शेजारी, सान्निध्यात ) व डोलस ( फसवणूक, दगाफटका ) या दोन लॅटिन शब्दांपासून बनला आहे. जपानने दुसऱ्या महायुद्धात पर्ल हार्बरवर हल्ला करून दगाबाजी केली त्या वेळीच शोधून काढलेल्या नव्या जंताला फिशरने 'पॅराडोला' असे नाव दिले. त्यात नवल ते कसले ?

शास्त्रज्ञाचा विक्षिप्तपणा काही जीवशास्त्रीय नावात दिसून येतो. १९०४ च्या सुमारास जी. डब्लू. कर्कलडी या शास्त्रज्ञाने काही प्रजातींची नावे 'पाली किसमी' (Pollichisme), पेगीकिसमी, ' 'डॉलीकिसमी,' 'फ्लोरिकिसमी' ... अशी दिली आहेत. एका गांधिलमाशीच्या प्रजातीचे नाव 'झायझिक्स' (Zyzzyx) असे आहे. नाव ठेवणाऱ्या शास्त्रज्ञाने असे नाव ठेवण्याचे कारण सांगितले, 'हे नाव कोणत्याही यादीत शोधायला सोपे आहे. ते नेहमी शेवटीच असणार.' मुंग्यांच्या एका जातीला योग्य नाव शोधण्याचा खूप प्रयत्न केला. त्या मुंग्यांचे यथार्थ वर्णन करेल असा शब्द शोधून शास्त्रज्ञ दमून गेला. शेवटी चिडून त्याने नाव दिले–'Stenamm exasperata ( exasperate = चिडवणे, खिजवणे ). 'काम' (chama) ही शिंपल्यांची एक प्रजाती आहे. एका शास्त्रज्ञाला या प्रजातीत एक नवा प्रकार आढळला. त्याबद्दल त्याने आपल्या मित्राला पत्रात लिहिले, या शिंपल्याचे नाव 'Chama sutra' ठेवण्याचा मोह मी मोठ्या कष्टाने आवरला !'

–भा. रा. बापट


तुमच्या कुटुंबानं विम्याचं
कवचकुंडल धारण केलं आहे का?
लाखों कुटुंबांनी आता आयुर्विम्याच्या रूपानं संपूर्ण कौटुंबिक सुरक्षिततेचं कवच प्राप्त करून घेतलं आहे.
आयुर्विमा संरक्षणाची व्याप्ती दरवर्षी वाढतच चालली असून मुलाबाळांच्या शिक्षणासाठी, त्यांना स्वतःच्या पायावर उभं करण्यासाठी, त्यांच्या लग्नकार्यासाठी, म्हातारपणाची तरतूद करण्यासाठी लक्षावधी कुटुंबांना आयुर्विम्याचंच सहाय्य होत असतं. आयुर्विम्यामुळे या आवश्यक गरजा भागतात आणि कुटुंबाला संपूर्ण सुरक्षितता लाभते.
आपल्या कुटुंबाला संपूर्ण संरक्षण मिळवून देण्याचा आयुर्विमा हा सर्वोत्कृष्ट मार्ग आहे. आजच आपल्या आयुर्विमा प्रतिनिधीची भेट घ्या व अधिक माहिती मिळवा.
भारतीय आयुर्विमा महामंडळ
आयुर्विम्याला पर्याय नाही.
Pratibha-LIC-164-82B MAR